३५४४८
ई/८०
DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY POONA

मराठ्यांचा दरारा.

अथवा

मराठ्यांच्या

बंगाल प्रांतावर स्वाऱ्या.

लेखक—
वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.,

स्वीकार ता. 23 नोव्हेंबर १९१६
रजिस्टर नं. १८ अ / १८५१८
६/८०
DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY * POONA. 1894 *
डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसायटी, पुणे. १८९४.

मराठ्यांचा दरारा

अथवा

मराठ्यांच्या बंगाल प्रांतावर स्वाऱ्या.

लिहिणार

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.,

संपादक 'आनंद' व 'मल्लारिमार्तंडविजय,'

इंदूर.

१९१६.

किंमत १० आणे.

प्रिंटरः--
कृष्णराव सखाराम पाटकर,
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
४०२, ठाकुरद्वार, मुंबई.

प्रकाशकः—
गोपाळ बळवंत जोशी,
आनंदकार्यालय,
शुक्रवार पेठ, पुणें शहर.

हें पुस्तक

माझे प्रिय विद्वान् मित्र

रा. नारायण खंडेराव फडके,

बी. ए., एल्. बी.,

वकील, **अकोला,**

यांस

त्यांच्या सौजन्यादि गुणांवर

लुब्ध होऊन

मित्रभावानें

अर्पण

केलें

असे.

अनुक्रमाणिका.

प्रस्तावना.

मराठ्यांच्या बंगालप्रांतावर स्वाऱ्या हा मराठ्यांच्या इतिहासांतला भाग अद्याप पूर्णपणें अप्रकाशित असल्यामुळें त्या संबंधानें माहिती मिळवून ती मराठी वाचकांस सादर करावी हा कित्येक वर्षांपासून मनांत धरलेला हेतु आज अंशतः तरी पार पडत आहे याबद्दल मनाला वाटत असलेलें समाधान व्यक्त केल्यावांचून राहवत नाहीं. नागपूरकर भोसल्यांच्या अस्सल कागदपत्रांतून या विषयाची माहिती मिळविण्यासाठीं मी पुष्कळ प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां तिच्या अभावीं निदान फारशी, बंगाली व इंग्रजी ग्रंथांतल्या माहितीचें तरी विवेचक दृष्टीनें पर्यालोचन करून ती माहिती मराठी वाचकांपुढें सादर ठेवावी अशा हेतूनें मीं या विषयावर एक निबंध लिहून तो इंदूरच्या महाराष्ट्र-साहित्य-सभेपुढें प्रथम वाचला, व तो विद्वानांस मान्य झाल्याचें कळल्यावर तोच वाढवून पुस्तकरूपानें हल्लीं प्रसिद्ध करीत आहें. या पुस्तकाच्या रचनेच्या कामीं ज्या ज्या लेखकांचें व इतर व्यक्तींचें साह्य मला झालें आहे त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

कागदाचा भाव सांप्रतच्या युद्धामुळें प्रमाणाबाहेर अतिशय वाढल्यामुळें पुस्तकाच्या आकाराच्या मानानें ज्यास्त किंमत ठेवावी लागली. पण त्याला कोणाचाच इलाज नव्हता हें ध्यानांत घेऊन सुज्ञ ग्राहक क्षमा करतील अशी मी आशा करतों.

आनंदमंदिर,
जुना तोफखाना, इंदूर.
२६-२-१६.

वासुदेव गोविंद आपटे.

मराठ्यांचा दरारा.

अथवा

मराठ्यांच्या बंगालप्रांतावर स्वाऱ्या.

प्रकरण पहिलें.

इतिहासाचीं साधनें.

इ. स. १७२१ पासून १७६१ पर्यंतचा काळ (म्हणजे बाजीराव बल्लाळ ऊर्फ पहिले बाजीराव, व बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब या दोन पेशव्यांच्या कारकीर्दीचा काळ) मराठ्यांच्या इतिहासांत बराच धामधुमीचा म्हणून प्रसिद्ध आहे. या काळांत श्रीमंत पहिले बाजीरावसाहेब पेशवे यांनीं गुजराथ, माळवा, बुंदेलखंड वगैरे प्रांत काबीज करून व मराठ्यांच्या समशेरीचें पाणी शत्रूंस दाखवून मराठ्यांची सत्ता प्रांतोप्रांतीं स्थापित केली. त्यांचे मागें त्यांचे चिरंजीव रघुनाथराव दादासाहेब, ऊर्फ राघोबादादा, आणि शिंदे, होळकर, नागपूरकर भोसले वगैरे मराठे सरदार यांनींही बाजीरावाचेंच व्रत

पुढें चालवून साऱ्या हिंदुस्थानच्या नाकीं दम आणिला, हें इतिहासज्ञांस विदितच आहे. या काळांतल्या प्रत्येक मोहिमीचा सविस्तर वृत्तांत कागदोपत्रीं अद्याप साग्र उपलब्ध झाला नाहीं. तो होईल तेव्हां मराठ्यांनीं हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून आपला दरारा कोणत्या उपायांनीं व कशाप्रकारें बसविला, त्यावेळीं कोणीं कसे पराक्रम केले, मराठ्यांच्या अंगचे स्वाभिमान, औदार्य, शौर्य, स्वामिकार्यासाठीं प्रसंगीं देहाचा बळी अर्पण करण्याची तयारी, समयसूचकता, धाडस इत्यादि गुण कसे प्रकट झाले, व निरनिराळ्या प्रसंगांतून कोण कशाप्रकारें पार पडले वगैरे गोष्टी कळून मोठी बहार होईल, व मराठ्यांच्या इतिहासांत उज्ज्वल भाग किती आहे व कलंकित भाग किती आहे याची छाननी करून जगाच्या इतिहासांत मराठ्यांच्या इतिहासाचा दर्जा ठरविण्यास तें एक उत्तम साधन होईल. त्याच्या अभावीं आह्मां मराठ्यांविषयीं परदेशीय लेखकांनीं जें कांहीं लिहून ठेविलें आहे तेंच सत्य मानिलें जाऊन त्यावरून सध्या मराठ्यांची योग्यता ठरविण्यांत येत असते. सुदैवानें रा. राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे, पारसनीस व पुण्याचें भारतेतिहाससंशोधकमंडळ यांच्या परिश्रमानें बरेचसे कागदपत्र उजेडांत येऊन मराठ्यांच्या इतिहासावर थोडा तरी अधिक प्रकाश पडला आहे. पण या थोड्या प्रकाशानें सुद्धां केवढें कार्य केलें आहे तें श्रीशिवाजी-महाराजांविषयीं परदेशीय लेखकांच्या मतांत घडलेल्या क्रांतीवरून कोणाच्याही सहज लक्षांत येईल. शिवाजी हा चोर

व लुटारू होता हें दहा वीस वर्षांपूर्वीचें इंग्रज इतिहासकारांचें मत सत्यनिर्णयाच्या कसोटीला न उतरल्यामुळें प्रो. रॉलिनसन व मि. किंकेड यांच्यासारख्या लेखकांना श्रीशिवाजीमहाराज हे भारतीय राज्यकर्त्यांच्या मालिकेंत गोंवण्याच्या थोर योग्यतेचे होते, ही गोष्ट निरभिमानतेनें कबूल करावी लागली आहे. [१] नागपूरकर भोसल्यांनीं बंगालप्रांतावर इ. स. १७४३ पासून १७५१ पर्यंत ज्या लागोपाठ स्वाऱ्या केल्या, त्यांच्या संबंधाची मराठ्यांच्या दप्तरांतली माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाहीं. ती जर उपलब्ध होईल, तर या काळाला The darkest page in Maratha History असें जें समजण्यांत येत असतें, त्यांतही मोठी क्रांति घडून मराठ्यांवरचा कलंक धुतला जाण्याचा संभव आहे; पण तो काळ अद्याप यावयाचा आहे. आतांपर्यंत या स्वाऱ्यांबद्दलची मराठ्यांच्या दप्तरांतली जी माहिती उपलब्ध झालेली आहे, ती इतकी अल्प व त्रोटक आहे कीं, तिच्या आधारानें दहा वीस पृष्ठांचासुद्धां इतिहास नीट संगतवार जुळवून लिहितां यावयाचा नाहीं. नागपूरकर भोसल्यांच्या बखरींत या स्वाऱ्यांचा नुसता उल्लेख करण्यापलीकडे विशेषशी माहिती दिलेली नाहीं. प. वा. रा. वामन दाजी ओक यांनीं माजी ‘ काव्येतिहाससंग्रहा ’च्या द्वारें ‘ नागपूरकर भोसल्यांच्या

१ प्रो. रॉलिनसन यांचें Shivaji the Maratha पृ. ८९ व या पुस्तकाचें मि. किंकेडसाहेबांनीं ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ पत्रांत केलेलें परीक्षण पहा.

संबंधाचे कागदपत्र' प्रसिद्ध केले आहेत. त्यांत या स्वाऱ्यां-संबंधानें अधिक माहिती मिळेल म्हणून जर कोणी मोठ्या आशेनें तें पुस्तक उघडील, तर त्याची बरीच निराशा झाल्याशिवाय राहणार नाहीं. इतर मराठी ऐतिहासिक पुस्तकांतूनही असाच निराशाजनक प्रकार आढळतो. मी आज पांच सात वर्षें या माहितीच्या शोधांत आहें. येवढ्या काळांत नागपूर, वऱ्हाड, व महाराष्ट्र या तिन्ही प्रांतांत माझ्या प्रयत्नाला यश आलें नाहीं. शेवटीं अस्सल कागदपत्रांवरून या काळाचा इतिहास लिहिणें जरी तूर्त शक्य नसलें, तरी मुसलमान, बंगाली व इंग्रज लेखकांनीं या स्वाऱ्यांसंबंधानें जें कांहीं लिहून ठेविलें आहे, तें संकलित करून व मराठ्यांच्या बाजूची जेवढी माहिती उपलब्ध झालेली आहे तिच्याशीं तें ताडून पाहून या स्वाऱ्यांचा कसा तरी संकलित इतिहास मराठी वाचकांना सादर करण्याचा मीं संकल्प केला व स्वाऱ्यांसंबंधाचीं ऐतिहासिक स्थलें प्रत्यक्ष पाहण्यासाठीं व तेथील ग्रंथालयांतून इंग्रजी, फारशी व बंगाली पुस्तकांतली माहिती आणण्यासाठीं बंगालप्रांतांत जाऊन आलों. तेव्हां जी माहिती मला मिळाली, तिच्या आधारानें हा पुढील वृत्तांत लिहून काढला आहे. पुढेंमागें अस्सल मराठी कागदपत्र प्रसिद्ध होतील, तेव्हां या वृत्तांतांत कदाचित् पुष्कळ उलथा-पालथ होईल. पण तोंपर्यंत या स्वाऱ्यांसंबंधानें मराठी वाचकांना अगदींच अज्ञानांत ठेवण्यापेक्षां परदेशीय लेखकांनीं लिहून ठेवलेल्या वृत्तांतावर कां होईना, पण कांहींतरी सुसंगतवार

इतिहास वाचकांना कळेल, तो कळवावा येवढाच या प्रयत्नाचा हेतु आहे. या पलीकडे या प्रयत्नाची अधिक महत्त्वाकांक्षा किंवा किंमत नाहीं हें मला येथें स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे.

पुढील वृत्तांत लिहितांना प्रकाशित असलेल्या बहुतेक सर्व मराठी व ऐतिहासिक वाङ्मयाचा उपयोग मला करतां आला तेवढा केला आहे. तेव्हां त्या ग्रंथांचीं नांवें देऊन मी या पुस्तकाची जागा अडवीत नाहीं.परदेशीय साधनांपैकीं ज्यांचा विशेष उल्लेख करणें मला योग्य दिसतें तेवढ्यांचाच मात्र येथें नामनिर्देश करतों.

1 Imperial Gazetteer of India.
2 Nagpur Gazetteer
3 Stuart's History of Bengal.
4 Holwell's Interesting Historical facts.
5 Lord Wellesley's Despatches.
6 Selections from the East India Company's Records.
7 Burdwan Gazetter,
8 Calcutta Cazett er.
9 Beveridge's History of India.
१० तवारिख-इ-बंगाला. (फारशी)
११ मुताक्षरीन. (,,)
१२ तवारीख इसुफी. (,,)
१३ रियाझ-उस-सलातीन. (,,)
१४ तवारिख मनसुरी (,,)
१५ अखबर उस् सेदक (,,)

१६ महाराष्ट्रपुराण (बंगाली)
१७ श्री काली प्रसन्न प्रणीत बांगलार इतिहास (")
१८ श्री बिहारीलाल विरचित बंगे बुर्गी (")

किरकोळ व मराठी पुस्तकांचीं नांवें वरील यादींत दिलीं नाहींत.

या यादीपैकीं इंग्रजी ग्रंथासंबंधानें अधिक माहिती देण्याचें प्रयोजन नाहीं. कारण, हे ग्रंथ जिज्ञासु वाचकांना कोणत्याही एकाद्या चांगल्याशा ग्रंथालयांत मिळण्यासारखे आहेत. पण फारशी व बंगाली ग्रंथांची गोष्ट तशी नसल्यामुळें त्यांच्या विषयीं चार शब्द येथें सांगणें अवश्य आहे.

तवारिख—इ-बंगाला—याचा कर्ता कोण व कोठील तें कळत नाहीं. यांत १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांतल्या बंगालप्रांताचा इतिहास दिला आहे. कलकत्त्याचे गव्हर्नर वान्सिटार्टसाहेब यांच्या आज्ञेवरून हा रचिला गेला. यावरून इ. स. १७६० पासून १७६४ च्या दरम्यानच्या काळांत याची रचना झाली असली पाहिजे असें दिसतें. मि. ग्ल्याडविन् नांवाच्या एका इंग्रजानें इ. स. १७८८ मध्यें याचें इंग्रजी भाषांतर कलकत्ता येथें छापिलें होतें. अनेक फारशी इतिहासकारांनीं या इतिहासाचे आधार वारंवार दिलेले आढळतात. मूळ फारशी ग्रंथकार मोठा चतुर व लेखनकलानिपुण दिसतो. त्यानें बाणभट्टाच्या कादंबरीच्या थाटावर आरंभीं वान्सिटार्टसाहेबांची प्रशस्ति लिहिलेली आहे. ती वाचनीय आहे. स्टुअर्टसाहेबांच्या बंगालच्या इतिहासाला मुख्यतः याच ग्रंथाचा आधार आहे.

मुताक्षरीन—याचा कर्ता गुलाम हुसेन नांवाचा एक मुसलमान लेखक होता. या पलीकडे या ग्रंथाविषयीं अधिक माहिती मला मिळाली नाहीं. यानें दिलेली मराठ्यांच्या स्वाऱ्यांबद्दलची हकीकत तवारिख इसुफी या ग्रंथांतल्या हकीकतीशीं बरीच जुळते.

तवारिख इसुफी—या नांवावरूनच या ग्रंथाचा कर्ता युसफ़अली नांवाचा इसम होता हें स्पष्ट आहे. या ग्रंथांत बंगालचा सुभेदार * अलीवर्दीखान याच्या कारकीर्दीचा इतिहास आहे. मराठ्यांच्या तिसऱ्या स्वारींत त्यांच्याशीं लढणाऱ्या मुसलमान फौजेबरोबर युसफअली हा स्वतः होता. याच्या लेखांत जर पक्षाभिमान नसता तर समकालीनत्वामुळें त्याच्या ग्रंथाला विशेष महत्त्व देतां आलें असतें. 'महाराष्ट्र-पुराणा'चा कर्ता हिंदु लेखक कवि गंगाराम हाही या फारशी लेखकाचा समकालीन असल्यामुळें एकाच ऐतिहासिक घटनेसंबंधानें या दोघांनीं दिलेल्या हकीकती परस्परांशीं ताडून पाहण्यासारख्या आहेत; व त्यावरून या फारशी लेखकानें दिलेली हकीकत पक्षाभिमानानें दूषित झालेली आहे असें माझें मत झालें आहे.

रियाझ-उस-सलातीन—या फारशी ग्रंथाच्या लेखकाविषयीं कांहीं माहिती मिळाली नाहीं. तथापि यानें दिलेली माहिती तवारिख बंगाला या ग्रंथांतल्या माहितीशीं अक्षरशः

---

* या नांवाचा अपभ्रंश मराठी बखरकारांनीं अली बिरदीखान किंवा अल्ला बर्दीखान असा केलेला आढळतो.

जुळते. बाबू कालीप्रसन्न बंद्योपाध्याय हे बंगाली लेखक म्हणतात कीं, या लेखकानें तवारीख मधलीच हकीकत पण सरळ भाषेंत किंचित् रूपांतर करून घेतली आहे येवढेंच. त्यांत त्याचें स्वतःचें विशेषसें नाहीं.

कालीप्रसन्न बंद्योपाध्याय प्रणीत बांगलार इतिहास—हा अनेक फारसी, बंगाली व इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें एका विद्यमान लेखकानें लिहिलेला असून बंगाली इतिहासज्ञांस तो आदरणीय झाला आहे. पाटणा कॉलेजचे इतिहासाध्यापक व 'मॉडर्न रिव्ह्यू'चे एक सन्मान्य लेखक फारसीभाषाभिज्ञ प्रो० जदुनाथ सरकार एम. ए. यांनीं हा ग्रंथ वाचण्याबद्दल विशेष शिफारस करून मला पत्र लिहिलें होतें. सरकारनें प्रसिद्ध केलेल्या इंपीरियल ग्याझिटीयरमध्येंही या इतिहासाची प्रशंसा केलेली आढळते. पण मराठ्यांच्या स्वाऱ्यांच्या या पुस्तकांत दिलेल्या तारखा मराठी बखरींत दिलेल्या तारखांशीं जुळत नाहींत. तथापि या पुढील हकीकतींत मीं या इतिहासाचा पुष्कळ उपयोग करून घेतला आहे.

बंगे बुर्गी—हें पुस्तक फारसी ग्रंथांतली थोडीशी माहिती घेऊन व त्यांत स्वतःच्या कल्पनेची बरीचशी भर घालून बरेंचसें रंगवून व फुलवून लिहिलेलें आहे. यांत केलेल्या कोणत्याच विधानाला आधार दिलेला नाहीं.

महाराष्ट्रपुराण—हें खंडपुराण शके १६७२ त गंगाराम नांवाच्या कोणा बंगाली कवीनें बंगाली भाषेंत पद्यात्मक रचिलें

आहे. या ग्रंथाचें फक्त एकच (पहिलें) कांड कलकत्त्याच्या बंगीय साहित्यपरिषदेला उपलब्ध झालें. तें त्या संस्थेच्या ‘साहित्यपरिषद्पत्रिकें’त प्रसिद्ध झालें आहे; व बाबू कालीप्रसन्न बंद्योपाध्याय यांनींही आपल्या बंगालच्या इतिहासाचे शेवटीं परिशिष्टाच्या रूपानें तें जोडलें आहे. प्रसिद्ध झालेल्या पहिल्या खंडांत सुमारें एक हजार ओळी आहेत. जुन्या संस्कृतपुराणांच्या धर्तीवर याची रचना आहे. पृथ्वीला दैत्यांच्या पापाचरणाचा भार सहन न होऊन ती ब्रम्हदेवाकडे व नंतर विष्णूकडे जाते व त्याच्यापासून अवतार घेण्याचें वचन घेते, ही जशी संस्कृत-पुराणांच्या आरंभाची पद्धति आहे, त्याचप्रमाणें याही पुराणांत बंगाल्यांत मुसलमानांच्या अत्याचारांचा भार होऊन पृथ्वी नंदीला शरण गेली व तो नंदी प्रथम दिल्लीच्या बादशहाकडे व नंतर त्याच्या सांगण्यावरून साताऱ्याच्या शाहुमहाराजाकडे गेला, व आपण आपल्या सरदारास पाठवून बंगालच्या लोकांचा दुःखभार हलका करूं असें त्यानें त्याच्यापासून वचन घेतलें, अशा प्रकारें या पुराणाचा आरंभ केला आहे. तथापि कवि गंगाराम हा मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे वेळीं (या स्वाऱ्यांना बंगाली भाषेंत ‘ बर्गीर हंगामा ’ अथवा बारगिरांची धामधूम असें म्हणतात) स्वतः एका मोठ्या अधिकारपदावर विद्यमान असल्यामुळें व मुसलमान लेखकांसारखी त्याची दृष्टि विकार-वशतेनें दूषित झालेली नसल्यामुळें इतिहासदृष्ट्या हें पुराण बरेंच विश्वसनीय समजतात. पुराणाच्या शुद्ध भाषापद्धतीवरून व

सशास्त्ररचनेवरून या पुराणाचा कर्ता तत्कालीन पंडितवर्गांतला असावा असें दिसतें. *

तवारिख मनसुरी—हा फारशी ग्रंथ बंगालचे शेवटचे नबाब नाजिम मनसूर अलीखान यांचे आज्ञेवरून पूर्वींच्या फारशी व इंग्रजी ग्रंथांतल्या माहितीच्या आधारें लिहिला आहे. अर्थात हा अलीकडच्या काळांतला आहे.

आखबर उस सदेक—हा फारशी ग्रंथ नबाब मीरजाफरखान यांच्या वेळेस कोणींतरी लिहिलेला आहे. यापलीकडे या ग्रंथाबद्दल विशेषशी माहिती मिळाली नाहीं.

---

* या पुराणाच्या पहिल्या कांडाचे शेवटीं ' इति महाराष्ट्रपुराणे 'प्रथमखंडे भास्कर पराभव । सकाब्दा: १६७२ सन ११५८ साल । तारीख १४ पौस रोज शनिवार ' असा उल्लेख आहे. भास्करपंडिताच्या वधानंतर ७।८ वर्षांनीं हें पुराण लिहिलें गेलें अशी टीप बंगाली प्रकाशकानें दिली आहे; पण ती चूक दिसते. कारण भास्करपंडित शके १६६९ मध्यें मारला गेला असें आमच्या बखरी म्हणतात. तें खरें धरलें तर हें पुराण त्यानंतर लवकरच लिहिलें गेलें असलें पाहिजे हें उघड दिसतें.

प्रकरण दुसरें.

नागपूरकर भोसले.

बंगालप्रांतावर लागोपाठ स्वाऱ्या पाठवून पूर्वप्रांतीं मराठ्यांचा दरारा बसविणाऱ्या रघोजी भोसल्यांच्या घराण्यासंबंधानें येथें चार शब्द सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. मराठी बखरी लिहिणारांनीं वंशावळी वगैरे पाहून व दंतकथा आधारभूत धरून भोसले घराण्याचा संबंध उदेपूरच्या रजपूत राजघराण्याशीं जोडलेला आहे, आणि जोंपर्यंत त्याविरुद्ध सबळ पुरावा उपलब्ध झालेला नाहीं, तोंपर्यंत हा संबंध ऐतिहासिक सत्य समजूनच आपणास चाललें पाहिजे. मुसलमान बादशहांचे वेळीं रजपूतांचा छळ होऊन कांहीं रजपूतघराण्यांना देशत्याग करावा लागला होता. अशा घराण्यांपैकीं भोसल्यांचें घराणें हें एक होतें. या घराण्यांतले कांहीं पुरुष मुसलमानांच्या छळाला त्रासून दक्षिणेंत येऊन राहिले. भोसे किल्ल्याजवळ भोसावत म्हणून एक गांव आहे, तेथें त्यांनीं प्रथम वस्ती केल्यामुळें तेव्हांपासून भोसले हें नांव त्यांच्या घराण्याला मिळालें अशी व्युत्पत्ति कोणी कोणी सांगतात. ती कितपत यथार्थ आहे हें सांगतां येत नाहीं. तथापि येवढी गोष्ट

---

१ नागपूरकर भोसल्यांची बखर पृ. ४ टीप ११.

खरी कीं, नागपूरकर भोसल्यांचे मूळपुरुष मुधोजी भोसले हे उत्तेरकडून पळत येऊन ' मौजे हिंगणी पाटस प्रांत वैराणींत होता; सबब त्या परगण्याचे हकीमाकडे जाऊन मौजे मजकूरची वसाहत कबूल करून पाटिलकी वतनी त्यांनीं कबूल केली व तेथें ते उदीम करून राहिले.'[1]

यानंतर मुधोजीनें श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचा आश्रय करून त्यांच्या पदरीं शिलेदारीची जागा मिळविली. मुधोजीस सात पुत्र झाले. पैकीं लौकिकवान् असे तिघे—बापूजी भोसले, साबाजी भोसले, व परसोजी भोसले—होत. या तिघांनींही महाराजांची सेवा वेळोवेळीं एकनिष्ठपणानें केल्यावरून साबाजी भोसले यांचे विनंतीवरून महाराजांनीं विशालगडचे मुक्कामीं असतां त्यांस दोन गांवें इनाम म्हणून दिलीं. पुढें श्री शिवाजी महाराज मरण पावल्यावर त्यांची गादी वडील मुलगा संभाजी यास न देतां धाकटा मुलगा राजाराम यास द्यावी म्हणून जो कट झाला होता, त्यांत परसोजीचें अंग होतें अशी शंका घेऊन संभाजीमहाराजांनीं त्या त्रिवर्गबंधूंस नौकरीवरून काढलें. तेव्हां परसोजी आपल्या जमावानिशीं खानदेशांत पुंडवाले लूट करीत होते त्यांत मिळाले व बापूजी आणि साबाजी मौजे हिंगणी या आपल्या वतनाच्या गांवीं जाऊन राहिले.

पुढें कांहीं काळानंतर संभाजीचा पुत्र शाहु दिल्लीच्या बादशाहाच्या कैदेंतून सुटून बादशाही फौज, खिलत व दक्षिणेंत

१ नागपूरकर भोसल्यांची बखर पृ ४.

चौथ घेण्याविषयींच्या सरदेशमुखीच्या सनदा घेऊन साताऱ्याकडे जात असतां वाटेंत खानदेशांत परसोजी त्यांना आपल्या जमावानिशीं जाऊन मिळाला. शाहूला या वेळीं परसोजी-सारख्या धाडशी शिपायाची फार जरूर असल्यामुळें त्यांनीं त्याचा मोठ्या खुषीनें संग्रह करून त्याला आपल्या पदरीं ठेविलें. शाहु आपलें राज्य परत मागण्यासाठीं येत आहे ही बातमी ऐकून राजारामाची बायको ताराबाई सातारचें राज्य संभाळून होती, तिला लोभ सुटला; आणि इतके दिवस आपलें म्हणून संभाळ-लेलें राज्य आतां दुसऱ्याच्या पदरांत टाकण्याचें तिच्या जिवावर आलें. तथापि शाहु हा संभाजीचा पुत्र, अर्थात् वडील घराण्यांतला, तेव्हां धर्मशास्त्राच्या व राजनीतीच्या दृष्टीनें सगळे लोक त्याचाच हक्क खरा मानणार हें तिला पक्कें ठाऊक होतें. तशी ती शहाणी व धूर्तही होती. तेव्हां शाहूला संभाजीचा पुत्र कबूल करून मग त्याला राज्य देत नाहीं असें आपणांस म्हणतां येणार नाहीं, असें जाणून तिनें एक युक्ति लढविली. शाहू लहानपणापासून बादशाहाच्या जनानखान्यांत राहिलेला असल्यामुळें त्याचा पेहराव, भाषा, व चालीरीती आणि संवयी सगळ्या मुसलमानी वळणावर गेलेल्या होत्या. या गोष्टीचा फायदा घेऊन ती या मुद्यावर भांडूं लागली कीं, हा अस्सल शाहु—संभाजीमहाराजांचा पुत्र—नव्हे, तर कोणी तोतया आहे. आणि या बहाण्यावर ती त्याला मराठ्यांचें राज्य देण्याची टाळाटाळ करूं लागली. पण हा बहाणा शाहूचे दुसरे नातेवाईक ऐकेनात. तेव्हां हा खरा

शाहु आहे कीं तोतया आहे याची परीक्षा करण्यासाठीं ताराबाईनें हिंगणीकर बापूजी भोसले यांस 'हे पहिलेपासोन वडिलोपार्जित इतबारी, प्रबुद्ध, शिवाजीमहाराजासमागमें कामाकाजास आलेले' म्हणून त्याकामावर पाठविलें. बापूजीला पाठविण्यांत त्या धूर्त बाईचा दुसरा एक अंतःस्थ हेतु होता. तो हा कीं, परसोजी आपल्या जमावानिशीं शाहूस मिळाला असल्याचें तिला कळलें होतें. त्याला बापूजीच्या मार्फत फितवून शाहूपासून दूर करावयाचें होतें. म्हणून तिनें त्याला बजावून आज्ञा केली कीं, 'तुम्ही वडिलांपासोन (आहां.) तुमचे वडील पूर्वापार सेवा करीत, विश्वासुक, प्रबुद्ध याजकरितां पाठवितों. तोतया मनुष्य पाहून यावें, म्हणजे सर्वांची खातरजमा होईल. मग पारिपत्य केलें जाईल. तुम्ही आपले कुळास बट्टा लाऊं नये. रांगडा कोण आहे, चिटणविसांनीं शाहु केला आहे याजवरून जाणें.' * या आज्ञेप्रमाणें बापूजी भोसले हजार लोक बरोबर घेऊन गेले. बापू आतां जो निकाल देईल त्यावर शाहूचें प्राक्तन अवलंबून राहिलें होतें. म्हणून शाहूतर्फे 'तुम्हीं या प्रसंगीं अनुकूल झाल्यास तुमचा सन्मान होऊन पद मातबर देण्यांत येईल' असें सुचविण्यांत आलें. तेथें परसोजीची व बापूजीची भेट होऊन भावाभावांत ठरलें कीं, हा शाहूच आहे असें सांगावयाचें व खात्री पटण्याकरितां त्याच्या ताटांत जेवावयाचें. त्याप्रमाणें ते जेवले. तेव्हां तो खरा शाहु आहे अशाविषयीं इतर मराठे सर-

* नागपूरकर भोसल्यांची बखर पृ. २०

दारांची खातरजमा होऊन ते शाहूला मिळाले. यावरून खुष होऊन राजपद प्राप्त झाल्यावर शाहुमहाराजांनीं परसोजी यास ' वऱ्हाडप्रांताचे सेनासाहेब सुभा हें पद, जरी–पटका, साहेब–नौबद व शिक्केकटार वस्त्रें देऊन सन १११७ फसली शके १६३० चे सालीं रवाना केलें. त्यांनीं गोंडवण, देवगड, चांदें, वऱ्हाड वगैरे प्रांतीं अंमल बसविला.'

या मानाचा उपभोग दोन वर्षें घेतल्यावर परसोजी सन १११९ फसलीमध्यें मरण पावला. त्याच्या मागें त्याचें पद त्याचा मुलगा कान्होजी यास मिळालें. यानेंही १८ वर्षें इमानें-इतबारें महाराजांची सेवा केली. या काळांत त्यानें वऱ्हाड-प्रांतांचा बंदोबस्त करून शिवाय चंद्रपूरपर्यंत स्वारी करून परगणे लुटून बराच मुलुख हस्तगत केला. कान्होजीचा पराक्रम पाहून शाहुमहाराजांची तब्यत खुष झाली व त्यांनीं कांहींएक नजर न घेतां ' वस्त्रें बहुमोल, जरी मंदिल व जरीची चादर इत्यादिक पाठविलीं. ' याप्रमाणें कान्होजीचा मान राजदरबारीं वाढत चालला. तरी पोटीं संतान नाहीं हा एक हृद्रोग त्याच्या पाठीस लागला होता. त्याबद्दलचें दु:ख अंशतः तरी हलकें व्हावें ह्मणून त्यानें आपले चुलते बापूजी भोसले यांचा पुत्र बिंबाजी याचा पुत्र रघोजी यास त्याच्या आजीजवळून पांडव-

---

१ नागपूरकर भोसल्यांच्या संबंधाचे कागदपत्र लेखांक १ पृ० २ व मल्हार रामरावकृत राजारामाचें चरित्र पृ० ६

वाडीहून आणवून आपलेजवळ* भाम येथें ठेविलें व त्याला पुत्रवत् मानून सरदारपुत्रास योग्य असें घोड्यावर बसणें, शिकार करणें, तिरंदाजी करणें वगैरे गोष्टींचें शिक्षण त्यास दिलें. हा क्रम चालला असतां कान्होजीस औरस पुत्र झाला. त्याचें नांव रामाजी (रायाजी) ठेवण्यांत आलें. कान्होजीच्या मनांत अगोदर रघोजीला दत्तक घ्यावयाचें होतें; पण औरसपुत्र झाल्यावर तो विचार अर्थात्च राहिला, व रघोजीविषयीं कान्होजीची दिवसेंदिवस अनास्था दिसूं लागली. रघोजीला याचें वैषम्य वाटून तो आपल्या चुलत्याचा आश्रय सोडून निघाला, आणि देवगडचा राजा चांदसुलतान याच्याकडे गेला. हा थोरामोठ्याचा पुतण्या म्हणून चांदानें त्याचा सन्मान करून खातरजमा केली. तेथें कांहीं दिवस राहून रघोजी वऱ्हाडांत आळजपूर (एलिचपूर) चे सुभ्याकडे गेला. त्यानेंही त्याचा चांगला मान राखिला. पुढें रघोजी तेथून साताऱ्यास गेला. तेथें महाराजांचे मर्जीतले चिटणवीस खंडोबल्लाळ यांचे तिसरे पुत्र गोविंद खंडेराव यांचा व कान्होजीच्या घराण्याचा घरोबा, म्हणून त्यांचे येथें राहिला. तेथें असतां श्रीपतराव प्रतिनिधि व फत्तेसिंग राजे भोसले यांच्याशीं स्नेह करून रघोजीनें त्यांचें

---

* हा गांव वऱ्हाडांत यवतमाळ शहरापासून ८।९ कोसांवर आहे.

१ या वेळीं नागपूर प्रांतावर गोंड राजाचें स्वामित्व होतें. हा राजा दिल्लीच्या बादशहाचा मांडलिक होता व देवगड ही त्याची राजधानी होती. नागपूर शहर याच चांदसुलतानानें वसविलें.

प्रेम संपादलें. पुढें कांहीं दिवसांनीं शाहूमहाराजांनीं फत्तेसिंगाला कर्नाटकच्या मुलुखगिरीवर पाठविलें. तेव्हां फत्तेसिंगानें रघोजीला आपल्याबरोबर घेतलें. या मोहिमींत फत्तेसिंगाला रघोजीचा फार उपयोग झाला. कर्नाटकांत एक वर्ष राहून जागजागीं खंडण्या घेऊन फत्तेसिंग राजे परत सातार्‍यास आले, तेव्हां त्यांनीं मोहिमीची साग्र हकीकत शाहूमहाराजांस निवेदन करतां करतां रघोजीच्या पराक्रमाची तारीफ केली. त्यावरून महाराजांची मर्जी प्रसन्न झाली. मग महाराज रघोजीला आपल्याबरोबर शिकारीस नेऊं लागले. एकदां वाघाची शिकार करीत असतां रघोजीनें महाराजांचे प्राण वाघाच्या तडाख्यांतून मोठ्या शिकस्तीनें वांचविले. शाहूमहाराजांची स्त्री व रघोजीची स्त्री या चुलत बहिणी असल्यामुळें त्या दोघांत नात्याचाही संबंध होता. त्यांत रघोजीचा शूरपणा महाराजांच्या नजरेस आल्यानें त्यांच्या प्रसन्नतेंत भर पडली. याचवेळीं कांहीं कारणावरून महाराजांचे मनांत कान्होजी भोसले सेनासाहेब सुभा यांच्याविषयीं किल्मिष येऊन कान्होजीवर इतराजी झाली; व त्याच्याकडचें सेनासाहेब सुभा हें पद व अधिकार काढून रघोजीला तीं देण्यांत *आलीं.

* नागपूरकर भोसल्यासंबंधाचे कागदपत्र पृ. ३ यांत म्हटलें आहे कीं, कान्होजीच्या पारिपत्यासाठीं रघोजीस फौज देऊन महाराजांनीं पाठविलें होतें; व त्याप्रमाणें रघोजीनें त्यास वर्‍हाडांतील वणी तालुक्यांतील मंदार नांवाच्या गांवीं पकडून सातार्‍यास नेलें. कान्होजी सातार्‍यास बंदीखान्यांतच मरण पावला.

शिवाय वाईपरगण्यांतल्या देऊरगांवच्या मोकाशाच्या सनदा त्यास देण्यांत आल्या. रघोजीबरोबर महाराजांनीं निवडक अधिकारी-मंडळी विश्वासुक म्हणून दिली होती. त्यांत कोन्हेरराम मुजुमदार दिवाण, त्यांचे बंधु भास्करराम (बक्षी), शंकराजी रखमाजी पोतनीस, महादजीपंत प्रभु फडणवीस वगैरे माणसें प्रमुख होतीं. याप्रमाणें रघोजी भोसले सेनासाहेब सुभा हे सरदार, दरखदार व सरंजाम यांसह निघून वऱ्हाडांतून खंडण्या घेत घेत देवगडच्या राज्यावर उतरले; व भोंवतालच्या प्रांतांत धुमाकूळ घालून गोंडवण प्रांत त्यांनीं जिंकला. तेथें व वऱ्हाड-प्रांतांत आपला अंमल कायमचा बसवून नंतर शाहूमहाराजांच्या आज्ञेवरून ते फत्तेसिंग राजे भोसले यांचे बरोबर पुनः एकदां कर्नाटकच्या मोहिमीवर गेले. हीही कामगिरी यशस्वी रीतीनें पार पाडून व महाराजांकडून शाबासकी व सन्मान मिळवून ते परत आले. येतांना बंगालच्या नबाबाकडे थकलेली चौथाईची रकम वसूल करण्याकरितां बंगाल, बहार व ओढिया (ओरिसा) या प्रांतांवर स्वारी करण्याविषयींची महाराजांची परवानगीही त्यानें मिळविली.

येथें हें प्रकरण समाप्त करण्यापूर्वी रघोजीचे दिवाण कोन्हेर-राम व त्यांचे बंधु भास्करराम यांच्याविषयीं थोडीशी हकीकत सांगणें जरूर आहे. कारण, या बंगालच्या स्वाऱ्याशीं भास्कर-रामाचा फार निकटचा संबंध पुढें येणार आहे.

कोन्हेरराम व भास्करराम (यालाच बंगाली, फारशी व इंग्रज इतिहासकारांनीं भास्कर पंडित असें ह्मटलें आहे, व हेंच नांव आह्मींही पुढील वृत्ततांत कायम ठेविलें आहे.) हे उभयतां बंधु होते. यांचें उपनांव कोल्हटकर. हे मूळचे पांडवगड प्रांत वाई येथील वतनदार होते. यांचे वडील रामजी नारायण कोल्हटकर यांच्याकडे कोंकणांतल्या नेवरें गांवची देशमुखी असल्याकारणानें कोंकणांत त्यांचें नेहमीं येणेंजाणें असे. एकदां बापूजी, परसोजी, व साबाजी भोसले हे त्रिवर्ग बंधु मुलेंमाणसें वगैरे खटल्यासह कोंकणांत भैरवगडाचे खालीं वस्तीस उतरले असतां रामाजीची व त्यांची ओळख झाली व लवकरच स्नेह जमला. इतक्यांत जंजिरेकर हबशानें भोसल्यांवर हल्ला करून, लुटून, त्या सर्वांना कैद करून नेलें. हें ऐकतांच रामाजीनें तीन हजारांची जामीनकी देऊन व घरदार विकून उभी केलेली तीन हजारांची रकम हबशाचे पदरांत टाकून त्यांची सुटका केली. इतकेंच नाहीं, तर त्यांना आपले घरीं नेऊन आपल्या वतनांतून त्यांच्या खर्चाची व्यवस्था करून देऊन त्यांना आपल्याजवळ ठेविलें. पुढें शाहूमहाराजांचे पदरचे आश्रित विठ्ठल कान्हो ठोसर वाकनीस यांच्या कन्येचा महाराजांनीं रामाजीचा मुलगा कोन्हेरराम याच्याबरोबर विवाह करून दिला. तेव्हांपासून महाराज कोन्हेररामाला जांवई समजून त्याजवर लोभ करूं लागले. महाराजांची मर्जी बसल्याकारणानें कोन्हेररामाला महाराजाकडे जाण्याचे वारंवार प्रसंग येऊं लागले. कधीं कधीं

तो आपलेबरोबर आपला सोबती रघोजी भोसले यांसही महाराजाकडे घेऊन जाई. अशा रीतीनें कोन्हेरराम व रघोजी या उभयतांचा महाराजाशीं संबंध जडला. पुढें वर सांगिल्याप्रमाणें रघोजीवर महाराजाची मर्जी प्रसन्न होऊन त्याला कान्होजीच्या जागीं सेनासाहेब सुभा हें पद देऊन महाराजांनीं पाठविलें, तेव्हां कोन्हेरराम याला विवाहाचे वेळीं आंदण द्यावयाचें राहिलें होतें तें देण्याचे निमित्तानें रघोजीच्या मजमूदारीचें काम त्याला दिलें; व कोन्हेररामाचा भाऊ भास्करराम याला बक्षी ह्मणजे सेनापति करून रघोजीबरोबर पाठविलें. हा भास्करराम पुढें बंगालच्या एका स्वारींत बंगालचा नबाब अलीवर्दीखान याच्या हातून दगलबाजीनें मारला गेला. त्याबद्दलची सविस्तर हकीकत पुढें एका प्रकरणांत येणारच आहे.

प्रकरण तिसरें.

तत्कालीन देशस्थिति.

नागपूरकर रघोजी भोसले यांच्या आज्ञेवरून मराठ्यांनीं बंगालवर स्वाऱ्या केल्या. तो काळ इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या जवळ जवळ माध्यान्हीचा काळ होता. या शतकाच्या प्रारंभालाच मोगलांच्या सत्तेचा गौरवरवि अस्ताचलाकडे जाऊं लागला होता. महान् धोरणी व राजकारणपटु अकबर बादशहाच्या राजनीतीच्या उलट वर्तन करून सगळ्या भारतवर्षावर मोगलांचें एकच्छत्री राज्य प्रस्थापित करूं पाहणारा औरंगजेब बादशहा शांत होऊन बरींच वर्षें झालीं होतीं; तथापि त्यानें आपल्या अदूरदर्शित्वाच्या कृत्यांनीं रजपूत, मराठे, शीख वगैरे लोकांच्या मनांत प्रज्वलित करून ठेविलेला द्वेषाग्नि अद्याप शांत झाला नव्हता. औरंगजेबाच्या मागून दिल्लीच्या तक्तावर आलेले एकंदर मोगल सम्राट् दुर्बळ असल्यामुळें त्यांचे मांडलिक राजे व मुसलमान सुभेदार भग्नसूत्र झालेल्या रत्नहाराच्या मण्यांप्रमाणें इतस्ततः विखुरले जाऊन मोगलसाम्राज्याशीं आपला आजपर्यंत चालत असलेला संबंध विसरले होते. इतकेंच नाहीं, तर कित्येक उघडपणें त्या सत्तेची निर्भत्सना करीत होते. मराठ्यांच्या विजयदुंदुभीचा गंभीर नाद दिल्लीपर्यंत ऐकूं जाऊन मराठ्यांच्या

शत्रूच्या हृदयांत धडकी भरवूं लागला होता. त्या ध्वनीनें दिल्लीचें बादशाही तख्त डळमळूं लागलें होतें. तंजावर, मदुरा, म्हैसूर वगैरे ठिकाणचा बादशाही अंमल साफ उडाला होता. कर्नाटकच्या नबाबानें बादशाहाचा अधिकार अजिबात झुगारून दिला होता. निजाम शिरजोर होऊन बसला होता. गुजराथ व माळवा येथील सुभेदार नांवाला बादशहाचे अंकित म्हणवीत होते. रजपूत राजे तर बादशहाविरुद्ध उठून स्वतंत्र झाले होते. रोहिले व अफगाण हे सुद्धां बादशहाशीं बेइमान झाले होते. मराठे तर उघड उघड बादशहावर आपलें श्रेष्ठत्व गाजवीत होते. इंग्रज व्यापारी यावेळीं आपला मतलब साधण्यासाठीं मोगल राजकर्त्यांची हर्वातशी खुशामत करीत होते. ही खुशामत इतक्या सीमेला गेली होती कीं, मोगल अधिकाऱ्यांनीं पायाचें चुंबन घेण्यास सांगितलें तरी इंग्रज तें घेत * असत. नादिरशहानें दिल्लीवर स्वारी त्याकाळीं म्हणजे इसवी सन १७३९ च्या सुमारास ही स्थिति होती. नादिरशहाच्या स्वारीनंतर स्थिति अधिकच बिघडली. बादशहाच्या खजिन्यांत पैसा होता, तोंपर्यंत त्या पैशासाठीं तरी बादशहाला लोक मान देत असत. पण नादिरशहानें दिल्लीशहर लुटून बत्तीस कोट

---

* "The noble offered his foot to our merchant to kiss, which he twice refused to do, but at last he was fain to do it–" Bruton's Narrative in Wilson.

रुपयांची लूट नेल्यावर तर बादशहाची सत्ता नांवालासुद्धां राहिली नाहीं.

नादिरशाहा दिल्लींतून निघून गेल्यावर सुमारें दहा महिन्यांनीं अलीवर्दीखानानें बंगालचा नबाब सरफराज खान याला लढाईंत ठार करून मुर्शिदाबादची गादी बळकाविली.या अलीवर्दीखानाची हकीकत मोठी विचित्र आहे. ती अशी—

अलीवर्दीखान व त्याचा भाऊ हाजी अहमद हे मूळ तार्तरी देशांत राहत होते. हिंदुस्थानांत जाऊन नशीब काढावें अशा विचारानें ते इकडे आले. इकडे आल्यावर कांहीं दिवस दिल्लीच्या बादशाहाजवळ राहून त्यांनीं त्याची मर्जी संपादन करून घेतली. पुढें बादशहाची शिफारस नेऊन बंगालचा नबाब सरफराज खान याचे पाशीं ते चाकरीस राहिले. सरफराजखानानें हाजीस आपल्या स्वतःच्या खिदमतींत घेतलें व अलीवर्दीस स्वारांच्या एका तुकडीवर नेमिलें. पुढें क्रमाक्रमानें ते दोघे उच्चपदास चढले. हाजी हा मुख्य दिवाण व अलीवर्दी सेनापति झाला. नंतर लवकरच अलीवर्दीखान बहारप्रांताचा सुभेदार झाला व या हुद्यावर असतांना त्यानें फौजेची जय्यत तयारी करून सरफराजखानाशीं खुसपट काढून लढाईचा प्रसंग आणिला. या लढाईंत सरफराजखान दगलबाजीनें मारला गेला व अलीवर्दीखानास मुर्शिदाबादच्या नबाबाची गादी मिळाली.

कित्येक ग्रंथकार अलीवर्दीखानाला बंगालच्या नबाबाची गादी मिळाल्याची हकीकत थोडीशी निराळ्या तऱ्हेनें सांगतात. ती

अशी–ते म्हणतात कीं अलीवर्दीखान हा बंगालचा नवाब सुजाखान याच्या पदरीं एक लहानसा सरदार होता. सुजाखान हा आळशी असल्यानें त्याचा व्यवहार फार ढिलेपणाचा असे. कांहीं दिवस त्यानें आपलें काम मोठया शहाणपणानें केलें, पण तो अलीवर्दीखान, त्याचा भाऊ हाजी अहमद, अलमचंद, आणि जगत्शेट या चौघांच्या तंत्रानें वागूं लागला. सगळीं कारभाराचीं सूत्रें या चौकडीचे हातीं देऊन तो स्वस्थपणें ऐषआरामांत लोळूं लागला. अलीवर्दीखानानें प्रथम त्या प्रांतांतले डोईजड रजवाडे आणि चकवार नांवाचे शूर लोक यांना युक्तीयुक्तीनें दूर करून नंतर आपला धनी सुजाखान याच्या विरुद्ध दिल्लीचे दरबारीं कारस्थान सुरू केलें; व दरबारीमंडळीस लाच देऊन बहार प्रांतावर सुभेदार म्हणून आपली नेमणूक करून घेतली. सुजाखान याला या गोष्टीचा राग येऊन तो अलीवर्दींचा पाडाव करण्यासाठीं टपून बसला. पण याच संधीस तो मरण पावला, व त्याचा मुलगा सरफराजखान त्याच्या मागून बंगालचा नवाब झाला. सरफराजखान मोठा लहरी व उन्मत्त होता. यामुळें त्याचेच लोक कंटाळून त्याच्या विरुद्ध उठले होते. या लोकांनीं अलीवर्दीखानास मदतीस बोलाविलें, व त्याबद्दल त्याला बंगालच्या नबाबाचें पद देऊं केलें. तें पद मिळण्याच्या आशेनें अलीवर्दीखान मदतीस गेला. सरफराजखानाची व त्याची लढाई झाली, आणि सरफराजखान तींत मेला. तेव्हां अलीवर्दी बंगालचा नबाब झाला.

सरफराजखानाला मारून बंगालच्या नबाबाची गादी मिळविल्यावर अलीवर्दीखानानें सुजाउद्दीनाचा जांवई मुर्शीद कुलीखान ओरिसा प्रांताचा सुभेदार होता त्याला तेथून हाकून लाविलें. तेव्हां तेथील दिवाण मीर हबीब हा अलीवर्दीखानाच्या भयानें तेथून पळून गेला. पण लवकरच जिकडे तिकडे स्थिरस्थावर झालेलें पाहून व अलीवर्दीखानाच्या मनांत आपणास कांहीं अपाय करण्याचा विचार नाहीं, अशी खात्री करून घेऊन तो परत येऊन अलीवर्दीखानाच्या चाकरीस राहिला. तथापि अलीवर्दीखानाविषयीं त्याच्या मनांत जी द्वेषबुद्धि बाणली होती ती नाहींशी झाली नाहीं. ती कशी प्रकट झाली व मीरहबीबचा मराठ्यांच्या स्वाऱ्यांशीं कसा जवळचा संबंध घडून आला ती हकीकत पुढें येईल.

या काळीं मोगलराज्याची स्थिति कशी होती, बंगालप्रांताच्या सुभेदारीसाठीं कसे झगडे चालले होते, व शेवटीं अलीवर्दीखानानें बंगाल, बहार व ओरिसा या तिन्ही प्रांतांची सुभेदारी युक्तीयुक्तीनें कशी मिळविली यांचें वर्णन आतांपर्यंत केलें. अशा स्थितींत दुर्बळ अशा दिल्लीच्या बादशहाची सत्ता टिकली कशी याचें एकाद्यास आश्चर्य वाटेल; पण आश्चर्य वाटण्याचें खरोखर कांहीं कारण नाहीं. कारण, एक तर ती सत्ता नुसती नांवाची होती. प्राणावांचून जशी कुडी, तसें खऱ्या सत्ते-विरहित या काळचें मोगलराज्य होतें. तथापि येवढी गोष्ट खरी कीं, बादशहाच्या हातांत कांहीं सत्ता नव्हती, तरी लोकांत त्याच्या

शिक्क्याला मान असे. याचें कारण हिंदुस्थानच्या लोकांचा जुन्या गोष्टीकडे असलेला ओढा याशिवाय कांहीं नव्हतें. बादशहा कितीही दुर्बळ आणि निःसत्त्व असला, तरी ज्या गादीवर अकबर, शहाजहान व औरंगजेब यांच्यासारखे वैभवशाली व कर्तृत्ववान् बादशहा होऊन गेले, त्या गादीचा महिमाच मोठा असला पाहिजे, ईश्वरी अंशच त्या गादीचे ठायीं असला पाहिजे, ही भावना लोकांच्या मनांतून कधींही गेली नाहीं. अर्थात् त्या गादीला मान देणें हें आपलें कर्तव्य आहे ही दृढ भावना बादशहाविषयीं अत्यंत तिरस्कार–बुद्धि धारण करणाऱ्या मुसलमानांचेच ठायीं नव्हे, तर हिंदूच्यासुद्धां मनांत होती. मनाची भावना म्हणजे छायेसारखी क्षणभंगुर. तिच्या पायावर जिचें अस्तित्व अवलंबून राहिलें होतें ती सत्ता किती दिवस टिकणार ? तशांतून या सत्तेला दक्षिणेंत एक जंगी प्रतिस्पर्धी उभा राहिला होता. या प्रतिस्पर्ध्याच्या स्थितीसंबंधानें थोडीशी कल्पना पुढील वर्णनावरून करतां येईल व या दोन प्रतिस्पर्ध्यांच्या बलाबलामधलें तारतम्यही चाणाक्ष वाचकांस ओळखतां येईल. हा प्रतिस्पर्धी म्हणजे दक्षिणेंतली मराठ्यांची वाढती सत्ता होय हें सांगावयास नकोच.

मराठ्यांच्या अंगचें तेज संकटाचे प्रसंगीं जसें प्रकट होत आलें आहे तसें इतर प्रसंगीं नाहीं, हा त्यांच्या स्वभावांतला विशेष या काळच्या इतिहासांत स्पष्टपणें दिसून येतो. श्रीशिवाजीमहाराजांचे वेळीं मराठी राज्यरूपी इमारतीची

पायापासून रचना होत असतां एकी, उद्योगाचा महिमा, स्वार्थत्याग, कर्तृत्वशक्ति, अलौकिक धैर्य इ० गुण मराठ्यांचे अंगीं आहेत ही गोष्ट प्रथमतःच जगाच्या निदर्शनास आली. पुढें संभाजीमहाराजांचे कारकीर्दीचे अखेरीस जेव्हां मराठ्यांच्या राज्याची इतिश्री होते कीं काय अशी भीति पडली, तेव्हां तर हे गुण विशेषत्वानें प्रकट झालेले दिसले.पण पुढें शाहुमहाराजांचे कारकीर्दींत राज्यांत शांतता स्थापित होऊन परचक्राची भीति उरली नाहीं, तेव्हां तेच मराठे आपआपसांत भांडून फुटूं लागले. केंद्रस्थानाचे आकर्षण कमी पडल्याबरोबर मराठेसरदारांमध्यें अपसरण सुरू झालें. जो तो मराठा सरदार स्वतंत्र होण्यास पाहूं लागला. सुदैवानें पहिल्या बाजीराव पेशव्याचे अंगीं अलौकिक आकर्षणशक्ति होती, यामुळें त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत मराठ्यांची अपसरणाकडची ही प्रवृत्ति बाहेर दिसली नाहीं. तिचा अंकुर याचवेळीं प्रच्छन्नरीतीनें उगवला होता असें म्हणतां येईल. कारण, त्याच्या मृत्यूनंतर लागलीच, त्याच्या मागें पेशवापद कोणास द्यावें हा प्रश्न उत्पन्न झाला असतांच, या प्रवृत्तीनें उचल खाल्लेली दिसली.रघोजी भोसले हा अतिशय महत्त्वाकांक्षी होता, हें मागील प्रकरणांत त्यानें सेनासाहेब सुभेपद कसें मिळविलें तें सांगितलें आहे, त्यावरून वाचकांना दिसून आलेंच आहे. शाहुमहाराजास पुत्रसंतति नसल्यामुळें व त्यांच्याशीं त्याचा नात्याचाही संबंध असल्यामुळें त्यांनीं आपणास दत्तक घ्यावें अशी त्यानें खटपट करून पाहिली. पण

तें जुळलें नाहीं, तेव्हां आपला हस्तक, बाबूजी नाईक बारामतीकर, यास तें पद मिळवून देऊन मराठेमंडळाचें नेतृत्व आपले हातीं घेण्यासाठीं त्याची खटपट सुरू झाली. इकडे श्रीपतराव प्रतिनिधि व बाळाजी बाजीराव यांच्यामध्यें वैमनस्य होतेंच. या वैमनस्याला बरेचसें जातिभेदाचें--देशस्थ व कोंकणस्थ या पोटजातींमधील--द्वेषाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. सातारा व कोल्हापुर या दोन गाद्यांमधलें भांडण अद्याप मिटलें नव्हतें, व ताराबाई जिवंत होती तोंपर्यंत तें मिटण्याचा संभवही नव्हता. अशा अंतःस्थ कलहामुळें व मराठे सरदारांच्या केंद्रापसरणप्रवृत्तीमुळें मराठी राज्याचे आज नाहीं तरी कालांतरानें तुकडे होणार असें भविष्य कोणाही चाणाक्ष माणसाला करतां आलें असतें, अशी स्थिति या काळीं होती.

प्रकरण चौथें.

बंगालवरची पहिली स्वारी.

(इ. स. १७४३)

मागें दुसऱ्या प्रकरणांत सांगितल्या प्रमाणें अलीवर्दीखानानें बंगालच्या नबाबाची गादी बळकाविल्यावर तो दिल्लीच्या बादशाहाकडून आपणा स्वतःसाठीं व आपल्या नात्यागोत्यांतल्या माणसांसाठीं मानसन्मानाच्या पदव्या व अधिकार संपादण्याच्या खटपटीस लागला. दिल्लीच्या बादशहाची त्यावेळीं इतकी कंगाल स्थिति झाली होती कीं, त्या बिचाऱ्याला मानसन्मान व किताब यांचें दुकान मांडण्याची पाळी आली होती! त्यानें तरी काय करावें ? ‘बडा घर पोकळ वासा’ या म्हणीप्रमाणें त्याची स्थिति झाली होती. मोगल सम्राटाचा इतमाम त्याला इभ्रतीसाठीं ठेवणें भाग होतें. बाहेरचा डामडौल तर कमी करतां येईना, आणि त्या इतमामाचा खर्च चालविण्याची ऐपत तर मुळींच नव्हती. ‘ कान गेले, आणि कानांचीं भोकें मात्र राहिलीं ’ या म्हणीप्रमाणें त्याची स्थिति होती. प्रांताप्रांतावरले सुभेदार व अधिकारी अधिकाराचीं वस्त्रें घेण्यास येत, त्यावेळीं जो काय नजराणा मिळे तें त्याचें

काय तें उत्पन्न. खंडण्या येण्याचें बहुतेक बंदच झालें होतें. खंडणी कां पाठविली नाहीं असें विचारण्याची सोय नव्हती. अशा स्थितींत जो ज्यास्त रकम देईल त्याला ज्यास्त पदव्या व अधिकार देण्याची खैरात त्यानें चालविली यांत आश्चर्य नाहीं. अलीवर्दीखानाचे हातीं यावेळीं मागच्या नबाबानें कंजूष-पणानें संचित करून ठेवलेलें द्रव्यभांडार अवचित आलें होतें. मग त्याला पैशाची किंमत कां वाटावी ? त्यानें बादशहाकडे मोलवान् नजराणे पाठवून त्याची मर्जी खुष करून घेतली व स्वतःस आणि आपल्या नातेवाइकांस त्याच्याकडून मानपान् व किताब यांची लूट करून घेतली.

याप्रमाणें एका वर्षांत त्यानें बादशहापाशीं आपलें वजन वाढविल्यानंतर तो हळूहळू आपल्या राज्याच्या बंदोबस्ताला लागला. त्याची दृष्टि पहिल्यानें सुजाउद्दिनाचा जांवई मुर्शीद-कुलीखान हा ओरिसाप्रांताचा सुभेदार होता त्याच्याकडे गेली; व देशांत शांतता राहण्यासाठीं तुम्हीं आपल्या परिवारासह दुसरीकडे निघून जावें, नाहींतर युद्धाचा प्रसंग येईल असा त्यानें त्याला निरोप पाठविला. तो निरोप ऐकून मुर्शीदखान घाबरला, आणि निघून जाण्याची तयारी करूं लागला. पण त्याची पत्नी दुर्दाना बेगम व जांवई बाकरखान यांनीं त्याला धीर देऊन लढाईची तयारी केली. हें वर्तमान कळतांच अली-वर्दीखान संतापला, आणि मुर्शीदखानाची खोड मोडण्यासाठीं मोठी फौज घेऊन आला. दोन्ही पक्षांची लढाई झाली. तींत

मुर्शीदखानाच्या पक्षाचा पराभव झाला, तेव्हां तो आपल्या लोकांसह पळून गेला. अलीवर्दीखानानें आपला जांवई (कोणी म्हणतात पुतण्या) सैयद अहमदखान याची ओरिसाच्या अहमदखान याची ओरिसाच्या सुभेदारीवर स्थापना करून बंगालकडे परत जाण्यास पाठ फिरविली. पण सैयदानें हातांत अधिकार येतांच उन्मत्त होऊन लोकांवर अत्याचार चालविले व खजिन्यांत द्रव्यसंचय व्हावा म्हणून सैन्यांवरील अधिकाऱ्यांचे पगार कमी केले. त्यामुळें लोकांनीं त्रासून बाकरखानाला परत बोलाविलें व सैदर अहमदास त्याचेकडून कैद करविलें. हें अलीवर्दीखानास कळतांच तो अर्ध्या वाटेंतूनच ओरिसाकडे परत फिरला, व त्यानें बाकरखानाचा पराभव करून व सैयद अहमदाचा कैदेंतून सुटका करून त्याला मुर्शिदाबादेकडे पाठवून दिलें. अलीवर्दीखानानें ओरिसाप्रांतांत कांहीं दिवस राहून तेथें शांतता स्थापित केली आणि मग तो पुनः मुर्शिदाबादेकडे जाण्यास निघाला. त्यावेळीं त्याचे जवळ फक्त पांच* हजार सैन्य होतें व तेंही बाकरखानाशीं लढतां लढतां आणि ‘ गडाच्च सास्वडं यामि सास्वडाच्च पुनर्गडम् ’ याप्रमाणें ओरिसाबादेहून मुर्शिदाबादेकडे व मुर्शिदाबादेहून पुनः ओरिसाकडे

---

* कित्येक मुसलमान इतिहासकार लिहितात कीं नवाब अलीवर्दीखान ओरिसा प्रांतावर स्वारी करण्यास निघाला त्यावेळीं त्यानें बरोबर पंचवीस हजार सैन्य घेतलें होतें, पण ओरिसाप्रांतांत शांतता स्थापित झाल्यावर त्यानें वीसहजार सैन्याला पुढें मुर्शिदाबादेला पाठवून दिलें होतें.

अशा खेपा घालतां घालतां थकलेलें होतें. म्हणून मुर्शिदाबादेला परत जाण्याची फारशी घाई न करतां अलीवर्दीखान आपल्या शिपायांना विसावा देत देत व आपण चालतां चालतां शिकार खेळून चित्ताचें रंजन करीत करीत मेदिनीपुरापर्यंत आला होता. तेथें तळ देऊन मुकामाला राहिला असतां दूतांनीं घाबऱ्या घाबऱ्या येऊन त्याला बातमी दिली कीं पंचकोट नांवाच्या पर्वताच्या खिंडींतून रघोजी भोसल्याचे वीस हजार स्वार भास्कररामपंडिताच्या सेनापतित्वाखालीं चौथाई हक्क मागण्याच्या मिषानें पण खरोखर बंगाल प्रांताची लूट करण्याच्या हेतूनें मुर्शिदाबादेकडे येत आहेत. मराठयांचें हें सैन्य मोहिनी

---

१ कित्येक मुसलमान इतिहासकारांनीं अतिशयोक्ति करून भास्करामाबरोबर साठ हजार बारगीर होते असें म्हटलें आहे. नागपुरकर भोसल्यांचे खबरींत ' बंगाल्यांत स्वारी करण्यासाठीं...भास्करराव यांची रवानगी करून दिली. समागमें तीस हजार फौज दिली' असा उल्लेख आहे.

२ मराठ्यांच्या या स्वारींचें कारण निरनिराळे लेखक निरनिराळ्या प्रकारें दाखवितात. मराठी बखरकार या मुद्यासंबधानें मुग्ध आहेत. ' महाराष्ट्रपुराणाचा कर्ता कवि गंगाराम म्हणतो कीं मराठ्यांनीं चौथाईचा हक्क दिल्लीच्या बादशहापाशीं मागितला असतां त्यानें आपली दैनावस्था सांगितली, पण बंगालवर स्वारी करून तो उगवून घेण्यास त्यानें परवानगी दिली. त्यावरून ही पहिली स्वारी मराठ्यांनीं केली. कित्येक मुसलमान इतिहासकार म्हणतात कीं चौथाईच्या हक्काचें निमित्तमात्र मराठ्यांनीं पुढें केलें होतें आणि दुसरे कित्येक म्हणतात कीं ओरिसाचा दिवाण मीरहबीब यानें अलीवर्दीखानचा सूड उगविण्यासाठीं त्यांना द्रव्याची लालूच दाखवून बंगालप्रांतीं बोलाविलें होतें.

पुरापासून वीस कोसांवर येऊन पोंचेपर्यंत या परचक्राची नबाबाला गंधवार्ताही नव्हती.[१] ती असून शिकारीच्या सारख्या क्रीडेच्या नादीं लागण्या इतका मूर्ख तो खास नव्हता. दिवसभर शिकार करून संध्याकाळीं तळाचे जागीं जाऊं अशा बेतानें तो शिकारीला गेला होता. पण तो संध्याकाळीं परत येईपर्यंत वाट न पाहतां त्याच्या मागोमाग अरण्यांत जाऊन दूतांनीं ही महत्त्वाची बातमी त्याला कळविली. ती ऐकून नबाब खरोखर मनांत घाबरला; पण त्यानें घाबरल्याचें चिन्ह बाहेर बिलकुल दिसूं दिलें नाहीं. त्यानें शिकारीहून परत तळाला येऊन आपल्या लोकांना धीर देण्यासाठीं जणूं काय थट्टाच करीत आहे अशा आढ्यतेनें बातमी आणणाराला विचारलें, "कायरे, कोठें आहेत तुझे ते काफर? जेथें त्यांची खोड आम्हाला मोडतां येणार नाहीं, असें स्थान पृथ्वीच्या पाठीवर कोठें असल्यास सांग." येवढें मोठें परचक्र एकाएकीं समीप येऊन ठेपलें असतांही नबाब आपल्या जागीं स्वस्थ आहे हें पाहून तो जासूद व दरबारी लोक चकित झाले व नबाबाच्या धीराची प्रशंसा करूं लागले.

---

१ मराठे चौथाई मागत असतां नवाब ती देण्याची चाळवाचाळव करीत होता. असें आज कित्येक दिवस चाललें होतें. तेव्हां तो हक्क उगविण्यासाठीं मराठे कांहींतरी खटपट करतील, स्वस्थ बसावयाचे नाहींत येवढें त्याला ठाऊक होतें. पण ते फौज घेऊन निघाल्याची बातमी ते प्रत्यक्ष जवळ येऊन पोंचेपर्यंत त्याला खरोखर नव्हती. (कालीप्रसन्न—पृ. १४४)

अलीवर्दीखानानें बाह्यतः मनाची शांतता केवढीही दाखविली, व तोंडानें कितीही बढाई मारली, तरी अंतर्यामीं तो गोंधळून गेला होता हें खास. त्यानें लागलीच आपला तळ मेदिनीपुराजवळून हलवून बर्द्वानकडे कूच करण्याचा हुकुम केला.

त्वरेनें कूच करीत नबाबाचें सैन्य बर्द्वानकडे चाललें. तिकडे जाण्यांत नबाबाचा उद्देश हा होता कीं, बर्द्वान हें मोठें शहर असल्यामुळें सैन्याला रसद मिळण्याची अडचण पडूं नये; व शत्रूशीं टक्कर देण्याला सोपें जावें. नबाब धूर्त होता. पण भास्करराम अशा बाबतींत कांहीं कमी धूर्त नव्हता. नबाब बर्द्वानकडे मोर्चा फिरवील ही गोष्ट भास्करपंडितानें अगोदरच ताडली होती; आणि आपलें सैन्य त्वरेनें हलवून त्यानें तें बर्द्वानच्या दुसऱ्या बाजूस नेऊन उतरविलें होतें. इतकेंच नाहीं, तर नबाब येऊन पोंचण्याचे अगोदरच मराठे बारगिरांनीं तेथें कांहीं लूटमार व जाळपोळही केली होती, असें बंगाली इतिहासकार ह्मणतात. बर्द्वानच्या एका बाजूला मराठ्यांचें व दुसऱ्या बाजूला नबाबाचें अशीं दोन्हीं सैन्यें उतरलीं होतीं. त्यांच्यामध्यें रोज दिवसां चकमकी उडत; व रात्रीं दोहींकडचे शिपाई आपआपल्या तळावर विश्रांतीसाठीं जात. असा प्रकार कित्येक दिवस चालला होता. लढाईला तोंड लागण्याचें जितकें लांबणीवर पडेल तितकें नबाबाच्या फायद्याचेंच होतें. कारण, तयारीला त्याला तितका वेळ अधिक मिळत होता. नबाब स्वस्थ

बसलेला नव्हता. त्यानें मुर्शिदाबादेस आपल्या पुतण्याकडे निरोप पाठवून कुमक मागविली होती. ती येईपर्यंत असेंच दबून राहणें त्याच्या फायद्याचें होतें. अलीवर्दीखानाच्या पुतण्यानें आसपासच्या प्रांतांत जे बलाढ्य जमीनदार होते, त्यांचेकडे मित्रत्त्वाचे खलीते पाठवून अशा संकटसमयीं नबाबाच्या गादीची इभ्रत ठेवण्यासाठीं व स्वतःच्या देशाच्या बचावासाठीं शक्य तेवढी मदत करा अशी विनंति अतिशय कळकळीनें केली होती.पण याच जमीनदारांवर अलीवर्दीखानानें पूर्वी जुलूम करून त्यांना अतिशय छळलें होतें, ही गोष्ट नबाबाचा पुतण्या विसरला असला तरी जमीनदार विसरले नव्हते. अर्थात् त्यांच्याकडून साह्य मिळण्याचा विशेषसा संभव नव्हता. नबाब स्वतः ही गोष्ट पूर्णपणें जाणून होता. तथापि बुडता मनुष्य गवताच्या काडीचाही आश्रय करावयाला पहात असतो व 'प्रसंग पडे बाका तो गद्धेकु कहना काका' ही म्हण त्याच्या पूर्ण परिचयांतली होती.शिवाय नबाबाची आपल्या वक्तृत्त्वशक्तीच्या सफलेतवर पूर्ण श्रद्धा होती. म्हणून नबाबानेंही स्वतः अतिशय हृदयद्रावक अशीं पत्रें स्वतःच्या सहीनें जमीनदारांस पाठवून 'मराठे बारगीर बंगालप्रांत जिंकण्यासाठीं आले आहेत, अशा वेळीं आपापले पक्षभेद बाजूला ठेवून मातृभूमीच्या रक्षणार्थ सगळे बंगाली लोक धावून न येतील तर हे दुष्ट दक्षिणी पंडत तुमच्या आयाबहिणींची विटंबना केल्याशिवाय राहावयाचे नाहींत' अशा मजकुरानें बंगाली लोकांचा देशाभिमान जागृत

करण्याचा प्रयत्न केला होता. पण कोणाकडूनही उत्तेजनपर अभिवचन येईना. मराठे लोक खरोखर बंगालप्रांत जिंकण्याच्या उद्देशानें आलेच नव्हते. त्यांना चौथाईच्या हक्काचे पैसे पाहिजे होते. पण नवाब बऱ्या बोलानें ते देईना, तेव्हां मराठ्यांच्या भाल्याचें पाणी दाखवून ते वसूल करावयाचे येवढाच मराठ्यांच्या या स्वारीचा उद्देश होता. म्हणून नवाब अडचणींत सांपडला आहे, व त्याचेजवळ फौजफाटाही मोठा नाहीं हें ठाऊक असतांही भास्करपंडितानें शांतपणानें नवाबाला निरोप पाठविला कीं, "आम्ही फार दुरून आलों आहों. असे किती दिवस स्वस्थ बसून घालवायाचे? तेव्हां आमच्या हिशेबाचे दहा लक्ष रुपये चुकते करून आम्हांला लवकर मोकळे करा, म्हणजे आम्ही संतोषानें आपल्या मुलुखाला जाऊं."[1]

पण आपल्या रसाळ वाणीचा भावना-प्रधान बंगाली जमीनदारांवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं, त्यांच्याकडून खास मदत येईल व तिच्या साह्यानें आपण मराठ्यांना बंगाल्यांतून पिटाळून लावूं, म्हणजे मग चौथाईबिथाई कांहीं

---

१ मुसलमान व बंगाली इतिहासकार या सौम्यपणाचा विपरीत अर्थ करीत आहेत. भास्करपंडितानें हा निरोप भिऊन पाठविला असें ते म्हणतात. पण त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें मराठ्यांजवळ तीस चाळीस हजार फौज व नवाबाजवळ सारी पांच हजार फौज असतां भास्करपंडिताला भिण्याचें काय कारण होतें ही गोष्ट पक्षाभिमानाच्या अंधत्वामुळें त्यांना दिसत नाहीं.

द्यावयाला नको, अशी नबाबाला पक्की खात्री वाटत होती. म्हणून त्यानें भास्करपंडिताची ही सौम्यपणाची मागणी साफ नाकबूल केली. तेव्हां मराठ्यांना अर्थात् युद्धावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. दोन तीन दिवसांतच पुनः पूर्वींसारख्या चकमकी झडूं लागल्या व लवकरच लढाईला सुरुवात झाली. मराठ्यांची गनीमी काव्याची लढाईची पद्धत नबाबाला ठाऊक नव्हती. त्यामुळें मराठे आपली फौज पुष्कळ असतांही मुद्दाम भ्याल्यासारखे दाखवून पळत सुटत व नबाबाच्या सैन्याला हुलकावण्या दाखवून लांब नेत; आणि शत्रूची फौज अडचणीचे जागीं आलेली पाहतांच उलटून हल्ला करीत, आणि शत्रूचा फडशा पाडीत. मराठे पळत आहेत असें पाहून नबाबाला वाटे कीं, आपल्याजवळ फौज थोडी आहे तरी ती सगळी एकवटून शत्रूवर एकदम छापा घातला तर या भ्याड मराठ्यांचा एका क्षणांत नायनाट करतां येईल. म्हणून त्यानें या कार्यासाठीं एक दिवस नक्की ठरविला. सैन्याबरोबरचे बाजारबुणग्यांनीं सैन्यांत शिरून गोंधळ करूं नये म्हणून त्यांना मागें ठेवून सडी फौज घेऊन जाऊन मराठ्यांवर तुटून पडावयाचें असा त्याचा बेत होता. त्याप्रमाणें त्यानें फौजेंतल्या लोकांमध्यें आपला हुकूमही फिरविला होता. दुसरे दिवशीं नबाबानें स्वतः घोड्यावर स्वार होऊन आपल्या फौजेची पाहणी केली व एकंदर सगळी रचना ठरवून मराठ्यांवर चालून जाण्याची तयारी केल्यावर कूच करण्याचा हुकूम सोडला. इकडे बाजारबुणगे मागें राहिले. त्यांना वाटलें कीं, आपण सैन्याचे आश्र-

यानें होतों तोंपर्यंत ठीक होतें. पण आतां एकटे पडलों तर मराठे आपणांस लुटून मारतील, म्हणून ते लोक नबाबाचा हुकूम अमान्य करून त्याच्या फौजेंत एकदम येऊन शिरले. त्यामुळें जो गोंधळ टाळण्यास नबाब पाहत होता तो अगदीं ऐनवेळीं त्याच्या फौजेंत झाला. हा गोंधळ ऐकून मराठे सावध झाले व त्यांनीं नबाबाच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हां दोन्ही फौजांची लढाई सुरू झाली. मराठ्यांनीं चारी बाजूंनीं नबाबाच्या फौजेला घेरलें. नबाबाच्या फौजेला पळून जाण्यालासुद्धां वाट उरली नाहीं. कापाकापी सुरू झाली. रक्ताचे प्रवाह वाहूं लागले. मुसलमान जीवाविषयीं निराश झाल्यामुळें अतिशय त्वेषानें लढले. हा प्रकार चालला असतांना मराठ्यांनीं नबाबाच्या बेगमांचा हत्ती होता त्याला वेढा घातला. आतां बादशहाचा जनानखाना शत्रूच्या हातीं लागणार हें पाहून मुसलमानांना मनस्वी चीड आली. मुसलमान सेनापतीचा मुलगा मुसाहिबखा हा तत्काळ बेगमांच्या साह्यार्थ धावून आला, व त्यानें लढण्याची शिकस्त करून शत्रूच्या हातून त्यांना सोड-विलें. पण हा शूर तरुण वीर आपल्या मर्दुमकीबद्दलचें इनाम नबाबाच्या हातून घेण्यास राहिला नाहीं. तो लढतां लढातांच लढाईंत ठार झाला. त्याचे अनेक शूर सोबतीही त्याच्याबरोबर मारले गेले. मराठे अनावर झाले. हें पाहून अलीवर्दीखानानें एक हिकमत लढविली. मराठे लोक द्रव्याचे लालची आहेत हें त्याला ठाऊक होतें. म्हणून त्यानें प्रसंगा-

वधान ठेवून यावेळीं आपल्या थैलीचें तोंड खुलें केलें; आणि तो हत्तीवरून हजारों रुपये, पुतळ्या, मोहरा वगैरे उधळूं लागला. नबाबाची युक्ति सिद्धीला गेली. मराठे द्रव्याच्या लोभाला बळी पडले. ते लढण्याचें सोडून देऊन उधळलेल्या मोहोरा व पुतळ्या वेचूं लागले. बुभुक्षित लांडग्याप्रमाणें मराठ्यांच्या झुंडीच्या झुंडी त्या द्रव्याकडे आकर्षिल्या गेल्या. मराठे शिपाई द्रव्य वेचण्यांत गुंतलेले पाहून नबाबानें तेवढी संधी साधून रणांगणांतून पळ काढला[1].

नबाब अलीवर्दीखान रणक्षेत्रांतून निघाला तो बर्द्वानच्या रस्त्याला लागला. नबाब पळून गेल्यावर त्याचे लोक तरी कशाला लढतील? तेही पळून गेले. पळण्याच्या धांदलींत सामानसुमानसुद्धां नेण्याचें भान त्यांना राहिलें नाहीं. तें सगळें मराठ्यांचे हातीं लागलें. मुसलमान पळून गेल्यावर अर्थातच मराठ्यांना आयतेंच फावलें. ते गांवांत शिरून लूट करूं लागले. या लुटीबद्दल मुसलमान इतिहासकार मराठ्यांना निष्कारण दोष देत आहेत. शत्रूची दाणादाण झाल्यावर

---

१ मराठ्यांनीं द्रव्याच्या लोभाला बळी पडून रणांगणावर अशा प्रकारचें लज्जास्पद वर्तन केल्याबद्दलची ही गोष्ट फक्त एकच मुसलमान इतिहासकार देतो. बाकीचे कोणी ती देत नाहींत. तेव्हां या गोष्टीवर कितपत विश्वास ठेवावा तें कळत नाहीं. मराठ्यांनीं यापूर्वी केव्हांही असें वर्तन केल्याचा उल्लेख इतिहासांत आढळत नाहीं. तेव्हां बहुधा ही गोष्ट स्वकपोलकल्पित असावी.

कोणत्या विजयी लोकांनीं लूट करण्यास कमी केलें आहे? मग मराठ्यांनीं ती केली याबद्दल तेच तेवढे दोषाला पात्र कसे ठरतात?

नबाबानें पळ काढला तेव्हां संध्याकाळ होण्याचा सुमार होता. अंधाऱ्या रात्रीमुळें पुढें जाणें शक्य नव्हतें. परत बर्द्वा-नला जावें तर मराठ्यांचें भय. तेव्हां नबाब बुचकळ्यांत पडला. तथापि अंमळ विचार करून वाटेंतच मुकाम कर-ण्याचा त्यानें निश्चय केला. पण त्याच्या लोकांचें सगळें सामान मराठ्यांच्या हातीं लागलें होतें. उतरण्याला जागा मिळाली खरी; पण थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठीं नबाबाच्या योग्यतेप्रमाणें डेरे, तंबू वगैरे सामान कोठें होतें? शेवटीं बंगाल, बहार व ओरिसा या तीन प्रांतांच्या नबाबाला शिपा-याच्या राहुटींत रात्र काढण्याचा प्रसंग आला! दैवगति विचित्र ह्मणतात ती ही अशी!

प्रकरण पांचवें.

नबाबाच्या सैन्याची दुर्दशा.

नबाब अलीवर्दीखानाचा या पहिल्या लढाईंत पराभव होण्याला अनेक कारणें झालीं होतीं. त्यांतलें एक कारण हें होतें कीं, त्याच्या सैन्यावरील अधिकाऱ्यांचीं मनें त्याच्याविषयीं शुद्ध नव्हतीं. नबाबाच्या बोलांत बोल नसे. लढाईसारख्या अडचणीच्या प्रसंगीं शिपायांना लढण्यास ईर्षा चढावी म्हणून तो हवीं तेवढीं इनामें देण्याचीं वचनें देई. त्या इनामांच्या आशेनें शिपाई प्राणांवर उदार होऊन लढत. पण तेवढी वेळ निघून गेली, आणि शत्रूवर जय मिळविला, म्हणजे नबाबाला आपल्या वचनांचें पूर्ण विस्मरण पडत असे. यामुळें शिपायांचा विरस होई व दुसऱ्या प्रसंगीं ते मनापासून लढत नसत. या लढाईच्या वेळीं असेंच झालें होतें. शिवाय नबाबाच्या फौजेंत अफगाणांचा भरणा बराच होता. या अफगाणांचा एक सरदार रहिमखा याला नबाबाचा पुतण्या जैनुद्दिन अहमद यानें कांहीं क्षुद्र कारणावरून मारलें होतें, व त्याबद्दल नबाबानें आपल्या पुतण्याला कांहींच शासन केलें नव्हतें. त्यामुळें अफगाण लोक बिथरले होते. तिसरें आणखी एक कारण असें झालें होतें कीं, मयूरभंज येथील राजानें नबाबाचा शत्रु जो बाकरखा त्याला साह्य

केलें असा त्याच्यावर आरोप ठेवून त्या राजाचें पारिपत्य करण्याची नबाबानें प्रतिज्ञा केली होती. ती ऐकल्यावरून राजा भयाभीत होऊन अफगाण लोकांचा सेनापति मुस्तफाखा याला शरण गेला होता व त्याला पुष्कळ द्रव्य वगैरे देऊन त्यानें वश करून घेतलें होतें. आणि मुस्तफाखानानें त्याला अभय वचन दिलें होतें. तें पाळण्यासाठीं मुस्ताफानें त्या राजाबद्दल नबाबाजवळ अतिशय आग्रहपूर्वक रदबदली करून पाहिली. पण नबाबानें त्याचें न ऐकतां सेनापति मीरजाफर याजला त्याचेवर पाठवून त्याला ठार मारविलें होतें. यावरून मुस्ताफा नबाबावर अतिशय चिडला होता. मुस्ताफा याचें अफगाण लोकांत अतिशय वजन होतें. तो त्यांच्यांत अतिशय लोकप्रिय होता. तोच नबाबाविषयीं विरक्त झाला, तेव्हां सगळे अफगाण एका जुटीनें या लढाईंत तटस्थ राहिले होते.

अशा रीतीनें सर्वस्वीं पेंचांत सांपडल्यावर नबाबाची गुर्मी अर्थातच उतरली. आपणास संकटांनीं सर्व बाजूंनीं घेरलें आहे, आणि साह्यकर्ता तर कोणी दिसत नाहीं, हें पाहून नबाबाच्या मनाला अतिशय पश्चात्ताप झाला. पण होऊं नये तें झालें, आतां पश्चात्ताप करून काय उपयोग? आलेल्या प्रसंगाला मुकाट्यानें पाठ दिली पाहिजे, असा विचार करून कोणत्या तरी उपायानें मराठयांची ब्याद एकदांची हद्दीबाहेर घालवून दिली पाहिजे, म्हणून त्यानें पडती बाजू घेण्याचा विचार केला. मराठयांची मागणी कबूल केल्याशिवाय आतां

गत्यंतर नाहीं असें पाहून तो तिला कबूल झाला, आणि मीरखैरउल्ला नांवाच्या एका उच्चप्रतीच्या सरदारास त्यानें बोलावूं पाठविलें. हा सरदार मूळचा दक्षिणेकडील राहणारा होता. त्याला मराठी भाषा येत होती व मराठ्यांच्या स्वभावांतल्या खुब्याही तो जाणत होता. त्याला दुभाष्या करून अलीवर्दीखानानें बर्द्वानच्या राजाला आपला वकील म्हणून भास्करपंडिताकडे पाठविलें व त्याच्या हातीं निरोप पाठविला कीं, तुमच्या म्हणण्याप्रमाणें दहा लक्ष रुपये देण्यास मी कबूल आहें, आपण आतां आमच्या मुलुखास त्रास न देतां निघून जावें. वकीलानें हा निरोप भास्करपंडिताला जशाचा तसाच सांगितला. तो ऐकून भास्करपंडित हंसून म्हणाले, " राजासाहेब, नबाबसाहेब आतां पेंचांत सांपडले आहेत; रसद बंद झाल्यामुळें लोकांची उपासमार होत आहे; तुमच्या तोफा, दारूगोळा, तलवारी वगैरे शस्त्रास्त्रें तुमच्याजवळून हिसकावून घेऊन आमच्या लोकांनीं तुमच्या लोकांस गराडा घातला आहे; आतां आमच्या तडाख्यांतून सुटण्यास तुम्हांला मार्ग राहिला नाहीं; म्हणून नबाबसाहेब आमची मागणी कबूल करण्यास तयार झाले आहेत. पण त्यांना आमचा असा निरोप सांगा कीं, आपण बंगालचे नबाब व दिल्लीच्या बादशहाचे सन्मान्य सुभेदार आहां, आपला दर्जा फार मोठा आहे. आपल्या जीवावर लक्षावधि लोकांचें जीवित अवलंबून आहे. अर्थात् आपल्या दर्जाप्रमाणें

आपल्या जीवाची किंमतही मोठी आहे. आम्हीं प्रथमच दहा लाख रुपये आणि तेही आपल्या हक्काचे मागितले, तेव्हां तेआपल्याच्यानें देववले नाहींत. आतां दहा लाखांची गोष्ट विसरा आणि एक कोट रुपयांचे तोडे पुढें ठेवून आपल्या जवळचे सगळे हत्ती आमचे स्वाधीन कराल तर तहाचें नांव काढा. नाहींतर ज्याला त्याला त्याचा मार्ग मोकळा आहेच.

हा जबाब घेऊन खैरउल्ला व बर्द्वानचे राजेसाहेब नबाबाच्या डेऱ्याला परत आले. तेव्हां त्यांच्या खिन्न मुद्रेवरून नबाबानें ताडलें कीं काम फत्ते झालें नाहीं. त्याची अटकळ खरी ठरली. त्या दोघांनीं भास्करपंडिताचें उत्तर नबाबाला अक्षरशः कळविलें, तेव्हां तो चकित झाला. मराठ्यांची उडी येवढी मोठी असेल अशी त्याला कल्पना झाली नव्हती. भास्करपंडिताच्या उत्तरांतली खोच कळून तर नबाब फारच चिडला. त्याला तो अपमान सहन होईना. पण या अपमानाचा सूड कसा उगवावा तो मार्गही त्याला दिसेना. त्यामुळें मनांतल्या मनांत तो चरफडूं लागला. यावेळीं नबाबाजवळ त्याच्या सैन्याच्या हिशेबखात्याचा फडणीस राजा जानकीराम हा एकटाच होता. तो नबाबाच्या अत्यंत विश्वासांतला असल्यामुळें नबाब अशा नाजूक बाबतींत त्याची सल्लामसलत विचारीत असे. नबाब सचिंत बसलेला पाहून जानकीराम नम्रपणानें म्हणाला, " हुजूर, प्रसंग कठीण आहे खराच. आपले सगळे लोक निरुत्साह झालेले आहेत व गनीमांनीं जोरावर येऊन आपल्या सैन्याभोंवतीं गराडा घातला

आहे. अशा स्थितींत शत्रुची मागणी कबूल न केली तर हजारों जीवांचा निष्कारण संहार होईल. कोट रुपयांची किंमत काय? " शीर सलामत तर पगडी पचास." आज आपलेबरोबर चाळीस लक्ष रुपये रोख आहेत. बाकीची रकम पाहिजे तर मी कोठून तरी आणून देतों. आपण ही मागणी कबूल करावी यांत खरी दूरदृष्टि आहे. शत्रू हत्ती मागत आहे. ते देणें कांहीं आपणांस मुष्किलीचें नाहीं. आपल्या प्रांतांत हत्तींचा काय तोटा पडला आहे! आपल्या सरदारांच्या तैनातींत सुद्धां हजारों हत्ती आहेत. तेव्हां ही मागणी एकदम कबूल करून आजचें संकट एकदाचें टाळावें. पुढचें पुढें पाहतां येईल.

जानकीरामाची ही मसलत नवाबाला पटली नाहीं. तो म्हणाला, ' राजेसाहेब, तुह्मी म्हणतां ती गोष्ट खरी आहे; पण ही मसलत मला प्राणांतींसुद्धां पटणारी नाहीं. शत्रूची अशी अपमानकारक मागणी कबूल करण्यापेक्षां प्राण गेले तरी बेहत्तर आहेत. आपल्याजवळ थोडेसें सैन्य आहे. तेवढ्यावरच शत्रूशीं सामना करून मारूं किंवा मरूं, पण शत्रूच्या हातून अशी विटंबना मी तरी कधीं करून घेणार नाहीं. आज कोट रुपयांची त्यांची मागणी कबूल केली तर उद्यां ते शेफारून जाऊन दहा कोटींची मागणी करणार नाहींत कशावरून? माझ्या जीवासाठीं जीव देण्यास तयार असलेले पुष्कळ लोक माझेपाशीं आहेत. मी अशी मानखंडना पतकरली, तर त्यांना मीं तोंड कसें दाखवावें? जानकीराम. ही गोष्ट माझेजवळ

अगदीं बोलूं नका. ती माझे हातून कदापि होणार नाहीं. तुमच्या जवळ चाळीस लक्ष रुपये आहेतना ? द्या त्यांतले दहा लक्ष मला आतां आणून. मी ते आपल्या शूर शिपायांना इनामाखातर वाटून दिले, तर माझ्यासाठीं जीवावर उदार होऊन लढण्यास त्यांना उत्तेजन तरी येईल.' नबाबाचें हें निग्रहाचें उत्तर ऐकून जानकीराम निरुत्तर होऊन उठून गेला. त्याच्या मागोमाग खैरउल्ला व बर्द्वानचा राजा हेही निघून गेले.

आतां नबाब अलीवर्दीखान रात्रीचे वेळीं एकटा आपल्या तंबूंत विचार करीत पडला होता. इतक्यांत त्याच्या डोक्यांत एक विचार आला, आणि त्या सरशीं तो ताडकन् उठला व पोषाख करून आपला नातू सुराजउद्दौला याच्यासह अफगाण-सेनापति मुस्तफाखा याच्या छावणींत गेला. येवढ्या अंधाऱ्या-रात्रीं नबाबाची स्वारी एकाएकीं आपल्या छावणींत आलेली पाहून मुस्तफा फार चकित झाला. पण नबाबानें फार वेळ त्याला संदेहस्थितींत ठेविलें नाहीं. त्याला आपला येण्याचा उद्देश तत्काळ कळवून नबाबानें म्हटलें, ' भाईसाहेब, माझ्या हातून तुम्हाला न रुचण्यासारखीं कांहीं कृत्यें आतांपर्यंत झालीं असतील; पण तेवढ्यावरून रुसून सगळ्या मुसलमानी राज्याचा नाश झालेला पाहणें तुमच्यासारख्या थोर व शहाण्या सरदारास शोभणार नाहीं. माझ्या हातून तुमचा मोठा कांहीं अपराध घडला असेल, तर ही समशेर घ्या व हिनें माझी व माझा हा नातू सुराज याची मुंडी कापून तुम्ही आपला राग

शांत करून घ्या; पण आमच्या दोघांकरितां आज हजारों जातभाईंचीं शिरें कापलीं जाण्याचा प्रसंग आला आहे, अशा-वेळीं मुसलमानी राज्याची इज्जत राखणें तुमचे हातीं आहे. आपल्या धर्मबांधवांच्या रक्षणासाठीं व अल्लाच्या गौरवाची वृद्धि करण्यासाठीं तरी तुम्ही आपल्या समशेरीचें पाणी या चोरट्या गनीमांना दाखवून त्यांना आपल्या हद्दीच्या पार हाकून लाविलें पाहिजे. मी जर तुमचें कांहीं भलें केलें असेल, तर त्याबद्दलची कृतज्ञता दाखविण्यास हीच उत्तम संधी आहे. अशी संधी पुनः मिळणार नाहीं. कारण, या प्रसंगातून मी जिवंत सुटतों, कीं यांतच माझ्या आयुष्याची इतिश्री होते याचा नेम कोणीं सांगावा ? आतां आम्हां सर्वांची भिस्त तुमचेवर आहे. तुम्हीच तारा किंवा मारा.' नबाब आपल्या डेऱ्याला आला हाच अगो-दर मोठा सन्मान मुस्तफा समजला. येवढा मोठा ऐश्वर्यशाली व मानी नबाब आपणांस शरण आलेला व दीनवाणीनें याचना करीत असलेला पाहून तर तो अगदींच विरघळला, आणि त्यानें ‘ शत्रूचा निःपात करीन, तेव्हांच हातांतली समशेर खालीं ठेवीन ’ अशी प्रतिज्ञा करून नबाबादेखत आपल्या अफगाण सरदारांना बोलावून आणून प्राण गेला तरी बेहेत्तर आहे, पण लढाईची शिकस्त करावयाची अशा शपथा त्यांचेकडून घेव-विल्या. आपण योजिलेला बेत सिद्धीला गेला हें पाहून नबाब संतुष्ट होऊन परत आपल्या डेऱ्याला आला.

नबाब व मुस्तफा यांच्यामधील हा संवाद विस्तारानें देण्याचें कारण अलीवर्दीखान कसा युक्तिबाज व मधुरभावी

होता व प्रसंगीं पड खाऊन तो आपला मतलब कसा साधीत असे हें दाखवावें हा होय. नबाबानें डेऱ्याला परत आल्यावर दुसरे दिवशीं लढाईचे वेळीं सैन्याची रचना कशी ठेवावयाची याचा विचार करण्यांत व नकाशा तयार करण्यांत बाकीची रात्र घालविली. सैन्याच्या मध्यभागीं बरोबरचा खजीना व जडजवाहीर वगैरे सामान ठेवून भोवतालीं तोफखाना ठेवावयाचा असा त्यानें बेत केला. हा बेत मुस्तफाखालाही पसंत पडला. अशा बंदोबस्तानें मुर्शिदाबादेकडे जावयाचें, व वाटेंत पहिला मुकाम कटवा येथें करण्याचें ठरलें.

ज्या रात्रीं हा प्रकार घडला त्याच रात्रीं काकतालीय न्यायानें मराठ्यांनाही नबाबाच्या छावणी जवळच तोफ लावून ठेवण्याची बुद्धि झाली. त्यांनीं नबाबाच्या सैन्यांतली लुटींत सांपडलेली एक मोठी तोफ एका प्रचंड खोडाच्या वृक्षाच्या आड लावून त्या तोफेंतून नबाबाच्या छावणीवर गोळ्यांचा मारा करण्यास सुरवात केली. नबाब अंधार आहे तोंच उठून आदले रात्रीं ठरविल्याप्रमाणें सैन्याची रचना करणार, तोंच आपल्या शिपायांचा आर्तनाद त्याचे कानीं आला. बर्द्वानच्या महाराजाचा दिवाण माणिकचंद हा ही तितक्यांत घाबऱ्या घाबऱ्या येऊन पळून जाण्याविषयीं नबाबाला आग्रहानें सांगूं लागला. इतक्यांत मराठे बारगिरांनीं नबाबाच्या छावणीवर छापा घातला. नबाबाला सैन्याची रचना करण्यास अवधि मिळण्याचे अगोदरच युद्धाला तोंड लागलें. या लढाईंत मुस्तफाखाचे कडवे अफगाण

शपथ घेतल्याप्रमाणें खरोखर फार शिकस्तीनें लढले. त्यामुळें मराठ्यांना माघार घ्यावी लागली. ही संधी साधून नबाब व त्याचे लोक कटव्याच्या रस्त्याला लागले. मराठे पुनः त्यांचे पाठीस लागले. पण लवकरच त्यांनीं तो पाठलाग सोडला. तेव्हां चौदा दिवसांत जी विश्रांति नबाबाला कधीं मिळाली नव्हती ती यावेळीं थोडीशी मिळाली.

नबाब आपल्या लोकांसह मराठ्यांच्या हातून निसटला खरा; पण खजिना व इतर सामानसुमान मराठ्यांच्या हातीं लागलें. बर्द्वान आणि कटवा याच्यामध्यें सारें सात कोसांचें अंतर, पण तेवढें चालून जाण्यास नबाबाच्या लोकांना तीन दिवस लागले! यावरून त्याचे लोक किती थकून गेले होते याची कल्पना करतां येईल. शीण तर हा असा, आणि जवळ खाण्यास तर कांहीं नाहीं. भुकेनें प्राण व्याकुळ झालेले. अन्नसामग्री शत्रूच्या हातीं लागली होती. खाणार काय? आसपासच्या गांवांतून कांहीं खाण्यास मिळेल हा संभव नव्हता. कारण, भोंवतालच्या पांच पांच कोसांच्या आंतल्या गांवचे लोक मराठ्यांच्या भयानें आपलीं घरेंदारें सोडून पळून गेले होते. शेवटीं झाडांचा पाला व कोंवळें गवत खाऊन मुसलमानांना आपला जठराग्नि शमवावा लागला! अंग झांकण्याइतकी वस्त्राची चिंधीसुद्धां फार थोड्यांच्या पाशीं राहिली होती!

तवारीख–इसुफीचा कर्ता युसफअलीखा हा स्वतः या स्वारींत होता. त्यानें प्रत्यक्ष पाहिलेल्या मुसलमान लोकांच्या हालांचें

जें वर्णन लिहून ठेविलें आहे त्यांत तो म्हणतो—गेल्या तीन दिवसांत सातजणांमिळून तीन पाव खिचडी आमच्या पोटांत गेली असेल नसेल. शेवटल्या दिवशीं तर कांहींच खाण्यास मिळालें नाहीं. तेव्हां मेलेल्या ढोरांचें मांस खावें लागलें. आम्ही तें खात असतां त्यांतला एक घांस तरी आम्हांला द्या ह्मणून अनेक शिपाई आमची अतिशय काकुळतीनें प्रार्थना करीत होते! सारांश, या वेळचे मुसलमानांचे हाल केवळ वर्णनातीत होते.

येवढ्यानेंच नबाबाची ग्रहदशा संपली नाहीं. मराठ्यांची जात फार चपळ. ते वेळ पडल्यास एका दिवसांत तीस तीस कोस चालून जात. नबाब रडत खडत कटव्याला जाऊन पोंचण्याचे आधींच मराठे दुसऱ्या मार्गानें तेथें जाऊन पोंचले होते, व त्यांनीं तो गांव लुटून, लोकांच्या घरांना व धान्यांच्या कोठारांना आगी लावून दिल्या होत्या. मुसलमान तेथें जाऊन पोंचले, तेव्हां आतांतरी आपणांस पोटभर भात खाण्यास मिळेल अशी त्यांना मोठी आशा वाटत होती. पण शिजविलेल्या भाताचे ऐवजीं जळालेल्या तांदुळांच्या पोत्यांतले भाजके तांदूळ मात्र त्यांच्या हातीं लागले! तरी 'भुकेस कोंडा' या म्हणीप्रमाणें त्यांनीं तेच खाऊन तृप्ति करून घेतली. पण अशा रीतीनें किती दिवस निर्वाह चालावयाचा? शेवटीं मुर्शिदाबादेहून भाकरी भाजून आणाव्या आणि खाव्या असा

क्रम चालवावा लागला. गुरांसाठीं वैरणही तेथूनच आणावी लागत असे.

अतिशय अडचणींत दिवस काढण्याची मराठ्यांना संवय होती, तशी मुसलमानांना नव्हती.त्यामुळें जी हालाची स्थिति मराठ्यांना इतकी असह्य वाटली नसती, ती मुसलमानांना अतिशय असह्य वाटली. मुसलमान इतिहासकारांनीं या स्थितीचें अत्यंत हृदयद्रावक वर्णन केलें आहे त्याचें मूळ या गोष्टींत आहे. वस्तुतः युद्धांत शिपायांना घोड्यांचे मांसावर निर्वाह करण्याचे प्रसंग अजूनही कित्येक वेळां येतात; कित्येक वेळां तर तेंही त्यांना प्राप्त न होतां दोन दोन दिवस अगदीं दातांशीं दांत लावून काढण्याचे प्रसंग आलेले आहेत. पण मुसलमान अशा कष्टांना व हालांना अपरिचित असल्यामुळें त्यांना ते वर्णनातीत वाटले. तथापि येवढी गोष्ट खरी कीं, अशा प्रसंगीं आलेल्या स्थितीस तोंड देऊन दिवस काढण्यास मनाचें असामान्य धैर्य लागतें. तें धैर्य मुसलमानांनीं यावेळीं अप्रतिम दाखविलें. या संबंधानें लिहितांना हॉलवेल नांवाच्या एका इंग्रज लेखकानें पुढील उद्गार काढले आहेत.

" If we consider the retreat of these veterans in all its circumstances, it will appear as amazing an effort of human bravery as the history of any age or people have chronicled"—Holwell's Interesting Historical Events.

प्रकरण सहावें.

बंगालची लूट.

नबाबाचें सैन्य कटव्याला जाऊन पोंचल्यावर फार दिवस त्याला असे हाल सोसावे लागले नाहींत. मुर्शिदाबादेहून अन्नसामग्रीचा पुरवठा होऊं लागल्यापासून मुसलमानांना हुरूप वाटूं लागली. इकडे पावसाळा जवळ येऊन ठेपला असें पाहून मराठ्यांनाही स्वदेशीं जावेंसें वाटूं लागलें. त्यांना खूप लूट मिळाली होती; त्यांना हात हलवीत परत जावयाचें नव्हतें. पण नबाब अलीवर्दीखानाची खोड न जिरवितां मराठ्यांनीं परत जावें हा विचार मीरहबीब याला रुचला नाहीं. तो मराठ्यांना फितूर झालेला होता; व भास्करपंडितानें त्याला आपल्या विश्वासांत घेतलें होतें. बंगालप्रांताची त्याला खडान्‌खडा माहिती होती. असा माहितगार मनुष्य मराठ्यांना हवाच होता, म्हणून ते त्याची मर्जी कधीं मोडीत नसत. मराठे परत जाण्याचा विचार करीत आहेत, हें मीरहबीव याला कळतांच तो भास्करपंडिताकडे गेला व युक्तीच्या चार गोष्टी सांगून त्यानें तो विचार मोडून काढला. मीरहबीबचा भाऊ मीरशरीफ हा मुर्शिदाबादेस राहत होता. मीरहबीबनें फितुरी केली हें कळतांच नबाबानें मीरशरीफला मुर्शिबादच्या अधिकाऱ्यांकडून कैद

करविलें होतें. मीरहबीबला आपल्या भावाची कैदेंतून सुटका करावयाची होती. म्हणून त्यानें भास्करपंडिताला सल्ला दिली कीं, तुम्ही माझ्याबरोबर सातशें घोडेस्वार द्या म्हणजे मी त्यांना घेऊन भागीरथीच्या पश्चिम तीराच्या बाजूनें मुर्शिदाबादेवर हल्ला करीन. मुर्शिदाबाद ही नबाबाची राजधानी असल्यामुळें तें शहर संपन्न होतें. तें लुटल्यास अगणित संपत्ति मिळेल. भास्करपंडितानें लुटीच्या आशेनें या गोष्टीला संमति दिली. मीरहबीबनें सातशें मराठे बारगीर बरोबर घेऊन ठरल्याप्रमाणें मुर्शिदाबादेवर हल्ला केला; आणि मीरशरीफची सुटका केली. अलीवर्दीखानाच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठीं भास्करपंडित कटव्याजवळ राहिला होता. त्यामुळें प्रत्यक्ष आपल्या राजधानीवर शत्रु हल्ला करीत आहेत हें माहित असतांही त्याला तिच्या रक्षणाची कांहींच तजवीज करतां येईना. मीरहबीबनें मुर्शिदाबादेंत जगत्शेट, मुरादअलीखान, राजा दुर्लभराम * वगैरे श्रीमंत लोकांचीं घरें लुटलीं. यावेळीं एकट्या जगत्शेटाच्या वाडयांत दोन कोट रुपयांची लूट मराठयांना मिळाली असें सांगतात. यावरून बंगालच्या त्यावेळची संपत्तीची कल्पना

* राजा दुर्लभराम हा राजा जानकीराम याचा मुलगा व ओरिसाप्रांताचा सुभेदार होता. याला पूर्वी मराठ्यांनीं पकडून खंडणी दिल्यावर सोडून दिलें होतें. त्यानंतर हा संन्याशांच्या संगतींत राहूं लागला. हे संन्यासी मराठ्यांचे गुप्त हेर असल्यामुळें त्यांच्या मार्फत नबाबाकडील गुप्त बातमी मराठयांना कळत असे.

करतां येईल. या लुटींत सांपडलेल्या बऱ्याचशा मोहोरा अर्काटच्या छापाच्या होत्या. अर्काट हें दक्षिणेंत कर्नाटकाच्या नबाबाच्या राजधानीचें शहर होतें. तेथल्या मोहोरा बंगाल्यांत इतक्या दूर कशा गेल्या याचा खुलासा कोठें सांपडत नाहीं. बहुधा यावेळीं बंगाल व कर्नाटक या प्रांतांचें परस्परांशीं व्यापारी दळणवळण विशेष असावें असें वाटतें.

मराठ्यांच्या कचाट्यांतून सुटण्याची संधी केव्हां मिळेल इकडे मुस्ताफाखाचें बारीक लक्ष होतें. एके दिवशीं अशी संधी त्याला मिळाली. मराठे बारगीर स्नान वगैरे करून देवाची पूजाअर्चा करण्यांत गुंतले होते. कोणी चुलीची आराधना करीत होते. नबाबाच्या सैन्याचा हल्ला अशावेळीं एकाएकीं येईल असें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. इतक्यांत एकदम मुस्ताफा आपलें अफगाण सैन्य घेऊन आला. त्यामुळें त्यांची मनस्वी धांदल उडाली. ते देवपूजा व स्वयंपाकाचें साहित्य तसेंच टाकून पळत सुटले. बुभुक्षित मुसलमानांना आयतीच खाद्यसामग्री मिळाल्याबद्दल व मराठ्यांच्या कचाटयांतून सुटल्याबद्दल मनस्वी आनंद झाला.

नबाबाचें सैन्य थेट मुर्शिदाबादेस जाण्यासाठीं तडक निघालें. आपल्या राजधानीची काय अवस्था मराठ्यांनीं केली आहे कोणास ठाऊक ! अशी भीति नबाबाला सारखी लागून राहिली होती. ती व्यर्थ नव्हती, हें नबाबाला लवकरच दिसून आलें. मराठ्यांनीं सगळें मुर्शिदाबाद शहर लुटून फस्त केलें होतें.

आपल्या राजधानीची ती अवस्था पाहून नबाबाच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. नबाब सैन्य घेऊन मुर्शिदाबादेला आल्याचें ऐकून मीरहबीबनें मुकाट्यानें कटव्याचा रस्ता धरला.

मीरहबीब याच्या सल्लयावरून मराठ्यांनीं पर्जन्यकाळांत स्वदेशीं परत जाण्याचा विचार फिरवून कटव्यासच राहण्याचा निश्चय केला. कटव्याच्या उत्तरेस सांकाई नांवाच्या गांवीं नबाबाचा एक भुईकोट किल्ला होता; व त्या गांवचे लोक मराठ्यांच्या भीतीनें घरेंदारें सोडून निघून गेले होते. तेव्हां मराठ्यांना त्या किल्ल्यांत आयतीच निवाऱ्याची जागा मिळाली. मराठ्यांच्या छावणीनें कटव्यापासून दाईहाटपर्यंत तीन कोस जागा व्यापिली होती. त्यांनीं मधून मधून बाहेर पडून आसपासचीं गांवें लुटावीं व त्या लुटीवर स्वारीचा खर्च चालवावा असें चाललें* होतें.

पण केवळ लुटालूट करून तिच्यावर दिवस काढावे हें मराठ्यांना बरें वाटेना. त्यापेक्षां स्वदेशीं परत जाऊन पावसाळा

---

* महाराष्ट्रपुराणांत वीरभूमपासून नवद्वीपापर्यंत सगळा मुलूख मराठ्यांनीं उध्वस्त केल्याचा व तसें करतांना स्त्रियांवर अत्याचार केल्याचा उल्लेख आहे. या प्रदेशांत मराठ्यांच्या अत्याचारांविषयींच्या दंतकथा अद्याप प्रचलित आहेत. मराठ्यांनीं हिंदुस्थानांत अनेकप्रांतांतून अनेकवार मुलुखगिऱ्या केल्या, पण स्त्रियांसंबंधानें अत्याचार केल्यासंबंधाचा कलंक त्यांनीं स्वतःला कधींच लावून घेतला नाहीं. असें असतां याच स्वारींत त्यांचेवर हा भयंकर आरोप कां यावा तें कळत नाहीं.

संपल्यावर पुनः यावें हा विचार मधून मधून उचल खात असे. मीरहबीबला हें नको होतें. ह्मणून तो प्रत्येक वेळीं तो विचार मोडून काढीत असे. शेवटीं त्यानें हुगळीप्रांत मराठ्यांना मिळवून देण्याचा विचार केला.

हुगळी येथें महमदयारखा नांवाचा मुसलमान सुभेदार होता. मीरहबीब यानें त्याचे दोघे नातलग मीरअबुलहुसेन व मीरकासम यांना वश करून घेऊन एकेरात्रीं त्याला निरोप पाठविला कीं, तुह्मांला कांहीं विशेष जरूरीच्या कामासाठीं भेटावयाचें आहे, परवानगी असावी. महदमयारखाला त्यांच्या कटाची कांहींच गंधवार्ता नसल्यामुळें, त्यानें त्यांना भेटीसाठीं येऊं दिलें. मीरहबीब यानें भेटीस जातांना हत्यारें लपविलेले असे पंधरा निवडक विश्वासु इसम बरोबर घेतले होते. यारखानानें मीरहबीबला आंत घेण्यासाठीं महालाचें दार उघडतांच हे लोक आंत घुसले व त्यांनीं यारखानाला पकडून कैद केलें. मीरहबीबनें जिजाराव नांवाच्या एका मराठा सरदाराच्या हाताखालीं मराठ्यांच्या सैन्याची एक तुकडी हुगळीपाशीं आणून ठेविली होती. सुभेदार यारखान याला कैद केल्याची बातमी समजतांच तिनें हुगळी शहराची नाकेबंदी करून तें शहर आपल्या ताब्यांत घेतलें; आणि सुभेदाराच्या वाड्यावर मराठ्यांचा झेंडा लाविला.

अशा रीतीनें हुगळी हस्तगत झाल्यावर मराठ्यांनीं कांहीं दिवस कटव्यास व कांहीं दिवस हुगळीस रहावें अशा रीतीनें

आपल्या सत्तेचीं दोन केंद्रस्थानें केलीं. त्यांनीं दाईहाटाच्या घाटावर मोठमोठ्या नावा बांधून त्यांचा एक पूल तयार केला; व त्या पुलाच्या साह्यानें भागीरथीनदीवरून ते पैलतीराला गेले; आणि क्रमानें एकेक प्रांत एकेक प्रांत आक्रमण करीत चालले. बर्द्वान व मेदिनीपूर हीं शहरें त्यांनीं घेतलीं. ओरिसाप्रांतांतलें बालेश्वर (हल्लींचें बालासोर) हें बंदरही त्यांनीं घेतलें. मराठ्यांचा दरारा सगळ्या बंगालप्रांतांत यावेळीं इतका बसला कीं, ते जात तिकडे त्यांचें नुसतें नांव ऐकून ठिकठिकाणचे अधिकारी आपला प्रांत मुकाट्यानें सोडून जात. श्रीमंत, मध्यमप्रतीचे व गरीब लोक कोणी डोंगरांतून तर कोणी रानांतून झाडांच्या आश्रयानें राहून दिवस काढीत. अशा रीतीनें ओरिसा, मेदिनीपूर, बर्द्वान, राजशाही वगैरे जिल्ह्यांचा बराचसा भाग, अकबरनगर व राजमहाल हे सगळे प्रांत मराठ्यांच्या हातीं आले. नबाब अलीवर्दीखानाचा अधिकार फक्त मुर्शिदाबाद व गंगानदीच्या पूर्वतीरावरील कांहीं प्रांत यांपुरताच राहिला होता. मुर्शिदाबादचे लोकही मराठ्यांच्या भीतीनें तें शहर सोडून पद्मानदीच्या पैलतीरावर मालदह व बोआलिया यांच्या बाजूला आश्रय घेऊन राहिले होते. बंगालचा सगळा पश्चिम भाग उध्वस्त झाला होता. कटवा व बर्द्वान यांच्याजवळचा मुलुख तर निर्जन अरण्यासारखा भयाण दिसत होता.

मराठ्यांनीं अशा रीतीनें जागोजाग आपली सत्ता स्थापित केली, त्यावेळीं कलकत्त्यांत ईस्टइंडिया कंपनी

स्थापन होऊन फार वर्षे झालीं नव्हतीं. कांहीं इंग्रज लोक या कंपनीचे नोकर म्हणून श्रीमान् बंगाली लोकाशीं ओळखी-पाळखी करीत होते. त्यांच्या ओळखीनें कित्येक बंगाली लोक कोणी कंपनीच्या नोकरीस म्हणून, कोणी दलाल म्हणून, आणि कोणी कंपनीचा आश्रय करावा या हेतूनें कलकत्त्यांत येऊन राहिले होते. या इंग्रज कंपनीच्या वाटेला मराठे लोक अद्याप गेले नव्हते.* तथापि टोळधाडीप्रमाणें मराठेस्वारांची धाड कलकत्त्यास केव्हां येईल याचा नेम नाहीं, यासाठीं सावध असावें हें बरें, म्हणून कंपनीनें नबाबाच्या परवानगीनें आपल्या बचावासाठीं कलकत्त्याभोंवतीं एक रुंद खंदक खोदण्याचें काम सुरू केलें होतें. हा खंदक पुरा झाला असता, तर त्याची लांबी साडेपंधरा कोस झाली असती. येवढा मोठा खंदक खोदण्यासाठीं कंपनीला कांहीं विशेष खर्च लागणार नव्हता. मराठ्यांच्या भीतीनें पळून गेलेल्या व कंपनीच्या आश्रयास येऊन राहिलेल्या बंगाली लोकांनीं अंगमेहनतीनें खंदक खोदण्याचें काम चालविलें होतें. सहा महिन्यांत फक्त दीड कोस लांबीचा खंदक खोदला गेला. येवढ्या अवधींत मराठे त्या बाजूला गेले नाहींत. तेव्हां खंदक खोदण्याचें कारण उरलें नाहीं असें पाहून कंपनीनें तें काम तितकेंच अपुरें टाकिलें. हा अपुरा राहिलेला खंदक अद्याप कलकत्त्यास पाहण्यास

---

* पश्चिम बंगाल्यांत कंपनीचीं दुकानें मराठ्यांनीं लुटलीं होतीं, पण कंपनीचें विशेषसें नुकसान झालें नव्हतें.

मिळतो. याला इंग्रजींत मराठा डिच् असें नांव आहे. हल्लीं या खंदकाची अत्यंत दुरवस्था आहे.

याचवेळीं ईस्टइंडिया कंपनीनें हल्लींच्या सर्क्युलर रोड-पासून काशीमबाजारकोठीपर्यंत एक जंगी पक्का कोट बांधून त्याच्या चार कोपऱ्यांस चार मजबूत बुरुज बांधण्याची परवानगी नबाबाकडून मिळवून तें काम पुरें केलें. याशिवाय, कलकत्त्याचे नागरिक, ईस्टइंडिया कंपनीचे इंग्रज नोकर, व कंपनीच्या आश्रयानें कलकत्यास येऊन राहिलेले कांहीं अर्मेनियन व्यापारी, यांचें कलकत्त्याच्या संरक्षणार्थ एक व्हालंस्टियर (स्वयंसेवक) पलटणही तयार करण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांतलें हें पहिलेंच व्हालंटियर पलटण होय. याशिवाय किल्ल्याची दुरुस्ती, नवीन तोफा व बंदुका आणि दारूगोळा यांचा संग्रह करणें वगैरे युद्धाची सिद्धता कंपनीनें चालविली होती.पण तिचें कारण पडलें नाहीं. यावेळीं मराठयांच्या भितीमुळें कंपनीचा एक फायदा झाला. एरवीं किल्ल्याची दुरुस्तीं करण्याला, तट बांधण्याला व युद्धाची सिद्धता ठेवण्याला नबाबानें कदाचित् परवानगी दिली नसती, ती मराठयांच्या निमित्तानें कंपनीला आयतीच मिळाली. शिवाय, मराठयांच्या धास्तीनें पुष्कळ श्रीमान् लोक कलकत्त्यास येऊन राहिल्यामुळें कलकत्ता शहराची एकदम भरभराट झाली, व कंपनीचा व्यापारही वाढला.

नबाब अलीवर्दीखानासारखा मनुष्य, झालेली मानखंडना मुकाट्यानें सोसून राहील हें संभवनीय नव्हतें, व अनुभवही

तसाच आला. पावसाळ्यांत मराठ्यांचें परचक्र येण्याची भीती राहिली नाहीं. हें पाहून नबाबानें पुनः आपल्या सैन्याची जुळवाजुळव करण्यास सुरवात केली. वर्द्धानच्या लढाईच्या वेळीं जे शिपाई जिवावर उदार होऊन लढले होते, त्यांस नबाबानें दहा लक्ष रुपये इनामादाखल देण्याचें कबूल केलें होतें. ती रकम नबाबानें यावेळीं देऊन टाकल्यामुळें शिपाई लोक नबाबावर फार खुष झाले होते, व अशा उदार नबाबाच्या झेंडयाखालीं लढण्यास त्यांना मोठा हुरूप वाटूं लागला होता. नबाबाच्या सैन्यांत नव्या शिपायांची भरती करण्याचें काम झपाट्यानें चाललें होतें. अजिमाबादेचा नबाब जैनुद्दिन हा नबाबाचा जांवई होता. त्याला त्यानें पत्र पाठवून साह्यार्थ बोलाविलें होतें, व अशींच पत्रें नबाबाकडून इतर लहानमोठ्या सरदारांना व राजा–महाराजांना गेलीं होतीं. जैनुद्दिन आपल्या सासऱ्याच्या शब्दाला मान देऊन पांच हजार घोडेस्वार व पांच हजार पायदळ घेऊन मुर्शिदाबादेला रवाना झाला होता. मीरजाफर, मुस्तफाखा, समशेरखाप्रभृति सेनापतींना, कोणाला मानाच्या पदव्या व किताब देऊन, कोणाला बढती देऊन, व कोणाला इनामाची लालूच दाखवून, नबाबानें वश करून घेतलें होतें. याप्रमाणें युद्धाची जय्यत तयारी करून नबाब पर्जन्यकाळ संपण्याची वाट पाहत होता.

याचवेळीं दिल्लीच्या बादशहाकडून वार्षिक खंडणी मागण्यासाठीं मुरीदखा नांवाचा एक सरदार नबाबाकडे आला होता.

पण नबाबानें त्याला युक्तीनें वाटेला लाविलें. आपल्यावर मराठयांनी सध्या मोठें संकट आणिलें आहे, त्यामुळें मी तर हैराण झालों आहेंच, पण तुम्ही आतां येथें रहाल तर शत्रूच्या हातीं लागाल, अशी भीती घालून नबाबानें त्याला रिकाम्या हातानें माघारीं जाण्यास लाविलें.

प्रकरण ७ वें.

विजयश्रीची लाट परतली.

नबाबाला मराठ्यांच्या सैन्याला बंगाल्यांतून हांकून लावण्याची इतकी उतावळी झाली होती कीं, पावसाळा संपेपर्यंत त्याच्यानें दम निघेना. आश्विनमास लागला न लागला तोंच त्यानें आपल्या फौजेचें कूच केलें. त्यावेळीं पाऊस पूर्णपणें थांबलाही नव्हता. रस्त्यांवरला चिखल वाळला नव्हता. नद्यांना आलेला पूर ओसरला नव्हता. तरी नबाब आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. नबाब इतक्या लवकर चाल करून येईल ही मराठ्यांना कल्पनाही झाली नाहीं. ते भोंवतालच्या मुलुखांतून लूट करण्यांत गुंतले होते. नवरात्रांत बंगाली चालीप्रमाणें भास्करपंडितानें दुर्गोत्सव मोठ्या थाटानें मांडला होता. या उत्सवासाठीं त्यानें ठिकठिकाणच्या जमीनदारांना व शेटसावकारलोकांना अगत्यपूर्वक निमंत्रणें पाठवून आणिलें होतें. मोठा विशाल व शोभिवंत मंडप घातला होता व नडीयाप्रांतांतून विद्वान् वैदिक, व शास्त्री वगैरे मंडळी बोलावून आणिली होती. त्यांना दाक्षिणा ह्मणून देण्यासाठीं लक्षावधि रुपयांचे तोडे व काश्मीरी शाली वगैरे महावस्त्रें आणवून ठेविलीं होतीं. राजाच्या घरच्या विवाहसंमारंभापेक्षांही ह्या उत्सवाची तयारी अधिक होती. देवाला

रोज बळी ह्मणून अर्पण करण्यासाठीं सहस्त्रावधि बोकड आणिले होते. सारांश, या उत्सवानें आपण आतांपर्यंतचा दुर्लौकिक घालवून बंगाली हिंदूंची तरी निदान मर्जी खात्रीनें संपादूं व अत्यंत धार्मिक व उदार अशी कीर्ति मिळवूं अशी भास्करपंडिताला आशा वाटत असावी असें दिसत होतें.

या उत्सवाच्या गडबडींत मराठे लोक निमग्न झाले असतां, इकडे नबाबाचें सैन्य कटव्याचे उत्तरेस गंगानदीच्या तीराशीं येऊन पोंचलें. नदीचें पात्र यावेळीं पुरानें तुडुंब भरलें होतें. म्हणून रात्रींचे वेळीं नावाशीं नावा बांधून त्यांचा एक पूल तयार करून त्यावरून नबाबानें आपलें सैन्य पार नेण्याची खटपट चालविली होती. कांहीं फौज याप्रमाणें नदी उतरून पलीकडे गेली. इतक्यांत सैन्याच्या भारानें मधल्याच दोन नावा बुडून प्रवाहाच्या तळाशीं गेल्या. अर्थात् त्यांच्याबरोबर नबाबाच्या पुष्कळ लोकांनाही जलसमाधि मिळाली. अंधारी रात्र असल्यामुळें पुढें काय प्रकार घडला आहे हें मागच्या लोकांना न कळल्यामुळें मागचे लोक पुढच्यांना ढकलूं लागले. सारांश हा कीं, पुष्कळ लोक नदींत पडून मेले. अशा रीतीनें नबाबाच्या सैन्यांतले सुमारें सहा सातशें शिपाई पाण्यांत बुडून मेले.* बुडालेल्या नावाच्या जागीं दुसऱ्या नावा घालून पुलाची दुरुस्ती करण्यांत कांहीं

* नबाबाचे १५०० लोक यावेळीं पाण्यांत बुडून मेले असें कित्येक इतिहासकार लिहितात.

वेळ गेला. इतक्यांत उत्तर रात्र संपत आली. हा वेळपर्यंत दोनतीन हजार लोक नदी उतरून गेले होते. तेवढ्यांनाच घेऊन, मराठे निजून उठले नाहींत तोंच त्यांच्यावर छापा घालण्याचा नबाबाचा सेनापती मुस्तफा व मीरजाफर यांनीं विचार केला, व त्याप्रमाणें ते त्वरेनें मराठ्यांच्या छावणीला जाऊन पोंहोचले. रात्रीं उत्सवांत भजन, कीर्तन, गाणेंबजावणें वगैरे कृत्यांमुळें मराठ्यांना पहांटेस तीन वाजेपर्यंत जागरण झालें होतें. नुकता कोठें त्यांचा डोळा लागला होता. इतक्यांत शत्रूचा हल्ला आला. तो आल्याबरोबर ते खडबडून जागे झाले, आणि आपापलीं हत्यारें शोधूं लागले. तीं लौकर सांपडेनात. मग इतर सामानसुमान घेण्याची तर गोष्टच बोलावयास नको. मराठे कसेतरी एकदाचे घोड्यावर स्वार होऊन लगबगीनें वाट फुटली तिकडे पळत सुटले. त्या दिवशीं आश्विन शु. ९ होती अर्थात् नवरात्राचा अखेरचा दिवस होता. तरी भास्करपंडितानें देवीची मूर्ति तशीच मंडपांत टाकून यःपलायन केलें. दुर्गा देवता अत्यंत जाज्वल्य ! तिचा असा हा अपमान केल्याचा परिणाम चांगला होणार नाहीं असें भाकित त्याचवेळीं अनेक भाविक, श्रद्धावान् व भोळ्या लोकांनीं केलें; आणि कर्मधर्मसंयोगानें ती गोष्ट अनुभवासही आली. ती कशी तें पुढील हकीकतीवरून कळेल.

नवाबानें आपली फौज सैनापति मुस्तफाखान व मीरजाफर यांच्याबरोबर पुढें पाठवून दिली होती व मागून तो

स्वतः हत्ती व तोफा वगैरे जड सामान घेऊन येत होता. मराठ्यांची दाणादाण होऊन ते पळाल्यानंतर लवकरच तो कटव्यास जाऊन पोंहोचला, आपण योजिलेल्या सगळ्या गोष्टी यथासांग निर्विघ्नपणें पार पडल्याचें ऐकून त्याला फार समाधान वाटलें.

भास्करपंडित व त्याचे बारगीर पळाले, ते तसेच पंचकोटाच्या पहाडी प्रदेशांतून वाट काढीत चालले होते. नबाबाच्या लोकांनीं कांहीं अंतरापर्यंत त्याचा पाठलाग केला; पण मराठे चपळ, ते मुसलमानांचे हातीं कसचे लागतात ? शेवटीं मुसलमान हताश होऊन परतले. मराठे प्रथम आडरानांतून चालले होते. पण वाटेंत माणसेंचीं माणसें गडप होतील इतका चिखल असल्याकारणानें त्यांना चालणें मुष्कील झालें. मीरहबाब त्यांच्याबरोबर होताच. त्याला त्या प्रांताची चांगली माहिती होती. त्यानें मराठ्यांना विष्णुपुराच्या जंगलांतून काढून चंद्रकोणाच्या सपाट मैदानांतून मेदिनीपुराच्या रस्त्यावर आणून सोडिलें.

यावेळीं ओरिसाप्रांताच्या बंदोबस्ताचें काम मासूम याच्याकडे होतें. तो आपल्या थोड्याशा सैन्यासह हरिहरपुर येथें छावणी करून होता. मराठे आपल्या मुलुखांतून जाणार आहेत अशी बातमी त्याला हेराकडून समजली होती. म्हणून तो त्यांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवीत होता. मराठ्यांना आपल्या मुलुखां-

तून जाऊं द्यावयाचें नाहीं, जाऊं लागले तर त्यांना अडवावयाचें, असा त्याचा विचार होता. मासूमजवळ फौज थोडी आहे, तेव्हां आपण जरा दरडावल्यावर तो गप्प बसेल, असें मराठ्यांना वाटलें. म्हणून त्यांनीं त्याला निरोप पाठविला कीं, ‘ आम्ही लवकरच तिकडे येणार आहों. आमची व्यवस्था जर तुम्ही नीट ठेवाल, तर तुमच्या मुलुखाला आम्ही बिलकुल त्रास देणार नाहीं. तसें न केल्यास मात्र लढाईचा प्रसंग येईल, याचा नीट विचार करावा.’ मराठ्यांची ही मागणी कबूल करणें त्याला अपमानास्पद वाटलें. त्यानें ती कबूल केली नाहीं. मराठ्यांनीं पुनः दोनदां त्याला बजाविलें, तरी तो ऐकेना; इतकेंच नाहीं, तर लढाई करण्याच्या उद्देशानें तो आवेशाचा आविर्भाव करून दोन मैल पुढें चालून आला. तेव्हां मराठ्यांना लढाई करण्यावांचून उपाय राहिला नाहीं. मराठ्यांची व मुसलमानांची लढाई झाली, तींत मासूम मारला गेला.

मराठ्यांनीं ओरिसाप्रांतांत उपद्रव मांडला व मासूमसारखा वीर मारला गेला हें वर्तमान ऐकून नबाब अलीवर्दीखानाला चीड आली; आणि मराठ्यांवर कटव्यास त्यानें जो जय मिळविला होता त्यानें शेफारून जाऊन मराठ्यांना ओरिसाप्रांतांतूनही त्यांच्या देशाकडे पिटाळून लावल्यावांचून राहावयाचें नाहीं, असा विचार करून तो त्वरेनें जंगी फौज बरोबर घेऊन निघाला. हें वर्तमान हुगळी येथें भास्करपंडितानें ठेवलेला सुभेदार शिवराव यास कळतांच तो भास्करपंडिताच्या मदतीसाठीं

आपली फौज घेऊन निघाला. पण वाटेंत शत्रूच्या हातीं लागला. भास्करपंडिताजवळ आतां अगदीं थोडी फौज उरली होती, आणि जे लोक होते तेही परदेशीं राहण्यास कंटाळले होते. म्हणून भास्करपंडितानें परत स्वदेशीं जाण्याचा विचार केला. पण अलीवर्दीखान तितक्यांत मराठ्यांचा पाठलाग करीत आला. तेव्हां पाठ दाखविण्यापेक्षां मरण आलेलें पत्करलें असें त्या स्वाभिमानी पंडितास वाटून त्यानें तोंड फिरविलें आणि युद्धास सिद्ध होऊन आपल्या विजयी भाल्याच्या फेकीला सुरुवात केली. मुसलमानांचें व मराठ्यांचें निकराचें युद्ध झालें. चवताळलेला वाघ जसा आपल्या भक्ष्यावर तुटून पडतो, तसा नबाब अलीवर्दीखान यावेळीं मराठ्यांवर चालून गेला. मराठ्यांनीं लढाईची शिकस्त केली. पण यावेळीं सगळीच परिस्थिति त्यांना प्रतिकूल होती, व मराठ्यांचे ग्रहही फिरले होते, हें पाहून भास्करपंडितानें स्वदेशचा रस्ता धरला. त्यांचा पाठलाग करण्याचें काम नबाबानें मोहबतजंग नांवाच्या मुसलमान सरदाराकडे सोंपविलें होतें. मराठे ओरिसाप्रांताची हद्द ओलांडून चिलका सरोवरापर्यंत गेले, तोंपर्यंत त्यानें त्यांचा पाठलाग केला, आणि पुढें तो नाद सोडून देऊन मोहबतजंग परत फिरला. याप्रमाणें मराठ्यांच्या बंगालप्रांतावरील पहिल्या स्वारीची परिसमाप्ति झाली.

नबाबानें या स्वारीच्या वेळीं आपणास मदत पाठवावी म्हणून दिल्लीच्या बादशहास जी विनंती केली होती, तिचा

विचार होऊन बादशहानें अयोध्येचा नवाब सफदरजंग यास जाण्याचा हुकूम केला होता. पण तो येऊन पोहोंचण्यापूर्वीच मराठे निघून गेल्यामुळें नवाबानें त्याला परत जाण्यास सांगितलें. त्यालाही हेंच पाहिजे होतें. कारण बाळाजी बाजीराव पेशवे फौजेसह याचवेळीं अयोध्याप्रांतांत येऊन उतरल्याची खबर येऊन पोहोंचली होती.

प्रकरण आठवें.

बंगालवर दुसरी स्वारी. (१७४४)

भास्कररामानें बंगाल्यांतून अगणित लूट आणिली, आणि बंगालच्या लोकांना "त्राहि भगवन्" करावयास लावून मराठयांचा दरारा सर्वत्र बसविला ही गोष्ट खरी; पण अखेरीस तो अपयश घेऊन आला ही गोष्ट एकंदर मराठयांच्या—विशेषतः रघोजी भोसल्यासारख्या मानी पुरुषाच्या—मनास लागून राहिली. मराठयांना आजपर्यंत असें अपयश कोणत्याही मोहिमींत मिळालें नव्हतें. जेथें ते जात, तेथें आपलें वर्चस्व स्थापून परत येत. यामुळें लूट आणिल्याच्या आनंदापेक्षां मराठयांच्या नांवाला कलंक लागल्याबद्दल रघोजीला फार दुःख झालें व त्या बरोबरच मुसलमानांविषयीं चीड उत्पन्न होऊन त्यानें संतापाच्या भरांत लागलीच आपले मोर्चे पुनः बंगालकडे वळविण्याचा निश्चय केला. मराठे बारगिरांना यावेळीं विश्रांतीची अतिशय जरूरी होती. पहिल्या मोहिमींत बंगालप्रांताची माहिती नसल्यामुळें त्यांना फार कष्ट सोसावे लागले होते. बंगालच्या कर्दमोत्थितज्वरानें पुष्कळ बारगिरांनीं अंथरूण धरलें होतें. तथापि रघोजीचा निश्चय एकदा झाला कीं तो वज्रलेप ! कोणाचेंही ऐकणारा तो पुरुष नव्हता.

तशांतून झालेली मानखंडना घटकाभरसुद्धां सोसून राहणें हें त्याच्या स्वभावाला मरणप्राय दुःखदायक वाटत होतें. त्याचा मुसलमानावरचा राग कोणत्याही अन्य उपायांनीं शांत होण्यासारखा नव्हता. त्यानें बारगिराच्या सोयीगैरसोयीकडे किंवा सुखदुःखाकडे न पाहतां इ. स. १७४४ मध्यें एकदम बंगालच्या मोहिमीचें शिंग फुंकलें; आणि स्वतः सेनापत्य स्वीकारून बंगालकडे कूच केलें.

अलीवर्दीखान म्हणजे कांहीं सामान्य पुरुष नव्हता. मुसलमानांत जे अत्यंत मोठे कर्तृत्त्ववान् पुरुष होऊन गेले,त्यांत तो प्रमुख होता. तो जसा मोठा बुद्धिमान् व राजकार्यकुशल मुत्सद्दी होता, तसाच अटोकाट धैर्याचा व प्रसंगावधानी पुरुष होता; आणि म्हणूनच मराठयांनीं केलेल्या पहिल्या स्वारींत कित्येक वेळां त्याच्यावर अत्यंत बिकट प्रसंग आले असतांही त्यांतून तो मोठ्या धीरानें व युक्तीनें निभावून गेला होता. तथापि रघोजीशीं सामना करण्याचें सामर्थ्य त्याचे ठायीं नव्हतें, आणि रघोजीचा जो लौकिक त्यानें ऐकिला होता, त्यावरून ही गोष्ट त्याची त्यालाच चांगली पटली होती. म्हणून रघोजी चवताळून आपलेवर येत आहे असें ऐकतांच तो स्वतःच्या बळावर विसंबून राहिला नाहीं. त्यानें मागच्यासारखें दिल्लीच्या बादशहास पत्र लिहून मदत मागितली. आणि बादशहानेंही बाळाजी बाजीराव पेशव्यांस अलीवर्दीखानाच्या मदतीसाठीं बंगालकडे जाण्याची विनंति केली. "रघुजीस बंगाल्यांतून घालवून द्याल, तर तुम्हांस

माळव्याची सनद देऊं " असें बादशहानें त्यास कबूल केलें होतें व शिवाय अजिमाबादप्रांताच्या चौथाईचा वसूल अलीवर्दीखानापासून घ्यावा म्हणून त्यानें बाळाजीकडे वरात पाठवून दिली होती. बाळाजीला द्रव्याचा लोभ सुटून त्यानें मुसलमानांची ही तात्पुरती कामगिरी—पैशासाठीं आपल्याच लोकांचे गळे कापण्याचें हें नीच काम—पतकरली, आणि लागलीच ४०—५० हजार फौजेची सिद्धता करून बंगालकडे आपला मोर्चा फिरविला. अलाहाबादप्रांतांतून बाळाजी बोगळीपुरापर्यंत आला. बाळाजीचें सैन्य बंगाल्यांत उतरलेलें पाहून बंगाली लोकांच्या उरांत पुनः धडकी भरली. भास्करपंडिताच्या पहिल्या स्वारीनें बंगाली लोक इतके भयभीत व हैराण झाले होते कीं, मराठे बारागिरांचें नांव ऐकल्याबरोबर सर्वांच्या अंगांत कापरें भरत असे. अजूनही बंगाली लोक लहान मुलाला थापटून निजवीत असतां तें निजलें नाहीं तर त्या प्रसंगाचें पुढील गाणें म्हणत असतात—

छेले घुमाल पाडा जुडाल बर्गी एलो देशे ।
टिकटिकिते धान खेये छे खाजना दिब किसे ॥

अर्थ—बाळ निजलें आहे, गांवांत जिकडे तिकडे स्तब्धता आहे. बारगीर तर देशांत येऊन थडकले. पक्ष्यांनीं धान्य खाऊन टाकिलें. आतां सरकारचा सारा कसा भरावयाचा ?

आज दीडशेंवर्षांवर जें हें गाणें बंगाली कुटुंबांत मुलांना भय दाखवून झोंप आणण्यासाठीं म्हणण्यांत येत असतें, त्याचा

प्रभाव त्याकाळीं किती असला पाहिजे याची कल्पनाच केली पाहिजे. बंगाली लोकांना आपलेकडून बिलकुल उपद्रव होऊं नये अशी बाळाजीची खरोखर इच्छा होती, आणि म्हणून बोगळीपुराहून पुढें मुर्शिबादेला तो गेला. शेतकरी वगैरे लोकांना फौजेपासून त्रास होऊं नये म्हणून मुद्दाम शेतें व गांवें टाळून तो आडवाटेनें* गेला. मुर्शिदाबादेस पोंचल्यावर

---

* खरा प्रकार आम्हीं वर दिला आहे आणि बंगाली इतिहासकारही बाळाजीनें लूटमार कांहीं केली नाहीं ही गोष्ट स्पष्टपणें नमूद करतात. असें असतां कित्येक मुसलमान इतिहासकारांनीं बाळाजीच्या फौजेनें केलेल्या जुलमाचीं व अत्याचारांची काल्पनिक वर्णनें दिलीं आहेत. ते म्हणतात कीं, बाळाजीनें यावेळीं जें गांव भेटेल त्यापाशीं द्रव्य मागावें. गांवकऱ्यांनीं मुकाट्यानें तें दिलें तर त्या गांवाला उपद्रव देऊं नये; पण नकार केल्यास तें गांव लुटून जाळून फस्त करावें. दाऊदनगरचा जमीदार पैसा न देतां घाऊसगडाच्या आश्रयानें राहिला होता. त्याची खोड मोडण्यासाठीं बाळाजीनें दाऊदनगर जाळून टाकलें व त्याच्या राखेनें घाऊसगडाभोंवतालचा खंदक भरून काढून किल्ल्यांत प्रवेश केला. तेव्हां त्या जमीदाराचा निरुपाय होऊन त्यानें पन्नास हजार रुपयांची रकम देऊन व विनवणी करून बाळाजीस वाटेला लाविलें. अशा अनेक गोष्टी मुसलमान इतिहासकारांनीं लिहून ठेविल्या आहेत. त्यांतल्या कांहीं येथें देतों म्हणजे विरुद्धपक्षानें लिहिलेली हकीकत दाबून ठेविली या आरोपापासून आम्ही मुक्त होऊं व निःपक्षपाताची दृष्टि ठेवणें हें जें इतिहासकाराचें कर्तव्य तेंही आह्मीं केल्यासारखें होईल. एक इतिहासकार ह्मणतो कीं, बाळाजी अजिमाबादला येणार अशी बातमी पसरल्याबरोबर तेथचे लोक अत्यंत भयभीत झाले, आणि आतां आमच्या रक्षणाची कांहींतरी तजवीज करा असें तेथील अधिकारी हिदायत-

अलीखान यास म्हणूं लागले. त्यानें तुम्ही आपली धनदौलत गंगापार कोठेंतरी पुरून ठेवा अशी सल्ला लोकांना दिली. इतक्यांत हिदायत-अलीचा बाप सैयदआलिमउल्ला तेथें आला. हा मोठा अवलिया (साधु) आहे अशी लोकांची श्रद्धा होती. आलेले लोक त्याला शरण गेले. त्यानें त्यांना आश्वासन दिलें कीं, “अल्ला तुमच्या केंसालासुद्धां धक्का लागू देणार नाहीं. तुम्ही स्वस्थ असा.” ईश्वरसत्तेनें त्या अवलियाचे शब्द खरे ठरले. काशीक्षेत्रीं गोविंदबुवा नांवाचे कोणी एक गृहस्थ व्यापारीउदीम करून राहत होते. व्यापाराच्या निमित्तानें आजिमाबादेस त्यांचें जाणेंयेणें असे, व त्यामुळेंच हिदायतअलीचा व त्यांचा चांगला परिचय झाला होता. या गोविंदबुवाचें बाळाजीशीं कांहीं नातेंही होतें हें हिदायतअलीस माहित होतें. त्याच्याकडून आपण बाळाजीस सांगवून आपल्या गांवचें रक्षण करूं अशी अलीस उमेद होती. म्हणून तो स्वतः काशीस गोविंदबुवाकडे गेला व त्याला त्यानें आपला मनांतला हेतु कळविला. गोविंदबुवानें बाळाजीपाशीं आपलें वजन खर्च करून आजिमाबादेवरचें संकट टाळलें व अवलियाचा आशिर्वाद खरा केला. बाळाजी आजिमाबाद टाकून टिकारी, गया, मानपूर वगैरे रस्त्यानें भागलपुरास दाखल झाला. तो येण्यापूर्वीच तेथील धनाढ्य लोक गंगापार पळून गेले होते. फक्त घोरियाच्या लढाईंत मारला गेलेल्या घाउसखान नांवाच्या प्रतिष्ठित सरदाराची स्त्री आपल्या परिवारासह राहिली होती. मराठ्यांनीं तिच्या वाड्याला वेढा दिला, तेव्हां तिनें आपल्या आप्तवर्गाच्या हातांत बंदुका देऊन व स्वतः एक बंदूक घेऊन मराठ्यांवर गोळ्यांचा वर्षाव केला. त्यामुळें कित्येक मराठे वीर घायाळ होऊन पडले. ही बातमी बाळाजीस लागतांच त्यानें तिला त्रास देणाऱ्या लोकांचा तीव्र निषेध करून त्या मुसलमान स्त्रीकडे मूल्यवान् नजराणा पाठविला, आणि ‘ झालें तें झालें, पण या उपर तुमच्या केंसाला भय नाहीं ’ असें आश्वासन दिलें. इतकेंच नाहीं, तर तिला कोणी त्रास देऊं नये म्हणून तिच्या वाड्याच्या बंदोबस्तासाठीं आपलीं कांहीं विश्वासुक माणसें पाहऱ्यावर ठेविलीं. नंतर बाळाजी बीरभूमकडे चालता झाला.

त्यानें अलीवर्दीखानापाशीं चौथाईची रक्कम मागितली; व त्यानेंही बाळाजीची आपणास मदत होईल या आशेवर मुकाट्यानें ती त्याचे पदरांत घातली. पेशव्यांच्या मदतीची नबाबाला फार जरूरी होती. कारण, रघोजी त्यावेळीं आपल्या बारगिरांसह कटवा व बर्द्वान यांच्या दरम्यान येऊन पोंचला होता.

याप्रमाणें मुर्शिदाबादच्या एका बाजूनें रघोजीचें व दुसऱ्या बाजूनें बाळाजीचें सैन्य येऊन भिडलें. अलीवर्दीखानानें लागलीच बाळाजीची भेट घेऊन बहारप्रांताच्या चौथाईची बाकी त्याला देऊन टाकून व पुष्कळ मौल्यवान् देणग्या देऊन बाळाजीची तब्येत खुष केली, आणि मग त्या दोघांचीं सैन्यें हातांत हात घालून दक्षिणेकडे रघोजीच्या सैन्यावर चालून जाण्यासाठीं निघालीं. मराठ्यांचे घोडेस्वार फारच चपळ होते अलीवर्दीच्या सैन्याच्यानें त्यांच्याबरोबर चालवेना. म्हणून बाळाजी बंगालच्या सैन्याला मागें ठेवून आपण एकटाच पुढें गेला, आणि रघोजीला गांठून कसबे जावळ व भंडाले परगणा खटाव येथें त्याच्यावर हल्ला करून त्यानें रघोजीचा फडशा उडवून दिला (आक्टोबर १७४४)* आपला कार्य-

---

* कित्येक मुसलमान इतिहासकारांनीं रघोजीच्या या स्वारीची अधिक तपशीलवार हकीकत दिलेली आहे. ते म्हणतात कीं, रघोजी ओरिसांतून बंगालमध्यें उतरला, तेव्हां कटक येथें दुर्लभराम हा सुभेदार होता. हा केवळ दगलबाजच नव्हे, तर भित्राही होता. रघोजी आपल्या

बारगिरांसह आला आहे हें ऐकतांच तो कटकहून पळाला. पण मराठ्यांना चुकवून तो कोठें पळून जाणार ? मराठयांनीं त्याला पकडलें. मराठ्यांच्या हातून सुटका होण्याची आशा राहिली नाहीं, तेव्हां त्यांची मर्जी संभाळून तरी आपण आपला फायदा करून घ्यावा, म्हणून तो मीरहबीब यास अनुकूळ झाला व बाराभाटीयेथील किल्ल्यांत पुष्कळ खजीना आहे. तो लुटल्यास पुष्कळ द्रव्य मिळेल अशी त्यानें मराठ्यांना लालूच दाखविली. तो किल्ला मजबूत होता.सहज हस्तगत होण्यासारखा नव्हता. शिवाय तेथील किल्लेदार मीरअबुलअझीझ हा मोठा बाणेदार पुरुष होता. त्यानें थोडक्या फौजेनिशीं पुष्कळ दिवस किल्ला लढविला. हें पाहून दुर्लभराम व मीरहबीब यांनीं त्याच्यावर कुटिलनीतीचा प्रयोग करण्याचें मनांत आणिलें;आणि त्या किल्लेदाराच्या भेटीस जाऊन त्याला द्रव्याची व मानपानाची लालूच दाखवून किल्ला सोडून देण्याविषयीं त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यानें एकच साफ उत्तर दिलें कीं, 'मी धन्याचें निमक आतांपर्यंत खालें आहे. त्याच्याशीं मी तुमच्यासारखा हरामखोरपणा कधीं करणार नाहीं.' हा त्याचा हट्ट पाहून मराठेही किल्ला घेण्याचा हट्ट धरून किल्ल्याला वेढा घालून बसले.किल्ल्यांत जाणारी रसद त्यांनीं मागेंच बंद केली होती. किल्ल्यांत धान्याचा व पाण्याचा संचय होता. पण तो किती दिवस पुरणार ? शेवटीं जेव्हां किल्ल्यांत लोकांचे अन्नपाण्यावांचून होणारे हाल किल्लेदाराच्यानें पहावेतनासे झाले,तेव्हां त्यानें राजीखुषीनें मराठ्यांच्या स्वाधीन तो किल्ला केला. याप्रमाणें एकेक किल्ला घेत घेत रघोजीनें लवकरच सगळा ओरिसाप्रांत मेदिनीपुर, हुगळी व बर्द्वान येवढा मुलुख हस्तगत केला. अलीवर्दीखान यावेळीं बहारप्रांतांत पाटणा येथें अफगाण लोकांचें बंड मोडण्यांत गुंतला होता. त्यानें त्या बंडवाल्यांचा नायक मुस्तफाखान याला मारून बंडवाल्यांचा नायनाट केला, व मग तो परत बंगाल्यांत आला. मुस्तफाखान हा बंडवाल्यांमध्यें अतिशय लोकप्रिय होता. त्यामुळें त्याच्या

भाग फसला असें पाहून रघोजी विशेष भानगडींत न पडतां ओरिसाप्रांतांतून स्वदेशीं निघून गेला व व इकडे नानासाहेबही बादशहाशीं केलेल्या कराराप्रमाणें कामगिरी फत्ते केल्याबद्दलचें बक्षीस–माळव्याची सनद–घेण्यासाठीं दिल्लीस निघून गेले[१].

वधाचा सूड उगविण्याचा त्या बंडवाल्या अफगाणांनीं बेत केला, आणि तो हेतु तडीस नेण्याचे कामीं मराठे चांगले उपयोगी पडतील असें पाहून त्यांनीं रघोजीचें साह्य मागितलें. रघोजी तें देण्याचें कबूल करून वाटेनें लूट करीत करीत टिकारीपर्यंत गेला, व तेथून तो पाटण्याकडे वळला. पाटण्यावरून रघोजी मुर्शिदाबादेवर उतरला. अलीवर्दीखान त्यांच्या मागें लागला. शेवटीं कटवा येथें नबाबाच्या फौजेंची व मराठ्यांची लढाई झाली. तींत मराठ्यांचा पराभव झाला. रघोजी पुनः लढाई देणार होता. पण इतक्यांत दक्षिणेकडे कांहीं गडबड झाल्याचें ऐकल्यावर तो त्वरेनें तिकडे निघून गेला. तथापि त्यानें मागें मीरहबीब याच्यापाशीं ३००० स्वार व ७००० अफगाण लोक ठेविले होते. ही हकीकत देतांना मुसलमान इतिहासकार अफगाण बंडवाल्यांनीं मराठ्यांची मदत मागितली याबद्दल कडक शब्दांनीं त्यांचा निषेध करतात; पण तेच बाळाजी स्वतः मराठा असून रघोजीच्या विरुद्ध नबाब अलीवर्दीच्याखानाच्या मदतीला धावून आल्याबद्दल त्याची पाठ थोपटतात हें आश्चर्य आहे! या एकंदर हकीकतीवरून त्याकाळीं मराठे व मुसलमान दोघेही स्वाभिमानशून्य व नीतिदृष्ट्या पतित झाले होते; दोघांची वृत्ति स्वार्थपरायण झाली होती, व स्वार्थपरायणतेपुढें राष्ट्रीयत्त्वाविषयींचा अभिमान त्यांना तुच्छ वाटत होता, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

१ ही लढाई होण्यापूर्वी आपापसांत लढाईचा प्रसंग येऊं नये म्हणून रघोजीनें बाळाजी बाजीराव पेशवे यांस पुष्कळ समजावून सांगितलें. यासंबंधांत ‘ नागपूरकर भोसल्यांच्या संबंधाचे कागदपत्र’ पृ. १२१ या ठिकाणीं असें म्हटलें आहे—“ ह्या काळीं रघोजी भोसले यांनीं

बाजीरावाशीं (?) बोलणें केलें जेः---महाराजांची आज्ञा व सनदा कीं बंगाल्यांत चौथाई व घासदाणा घ्यावा. त्यास आपण आडवें यावें, आपसांत कलह करावा हें नीट नाहीं. बालके (? बलके पाहिजे) महाराजांनीं आपले नांवें आज्ञापत्र दिल्हे जे बंगाल वगैरेंत आपली फौज ही न्यावी. सारांश आज्ञापत्राची नक्कल तेरावें नंबरामध्यें सनदेचे किताबींत आहे.—

सन ११४७ रा. रा. बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसी जे–सुभा प्रांत पटण व प्रांत बांध व रतनपूर व घमद वाघेलखंड, व प्रांत बंगाल तहत पूर्व समुद्र हे प्रांत रा. रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांसि फौजेचे बेगमीबद्दल मोकासे दिले असे, तरी तुह्मी त्या प्रांतीं फौजा न पाठविणें. आपल्या सरदारांस ताकीद करून प्रांतांत उपद्रव लागूं न देणें. मशारनिल्हे ह्या प्रांतीं जाऊन अंमल बसवितील. सुखी असा. या प्रकारें पेशजीच महाराजांचीं आज्ञापत्रें असतां, दुसरें आमची नुकसानें किती जाहलीं. यावर आपण आलांत. अशा प्रकारें भाषण आणि मध्यस्त सरदार संभाजी शिरके व मानसिंग मोहिते वगैरेनीं करून बाजीरावाची समजूत केली. ''

प्रकरण नववें.

बंगालवर तिसरी स्वारी.

बंगालवरच्या दुसऱ्या स्वारीचा असा परिणाम झाला ही गोष्ट रघोजीच्या मनाला अतिशय लागून राहिली होती. बाळाजीचें व रघोजीचें पूर्वींपासूनच वांकडें होतें, पण तें व्यक्तिविषयक होतें. तो व्यक्तिविषयक द्वेष मनांत ठेवून मराठ्यांचा दरारा दूरदूरच्या प्रांतीं बसविण्याच्या प्रयत्नांत आडवें येण्याइतका आणि मुसलमानांनीं दाखविलेल्या लालुचीला वश होऊन शत्रूच्या तर्फेनें खुद्द आपल्याच देशबंधूंशीं युद्ध करण्यास तयार होण्याइतका नीचपणा बाळाजी करील अशी कल्पना रघोजीला झाली नसावी असें दिसतें. तसें असतें तर त्यानें बाळाजीचा बंदोबस्त करण्याची कांहींतरी योजना अगोदर-पासूनच करून ठेविली असती. असो. अकल्पित घटनेमुळें आपली मानखंडना करून घेऊन बंगाल्यांतून परत यावें लागलें, या गोष्टीचा वचपा काढीपर्यंत रघोजीच्या मनाला सारखी तळमळ लागून राहिली होती. त्यानें नागपूरला परत आल्यावर थोड्याच दिवसांत सैन्याची तयारी करून भास्करपंडिताला बरोबर वीस हजार सैन्य देऊन बंगालवर पुनः रवाना केलें. पण या

खेपेला त्याला आंतून असा हुकूम केला होता कीं, नबाब जर नम्रपणाचें वर्तन करून स्वारीचा खर्च व वर बरीचशी रक्कम देईल, तर लढाईच्या भानगडींत न पडतां त्याच्याशीं सलोखा करून परत यावें.

बाळाजी बाजीराव पेशव्यांच्या साह्यानें आपण रघोजीची खोड मोडली, कांट्यानें कांटा काढला, आतां रघोजी वर मान करून आपल्याकडे पाहणार नाहीं, आणि आपणांस बंगाल-प्रांताच्या अंतर्व्यवस्थेकडे लक्ष देण्यास फुरसत मिळेल असें मनोराज्य अलीवर्दीखान करीत होता. पण लवकरच तें मनोराज्य अंतर्धान पावलें. सहा महिन्यांचे आंतच पुनः ‘ ऐ एलोरे बुर्गी’ (बारगीर आलेरे आले !) असा आक्रोशध्वनि बंगालच्या प्रजेच्या तोंडून निघालेला त्याच्या कानीं आला. पुनः पूर्वीप्रमाणें गांवच्या लोकांची धांवपळ सुरू झाली. मराठ्यांच्या भीतीनें बंगाली लोक आपली चीजवस्त शेतांत एकाद्या सुरक्षित जागीं पुरून ठेवून बायकामुलांसह आश्रयाची जागा शोधीत हिंडू लागले. दुसऱ्या स्वारीच्या वेळींच अलीवर्दीखान अगदीं मेटाकुटीला आला होता; पण आयतेवेळीं पेशव्याचें साह्य मिळाल्यामुळें त्याची अब्रू राहिली होती. आतां हें तिसऱ्यांदा आलेलें संकट कसें टाळावें याचा त्याला मोठा विचार येऊन पडला होता. त्याच्याजवळ बंदुका, तोफा, तरवारी, दारूगोळा वगैरे जी युद्धसामुग्री होती, ती बहुतेक दुसऱ्या स्वारीचे वेळीं खलास झाली होती. तेव्हां मराठ्यांशीं दोन हात करून जय मिळवि-

ण्याची आशाच करावयाला नको होती. तेव्हां आतां शक्तीचा उपाय खुंटल्यामुळें युक्तीचा अवलंब करणें नबाबाला भाग होतें. म्हणून त्यानें दगलबाजीनें भास्करपंडिताला बोलावून आणून त्याला यमसदनास पाठविण्याचा विचार केला. त्यानें आपलें मंत्रिमंडळ बोलावून त्यांचेपुढें आपला विचार मांडला. युद्धाला सगळेच लोक कंटाळले होते. म्हणून त्यांनीं नबाबाच्या म्हणण्याला तत्काळ संमति दिली. पण नबाबाचा सेनापति मुस्तफाखान याला अशी दगलबाजीनें शत्रूचा नायनाट करण्याची गोष्ट पसंत पडली नाहीं. त्याला आपल्या शौर्याचा गर्व होता. आपण अद्याप मराठ्यांना जिंकूं अशी धमक त्याला वाटत होती. तो कांहीं केल्या नबाबाच्या विचाराला संमति देईना. पण नबाब अलीवर्दीखान मोठा चतुर, धूर्त व व्यवहारज्ञ होता. लढाईच्या फंदांत पडून निष्कारण द्रव्याची व प्राणाची हानि करून घेण्यांत अर्थ नाहीं हें त्याला पक्कें कळून चुकलें होतें. शिवाय मुस्तफाचा स्वभावही त्यानें पक्का ओळखून ठेविला होता. मुस्तफाखानाला वश करण्याची गुरुकिल्ली त्याच्यापाशीं होती. अखेरचा उपाय म्हणून त्यानें त्या किल्लीचा उपयोग केला. मुस्तफा बलशाली, धैर्यवान्, दुसऱ्यावर छांप बसविणारा, वक्ता, अघटित-घटना-पटु व कार्यकुशल होता. तथापि त्याच्या स्वभावांत एक मोठें व्यंग होतें. तो अतिशय लोभी होता. अलीवर्दीनें त्याची हिंमत पाहून आपण फार खुष झालों आहों असें अघळपघळ शब्दांनीं बोलून मुस्तफावर

खिलातींचा व इनामांचा वर्षाव केला, आणि भास्करपंडिताला मारण्याची आपली योजना तडीस जातांच त्याला अजिमाबादेचा नबाब करण्याचें मधाचें बोट लावून ठेविलें. त्याबरोबर मुस्तफाची वृत्ति पालटली; त्याचा दर्प गळाला; त्याच्या भाषणांतला आवेश मावळला; आणि नबाबाच्या विचाराला त्यानें संमति दिली. नबाबानें भास्करपंडिताकडे जाऊन व त्याला द्रव्यानें वश करून सलोख्याचीं बोलणीं सुरू करण्याचें काम मुस्तफाकडेच सोंपविलें व तोही त्या गोष्टीला कबूल झाला.

एक मुसलमान इतिहासकार म्हणतो कीं, मुस्तफा जानकीराम नांवाचा एक हिंदुसरदार समागमें घेऊन भास्करपंडिताकडे गेला. त्याची भेट घेण्यापूर्वीं मराठ्यांच्या बाजूचा एक मुसलमान सरदार अलीभाई (त्याचें नांव इंग्रज इतिहासकार Quarawal असें लिहितात.) हें अलिभाईचें आडनांव असावें, यास त्यांनीं आपले बाजूला वळवून घेतलें होतें. हा अलीभाई मूळचा मराठा असून धर्मांतर केलेला होता. त्याचें भास्करपंडितापाशीं चांगलें वजन होतें. मुस्तफानें त्याच्याकडून भास्करपंडिताच्या मनाचा कल लढाईकडे विशेष नाहीं हें काढून घेतलें, आणि मग त्याची मुलाखत घेतली. या मुलाखतींत असें ठरलें कीं निष्कारण रक्तपात करण्यांत अर्थ नाहीं. नबाबानें भास्करपंडिताला मोठ्या आदरसत्कारानें आपल्या डेऱ्यांत बोलावून नेऊन सलोख्याचीं बोलणीं करावीं व त्यांत ठरेल त्याप्रमाणें उभयपक्षांनीं वागावें. ही भेट

झाल्यापासून तों नबाबाची मुलाखत होईपर्यंतच्या दरम्यानच्या काळांत मुस्तफाकडून भास्करपंडिताकडे रोज डाल्या व नजर-नजराणे येऊं लागले. त्यावरून नबाबाच्या मनांत खरोखर सलोखा करावयाचा आहे अशी भास्करपंडिताच्या मनाची खात्री झाली. पण वाघाचे दाखवावयाचे दांत निराळे, आणि खाण्याचे दांत निराळे असतात, हें भास्करपंडिताला समजलें नाहीं. तो नबाबाच्या विश्वासावर निर्धास्त राहिला.

इकडे मुस्तफानें आपलेकडे सोपविलेली कामगिरी यशस्वी रीतीनें पार पाडल्याचें वर्तमान नबाबास कळविलें, तेव्हां नबाबाला फार आनंद झाला; आणि तो आपली फौज घेऊन मुर्शिदाबादेहून निघाला, तो भास्करपंडिताच्या छावणीपासून कांहीं अंतरावर मनकिरा येथें तळ देऊन राहिला. नबाबानेंही आल्यापासून भास्करपंडिताकडे डाल्या व नजराणे वगैरे पाठविण्याचा क्रम सुरू ठेविला. जानकीराम नेहमीं भास्करपंडिताकडे जाऊन त्याच्याशीं मिठ्यामिठ्या बाता करूं लागला. सर्प जसा गारु-ड्याच्या पुंगीच्या आवाजानें मुग्ध होतो, त्याप्रमाणें यावेळीं भास्करपंडिताची अवस्था झाली. थोड्या दिवसापूर्वीं जो आपला कट्टा शत्रु होता, तो नबाब आतां इतकें प्रेम कां दाख-वितो, यांत त्याचें कांहीं कपट आहे कीं काय, अशी शंकासुद्धां त्याच्या मनाला आली नाहीं.

भेटीचा दिवस ठरला. नबाबाच्या छावणींत या मुलाखती-साठीं उत्तम रीतीनें शृंगारलेला हत्ती आंत उभा राहील येवढे

उंच भव्य डेरे मुद्दाम उभारण्यांत आले. या डेऱ्यांपैकीं कित्येक डेऱ्यांत नबाबानें आपल्या सैन्याच्या निवडक तुकड्या लपवून ठेविल्या होत्या. मधला डेरा मुलाखतीसाठीं ठेविला होता. या डेऱ्याच्या पुढें छावणीच्या महाद्वारापर्यंत सर्व जमीन चादरींनीं आच्छादून त्यांवर उंची रेशमी गालिचे अंथरले होते, व छावणीच्या भोंवतीं चोंहीकडे कनाती लाविल्या होत्या. ही मुलाखत होण्याचें ठरण्यापूर्वीं मुस्तफा व जानकीराम यांचेकडून तहाच्या मूलभूत अटी ठरविण्याचे वेळीं आणा शपथा घेवविल्या होत्या. त्या घेतांना मुस्ताफानें एक वस्तादागिरी केली होती. त्यानें एका बहुमूल्य भरजरी रुमालाच्या आंत कुराणाचे ऐवजीं एक मोठी वीट ठेवून ती पोथीसारखी आपल्या काखेंत ठेविली होती, व शपथ घेण्याचे वेळीं आंत वीट असलेल्या रुमालाला हात लावून व तिला कुर्बान करून आम्ही दगलबाजी करणार नाहीं अशा अर्थाचे शब्द उच्चारले होते. भास्करपंडिताच्या ध्यानांत त्याची ही लुच्चेगिरी न आल्यामुळें त्यानें नबाबाच्या भेटीसाठीं त्याच्या छावणींत जाण्याचें कबूल केलें होतें. असो. ठरलेल्यावेळीं मुस्तफा व जानकीराम हे भास्करपंडितासाठीं खिलात घेऊन आमंत्रण करण्यास आले. भास्करपंडितानें खिलातीचा स्वीकार करून जाण्याची तयारी केली. भास्करपंडितानें आपल्याबरोबर आणलेली फौज नबाबाच्या छावणीपर्यंत नेली होती. तिला सलामी देण्यासाठीं नबाबानें ही आपली फौज छावणीच्या बाहेर व्यवस्थित रीतीनें उभी केली होती.

भास्करपंडिताला व त्याच्या फौजेला नबाबाच्या फौजेनें सलामी दिल्यावर दोन्ही फौजा बाहेरच उभ्या राहिल्या व भास्कर-पंडितानें अलीभाई व वीस निवडक सरदार यांसह स्वागताच्या डेऱ्यांत प्रवेश केला* प्रवेशद्वारापाशीं त्याचें स्वागत करण्यास मुस्तफा व राजा जानकीराम हे उभे होते. डेऱ्याच्या दाराशीं आंत नबाब त्यांच्या स्वागतार्थ उभा होता. मंडळी डेऱ्यांत शिरतांच मुस्तफा व जानकीराम बाहेरच्या बाहेर सटकले. नबाबानें यांतले भास्करपंडित कोणते असा प्रश्न मराठ्यांकडच्या सरदारमंडळीस केला, व त्यांनीं पंडिताकडे हात दाखवितांच नबाबानें मोठ्यानें 'काफरको मारो' असा हुकुम केला. त्याबरोबर लपून बसलेले नबाबाचे सशस्त्र सरदार पुढें झाले आणि भास्करपंडितावर तुटून पडले. कित्येक त्याच्याबरोबर आलेल्या इतर मराठे सरदारावर हत्यार चालवूं लागले. थोडावेळ झटापटी होऊन शेवटीं भास्करपंडित व त्याचे सगळे

---

* नागपूरकर भोसल्यांचे बखरींत (पृ. ४३ टीप ९३) मारलेल्या सरदारांचीं २२ नांवें दिलीं आहेत. तीं अशीं:—१ भास्करपंत, २ अली करवाल, ३ यशवंतराव गुजर, ४ नीलकंठराव मोहिते, ५ दाजीबा भोसले, ६ बाबूजी महाडीक, ७ शहामदखाँ, ८ मनाजी भोसले, ९ नारायण भोसले, १० संभाजी भोसले, ११ कृष्णराव निंबाळकर, १२ बापूजी कदम, १३ श्रीपतराव मेहेकर, १४ व्यंकटराव भाऊ, १५ दाजीबा पाटणकर, १६ बळवंतराव शिर्के, १७ गोविंदराव शेलूकर, १८ सठवाजी जाधव, १९ शिवाजी जामदार, २० सुभानजीराव, २१ नानाबक्षी, व २२ जोतिबा कारभारी.

सरदार मारले गेले. डेऱ्याच्या कनातीखालीं सोडून दोऱ्यांनीं मजबुती केल्यामुळें मराठेसरदारांना झटापटींत पळून जातां आलें नाहीं. सगळे मराठेसरदार याप्रमाणें मारले गेल्यावर नबाबाच्या फौजेंत जयवाद्यें वाजूं लागलीं. तो इषारा होतांच नबाबाच्या फौजेनें मराठ्यांच्या फौजेवर हल्ला केला. हा प्रकार पाहून मराठेसरदारांपैकीं राघो गायकवाड नांवाच्या सरदारानें सर्वांच्या आधीं आपल्या पथकासह तेथून पाय काढला. त्याचें उदाहरण पाहून दुसऱ्याही कित्येक सरदारांनीं तसेंच केलें. कटव्यास राहिलेल्या बाकीच्या मराठे सैन्याला ही हकीकत कळली, तेव्हां तें मुकाट्यानें नागपुराकडे निघून गेलें.*ही गोष्ट इ. स. १७४४ मध्यें घडली.

---

* काव्येतिहास संग्रह (३२) 'नागपूकर भोसल्यासंबंधाचे कागदपत्र' यां पुस्तकांत या विषयीं असें लिहिलें आहे—'भास्करराम छावणी करून होते तेथें अलीवर्दीखान व मीरजाफरखान या उभयतांनीं फंद करून पंतास मेजवानीचे बहाण्यांनीं बागांत डेरा देऊन तेथें नेऊन डेऱ्याचे तनावे कापून गरदी करून शीर कापलें. (पृ. १०) भोसल्यांच्या लढाया व तहनामे या प्रकरणांत याच प्रकारासंबंधानें पुढील मजकूर आहे—" दुसरी लढाई बंगाल्याची, यामध्यें जुबानी लोकांचे कीं जगन्नाथाचे मैदानांत बाजीराव पेशव्याची लढाई झाली. त्यास सोभामल यांनीं बंगाल्याची हकीकत सांगितली त्यांत लिहिलें जे, जेव्हां रघोजी भोसलेनीं भास्करपंतास साठ हजार फौजेनिसी बंगाल्याकडे रवाना केलें, सारांश अडीच वर्षे यांची लढाई झाली. अखेरीस अलेवर्दीखानानें दगलबाजीवर इरादा ठेवून वालीभाई व राजे जानकीराम व मुस्तफाखान याजला भास्करपंताशी सल्लाह करण्यास्तव पाठविलें. चवथाईचा अमंल

ही गोष्ट इ. स. १७४४ मध्यें घडली. नबाब अलीवर्दीखानाला झालेल्या या प्रकाराबद्दल यत्किंचित्‌ही वाईट न वाटतां उलट मजा वाटली. डेऱ्यांत दगलबाजीनें सगळ्या मराठे सरदारांची अशी कत्तल केल्यावर तो हत्तीवर बसून जाण्यास निघाला, तेव्हां त्याचा एक जोडा त्या गडबडींत सांपडेना. तेव्हां एकजण सहज म्हणाला, ' हुजूर, मराठे आतां गडबड करतील. आपण आतां जोड्यावांचूनच हत्तीवर आरूढ होऊन येथून लवकर चालते व्हावें.' त्यावर नबाब हंसून म्हणाला, 'वा: ! तसें मीं केलें तर लोक काय म्हणतील ? ते म्हणतील कीं अलीवर्दीखान इतका भयभीत झाला कीं पळून जाण्याचे गडबडींत त्याला आपल्या जोड्याची सुद्धां शुद्ध त्याला राहिली नाहीं.' मुसलमान इतिहासकारांनीं ही दंतकथा मोठ्या आढ्यतेनें दिली आहे. पण शांतपणें विचार करून पाहणारास ती नबाबाच्या निष्ठुर आणि पाषाणहृदयत्वाची साक्ष वाटून त्याच्या मनांत नबाबाविषयीं अत्यंत तिटकारा उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं.

देण्याचें कबूल केलें. क्रिया ही केली. डेऱ्यास नेऊन भास्करपंतास मारलें " या उताऱ्यांवरून मराठी बखरकारांना बंगाल्यांत घडलेल्या या भयंकर कृत्याची किती थोडी, अस्पष्ट व अंधुक माहिती होती तें दिसून येतें. उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक कागदपत्रांत या स्वाऱ्यांसंबंधानें फारच थोडा उल्लेख आहे यावद्दल अर्थात् फारसें आश्चर्य कोणास वाटावयास नको.

मुसलमान इतिहासकारांनीं अलीवर्दीखानाच्या या दगलबाजीच्या कृत्याचें मंडन करण्याचा मोठाच अट्टहास केला आहे. जशास तसें या न्यायानें नबाबानें वर्तन केलें असें सांगून त्यांनीं नबाबाच्या दुष्टपणाच्या वर्तनाचें समर्थन केलें आहे. महाराष्ट्र-पुराणकार तर हिंदु होता. पण त्यानेंही या संबंधांत लिहितांना भास्करपंताला त्याच्या लोकांनीं केलेल्या गोवधाचें व स्त्रियांवरच्या अत्याचाराचें योग्य बक्षीस मिळालें असें म्हणून समाधान व्यक्त केलें आहे, व वरवर विचार करणारासही प्रथमदर्शनीं तसेंच वाटेल. पण निर्विकार दृष्टीनें विचार करून मनाचा निर्णय करूं इच्छिणारास या बाबतींत दोन तीन गोष्टींचा विचार अवश्य करावा लागेल. पहिली गोष्ट ही कीं मराठे लोकांनीं बंगालवर स्वाऱ्या केल्या त्या केवळ धनलोभानें केल्या किंवा आपले हक्क नवाब अलीवर्दीखान बुडवूं पाहत होता, त्याच्या रक्षणार्थ त्यांना त्या कराव्या लागल्या. दुसरी गोष्ट, मराठ्यांनीं निरर्थक व निष्कारण असे—विशेषतः स्त्रियांवर—अत्याचार केले असा जो त्यांच्यावर आरोप आहे तो कितपत खरा आहे; आणि तिसरी गोष्ट म्हणजे भास्करपंडिताकडे त्याबद्दलची जबाबदारी कितीशी येते ? पहिल्या मुद्यासंबंधानें मुसलमान इतिहासकारांमध्यें आपआपसांत एकवाक्यता नाहीं. मराठे केवळ लुटीच्या लालचीनें आले असें कित्येक म्हणतात, तर कोणी बादशहानें सनद करून दिलेला चौथाईचा हक्क देण्याची टाळाटाळ नबाब करूं लागला, सबब

तो हक्क वसूल करण्याकरितां ते आले असें स्पष्ट लिहितात. महाराष्ट्र पुराणकर्त्यानें तर ही गोष्ट अगदीं स्पष्ट शब्दांनीं सांगून मराठ्यांनीं स्वाऱ्या केल्या त्या दिल्लीच्या बादशाहाच्या संमतीनें केल्या असें उघड म्हटलें आहे. महाराष्ट्र-पुराणकर्ता हा या स्वाऱ्या झाल्या त्यावेळीं हयात होता. अलीवर्दीखान दिल्लीच्या बादशाही अंमलाला झुगारून स्वतंत्र होऊं पाहत होता ही गोष्टही सुप्रसिद्ध आहे. त्यानें बादशहाच्या सनदेप्रमाणें चौथाई हक्क मराठ्यांना कित्येक वर्षें दिला नाहीं ही गोष्टही मुसलमान इतिहासकार नाकबूल करीत नाहींत. तेव्हां मराठ्यांनीं किती दिवस वाट पाहावयाची ? व त्यांनीं अशी दंडेली करणाऱ्या नबाबाची खोड मोडण्याकरितां त्याच्या प्रांतावर स्वाऱ्या केल्या यांत काय गैर केलें ? दुसरा मुद्दा निरर्थक जाळपोळ व अत्याचार या संबंधाचा. यासंबंधांतही मराठ्यांच्या वर्तनाचें समर्थन मी करूं पाहतों अशी वाचकांनीं आपली समजूत करून घेऊं नये. मराठ्यांनीं जर खरोखरीच अत्याचार केले असतील तर त्याबद्दल ते दोषास पात्र आहेत असेंच मी म्हणेन. पण हा दोष त्यांना लावण्यापूर्वीं त्यांच्यावरचा आरोप शाबीत झाला पाहिजे. मनुष्याचें वर्तन एरवीं शेंकडों प्रसंगीं अत्यंत शुद्ध व निष्कलंक असतां एकाच प्रसंगीं व एकाच विशिष्ट जातीविषयीं अतिनिंद्य व तिरस्कारार्ह असण्याचा संभव फार कमी असतो. मराठ्यांनीं—खुद्द रघोजी भोसल्यांनीं—बंगालवर स्वाऱ्या करण्यापूर्वीं कर्नाटक वगैरे प्रांतावर स्वाऱ्या केल्या होत्या. त्या

स्वाऱ्यांत कोठेंही मराठ्यांनीं असा क्रूरपणा केल्याचें उदाहरण नाहीं. असें असतां मराठ्यांनीं बंगाल प्रांतांतच आपल्या कुल-कीर्तीला कलंक लावण्यासारखें कृत्य केलें असेल ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. लिहितांना अतिशयोक्ति करण्याची खोड मुसलमान इतिहासकारांत अगदीं सामान्य आहे हें आपण पाहतों. श्री शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीतल्या गोष्टी ज्या मुसलमान इतिहासकारांनीं लिहून ठेविल्या आहेत त्यांत सत्याचा अंश कितीसा आहे, त्याचा निकाल अनेक प्रसंगीं मुसलमानांना प्रतिकूळ असाच लागलेला आहे. तेव्हां बंगालवरच्या या स्वाऱ्यांसंबंधानें त्यांनीं चिडून लिहिलेल्या वर्णनांत सारें तथ्यच आहे अशी मनाची कल्पना करून घेऊन त्यांच्या एकतर्फी व अतिशयोक्तिपूर्ण विधानांवर विसंबून मराठ्यांवर भलभलते आरोप करणें हा सुज्ञपणा खास नव्हे. मराठ्यांनीं या स्वारींत जाळपोळ बरीच केली यांत शंका नाहीं. पण ती त्यांना कर-ण्यास लावणारे कोण होते याचाही विचार केला पाहिजे. ते जर चौथाईचा हक्क न्यायानें मागत होते व तो नबाब त्यांना देण्यास तयार नव्हता, तर त्या काळच्या राजनीतीप्रमाणें त्यांनीं तो लोकांना लुटून मिळविण्याचा यत्न केला, व लोक जेव्हां आपली चीजवस्त घरांतून नेऊन बाहेर शेतांतून पुरून ठेवूं लागले, तेव्हां मराठ्यांनीं निराशेनें चिडून लोकांचीं रिकामीं घरें जाळलीं यांत त्यांचा क्रूरपणा तो काय झाला ? मराठ्यांनीं स्त्रियांवर अत्याचार केला हा आरोप तर सर्वथा खोटा आहे.

खुद हा आरोप करणारे आपण केलेल्या आरोपाच्या समर्थनार्थ एकही उदाहरण देत नाहींत. मराठ्यांच्या ठायीं स्त्रीजातीविषयीं नेहमीं आदर बुद्धि वसत असे व अद्यापही ती तशीच आहे. स्त्रीजातीला तुच्छ समजणारे १७ व्या १८ व्या शतकांत जर कोणी असतील तर ते मुसलमान लोकच होत हें बादशहांच्या कारकीर्दींतल्या अनेक गोष्टींवरून सिद्ध झालें आहे. म्हणून स्त्रियांवरच्या अत्याचाराच्या बाबतींत मुसलमान इतिहासकारांनीं मराठ्यांवर केलेला आरोप ' कुत्र्याला कांहीं तरी खोड ठेव, आणि फांशी दे ' या इंग्रजी म्हणीची सार्थता दाखविणारा आहे, यापलीकडे त्यांत तथ्य नाहीं, असें म्हणणें भाग आहे. महाराष्ट्र-पुराणकर्त्यानें गोहत्येचें पातक भास्करपंताचे माथीं मारलें आहे. त्यासंबंधानें इतकेंच सांगणें बस होईल कीं भास्करपंडितानें जाणून बुजून गोहत्त्या करण्याचा हुकुम केला असेल, व केला असता तरी त्याच्या मराठे बारगिरांनीं तो ऐकला असता, अशी त्यावेळीं स्थितिच नव्हती. गोवध हा शब्द धर्म-श्रद्धा व धर्मबंधनें अत्यंत शिथिल झालेल्या सध्याच्या काळांतसुद्धां प्रत्येक हिंदूच्या अंगावर शहारा आणितो. मग लढाईच्या धाम-धुमीच्या वेळीं देखील दुर्गापूजोत्सवासारखें धर्मकृत्य अंतरूं नये म्हणून जपणाऱ्या भास्करपंडितानें गोवधासारखें महापातक जाणून बुजून घडविलें ही गोष्ट कोणास संभवनीय वाटेल? सारांश, भास्करपंडितावर मुसलमान व इतर इतिहासकार यांनीं केलेले सगळे आरोप निराधार आहेत याविषयीं बिलकुल शंका नाहीं.

मराठ्यांची सगळी फौज बंगाल्यांतून निघून गेली, एकही मराठा राहिला नाहीं, असें पाहून अलीवर्दीखान आपल्या विजयाची (?) घोषणा करीत मोठ्या थाटामाटानें मुर्शिदाबादेला परत गेला, आणि तेथें दरबार भरवून त्यानें आपल्या लोकांपुढें आपल्या अपूर्व करामतीचें अतिशयोक्तीचें वर्णन केलें. मुस्तफाखान, राजा जानकीराम वगैरे ज्या ज्या अधिकाऱ्यांनीं या घोर कृत्यांत नबाबाला साह्य केलें होतें त्यांना नबाबानें दरबारांत मानाची खिलात, किताब, पदव्या व देणग्या दिल्या; आपल्या फौजेंतल्या शिपायांमध्यें दहा लाख रुपयांची रक्कम बक्षिसादाखल वाटली; आणि आपल्या बहादुरीच्या वर्णनाचें एक विस्तृत पत्र दिल्लीच्या बादशहाकडे पाठवून दिलें. बादशहा तें पत्र पाहून खुष झाला. त्यानें नबाबाला सुजाउल्मुल्क (राज्य-वीर) हा किताब पाठवून दिला. मुस्ताफाखानालाही बाबरजंग (समर-व्याघ्र) असा किताब देण्यांत आला. येवढ्यानेंच झालें नाहीं, तर बादशहानें अलीवर्दीखानाला स्वदस्तुरचें प्रशंसापत्र व एक मूल्यवान् पोशाख, एक तरवार, एक उमदा घोडा, व अनेक बहुमूल्य रत्नालंकार पाठविले. अशा प्रकारें केवळ दगलबाजीनें व विश्वासघातानें शत्रूचा निःपात करणाराचा येवढा गौरव करणारा दिल्लीचा बादशाहा, व त्या गौरवाचा स्वीकार करणारा नबाब हे दोघेही किती नीतिभ्रष्ट झाले असले पाहिजेत याची यावरून चांगली कल्पना करतां येते.

प्रकरण आठवें.

बंगालवर चवथी स्वारी

(इ. स. १७४८)

भास्कर पंडिताचा व त्याच्या बरोबरच्या सरदार मंडळीचा असा विश्वासघातानें वध करणाऱ्या नबाबावर सूड उगविल्याशिवाय रघोजीला आतां चैन पडेना. तो आपला मुलगा जानोजी, दत्तक पुत्र मानाजी, आणि मीरहबीब यांस घेऊन मोठ्या सैन्यासह बंगालवर स्वारी करण्यासाठीं निघाला. मराठे ओरिसाप्रांतांत कटक येथें येऊन पोंचले. तेथें नायब सुभेदारीच्या कामावर मीरजाफर हा होता. त्याच्याकडे बहार प्रांताच्या रक्षणाचें काम सोंपवून अलीवर्दीखान त्वरेनें मुर्शिदाबादेकडे चालता झाला. त्याला भीति ही होती कीं मुस्तफाखान मराठ्यांना जाऊन मिळेल व ते दोघे मिळून मुर्शिदाबादेवर चाल करून येतील. कारण, यावेळीं मुस्तफा नबाबाचा द्वेष करीत होता. त्यानें नबाबा विरुद्ध उघड बंड केलें होतें. तो बंडखोर अफगाण लोकांचा नायक बनला होता. कडवे अफगाण व लुटारू मराठे हे जर एक झाले तर आपली व आपल्या देशाची धडगत नाहीं अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झालेली होती. म्हणून अफगाण व मराठे यांनीं एक होऊं नये या विषयीं हर-

तऱ्हेचे प्रयत्न करून पाहिलें. त्यानें पुनः मागच्याप्रमाणें मराठे लोकांना द्रव्याच्या भुलथापा देऊन वश करण्यासाठीं त्यांचेकडे आपले वकील पाठविले. रघोजीच्या मनांत आतां नबाबाचा उच्छेद पूर्णपणें करावयाचा होता. म्हणून तो प्रथम तहाची गोष्टच ऐकण्यास तयार नव्हता. पण नबाबानें जेव्हां दिल्लीच्या बादशहाकडून आलेल्या मुनामखा नांवाच्या एका तिऱ्हाईत सरदाराला मध्यस्थीला घातलें, तेव्हां कांहीं तरी अशक्य अशी अट घालून तहाची उडवाउडव करावी म्हणून रघोजीनें भास्करपंत व मारले गेलेले सरदार यांच्या जिवांची किंमत म्हणून तीन कोट रुपये मागितले. ही रक्कम या सरदाराच्या अमूल्य प्राणांच्या मानानें व नबाबानें केलेल्या विश्वासघाताबद्दल दंड या दृष्टीनें पाहिली तर कांहीं फार नव्हती. पण नबाबाचा खजिना मागील स्वाऱ्यांच्या वेळीं कराव्या लागलेल्या लढायांच्या पायीं खलास झाला होता ही गोष्ट रघोजीला ठाऊक असल्यामुळें त्यानें तीनच कोट रुपयांची मागणी केली. वस्तुतः या पेक्षांही मोठी रक्कम त्यानें मागितली असती, तरी त्याची मागणी गैरवाजवी झाली नसती.

तहाच्या या वाटाघाटीपासून कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. अलीवर्दीखानाच्या मनांतून येवढी मोठी रकम मराठ्यांना देण्याचें नव्हतें; पण साफ नाहीं असें उत्तर देण्याचेंही धैर्य त्याला होईना. तो चाळवाचाळव करूं लागला. तसें करण्यांत त्याला एक मतलब साधावयाचा होता. मराठ्यांशीं लढाईत गुंतण्याचे

पूर्वीं मुस्तफाखानाचें बंड त्याला मोडावयाचें होतें. म्हणून त्यानें मुनाफाखानाला हीं तहाचीं बोलणीं अशींच कित्येक दिवसपर्यंत घोळत ठेवण्याबद्दल सांगून ठेविलें. मुनाफाखानही आपल्या मालकाच्या हुकुमाप्रमाणें 'नवाब साहेब आपल्या मागण्याचा विचार करीत आहेत.' 'आजकाल त्यांची प्रकृति बरी नाहीं, त्यांच्या जिवाला जरा आराम वाटतांच मी आपल्या कामाची त्यांना पुनः आठवण देईन.' 'नबाबसाहेब सध्या मुसलमानी धर्माप्रमाणें उपास करीत असतात, व धर्मकृत्यांपलीकडे कशांतही मन घालीत नाहींत; तथापि ते मराठ्यांशीं सलोखा ठेवण्याविषयीं फार उत्सुक आहेत,' अशा प्रकारें गुळचट थापा देऊन रघोजीला झुलवीत राहिला होता. अशा थापा देत देत त्यानें दोन महिने काढले. येवढ्या अवकाशांत बादशहानें मुस्तफाला ताळ्यावर आणण्यासाठीं सैन्य पाठविलें व त्याच्याशीं झालेल्या झटापटींत मुस्तफा मारला गेल्याची खबर आली.

ती खबर येतांच नबाबाचा रंग एकदम पालटला. त्याचें तें दुखण्याचें ढोंग, मराठ्यांशीं सलोखा ठेवण्याची उत्सुकता, आणि धर्मसाधन सगळें कांहीं पार नाहींसें झालें, आणि त्यानें रघोजीला उद्दामपणानें निरोप पाठविला कीं 'शत्रूशीं तहाचें बोलणें लावण्यास कोण तयार होतो? तर ज्याला आपली स्वतःची दुर्बळता ठाऊक असते किंवा शत्रूकडून ज्याला कांहीं फायदा करून घ्यावयाचा असतो तो. पण अल्लाच्या कृपेनें खऱ्या धर्माच्या वीरांना काफरांचें भय मुळींच वाटत नाहीं.

म्हणून आपल्यांत तह तेव्हांच होईल कीं जेव्हां इस्लामी धर्माचे सिंह मूर्तिपूजकरूपी राक्षसांशीं लढून त्यांच्या रक्ताच्या प्रवाहांत पोहतील व शत्रूला चीत करून त्यांना दातीं तृण धरून शरण यावयास लावतील. हें जोंपर्यंत घडलें नाहीं, तोंपर्यंत तहाचें नांव कशाला काढतां?' तहाचें बोलणें करण्यास आलेल्या मुनाफाखानानें आज दोन महिने दाखविलेली नम्रता व आतांचा खुद्द नबाबाचा हा उद्दामपणा पाहून रघोजी चकित झाला. तथापि त्यानें जबाब पाठविला कीं 'आपण म्हणतां तो प्रसंग घडवून आणण्यासाठींच मी आपलें घरदार सोडून आज पांचशें कोस चालून आलों आहें. पण आपण तर आमच्या सारख्या पाहुण्यांचा पाहुणचार कांहींच करीत नाहीं!' यावर अलीवर्दीनें जबाब पाठविला कीं 'आपला समाचार घेतला नाहीं, याचें कारण पर्जन्यकाळ समीप आला आहे हें आहे. आपण आतां चार दिवस विश्रांति घ्या. त्यानंतर आपल्यासारख्या पाहुण्यांचा समाचारच घेऊन आम्ही राहणार नाहीं, तर होईल तितकें करून आपणांस आपल्या घराच्या दारापर्यंत पोंचविण्यास येऊं.' रघोजीला हें पत्र मिळाल्यानंतर त्यानें क्षणाचा ही विलंब न करतां बीरभूमकडे कूच केलें, आणि तेथें आपल्या सैन्याचा मुख्य तळ देऊन तेथून हळू हळू सभोंवतालच्या प्रांतावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. मेदिनीपुरापासून हिजिलीपर्यंत सगळा ओरिसाप्रांत व बरद्वानचा बहुतेक भाग त्यानें अशा रीतीनें हस्तगत केला.

अबदुल अजीज हा बाराभाटी किल्ल्याचा किल्लेदार होता. त्यानें बरेच दिवसपर्यंत किल्ल्याचें रक्षण केलें. पण मराठ्यांनीं रसदच बंद केली, तेव्हां त्याचा इलाज चालेना. तो रघोजीला शरण गेला. दुर्लभरामही रघोजीच्या हातीं लागला होता व त्याला त्यानें कैद करून ठेविलें होतें. शेवटीं नबाबानें तीन लक्ष रुपये देऊन त्याला बंद मुक्त केलें.

मुस्ताफाखान मेल्यामुळें अफगाणलोकांना कोणी नायक व पुरस्कर्ता राहिला नाहीं. म्हणून ते डोंगरात वस्ती करून राहूं लागले. पण दुष्ट जमीनदार लोक तेथेंही त्यांना स्वस्थ राहूं देईनात. या अफगाण लोकांनीं जी थोडी बहुत लूट मिळविली होती तिच्यावर या जमीनदारांची दृष्टी होती. त्यांनीं कांहींना कांहीं सबबीवर भांडण काढून अफगाण लोकांना त्रास द्यावा व त्यांचे कडून पैसे काढावे. असें कित्येक दिवस चाललें होते. शेवटीं ते लोक कंटाळले, आणि रघोजीपाशीं आश्रयार्थ याचना करूं लागले. रघोजीला त्यांची दया आली व त्यानें त्यांना आपल्या सैन्यांत भरती करून घेतलें. अलीवर्दीखानही स्वस्थ बसला नव्हता. पर्जन्यकाळांत त्यानें सैन्यांत भरती करून या नव्या शिपायांना लष्करी शिक्षण देऊन तयार केलें, आणि जय्यत तयारी करून पावसाळा संपतांच तो मराठ्यांच्या छावणीकडे जाण्यास निघाला. या खेपेस मराठ्यांचा समूळ उच्छेद करावयाचा असा त्याचा कृतसंकल्प होता. त्यासाठीं लोकांना लढण्यास आवेश यावा म्हणून

त्यानें नाना उपाय केले. मराठ्यांच्या क्रूरतेच्या गोष्टी सैनिकांना सांगून त्यांच्या अंगांत आवेशाचा संचार केला. अलीवर्दीखान हा उत्तम वक्ता होता. त्यानें मराठ्यांच्या दुष्ट कृत्यांचीं अशीं तिखटमीठ लाविलेलीं वर्णनें आपल्या रसाळ वाणीनें शिपायांपुढें करावीं कीं त्या शिपायांचे बाहु गनीमाच्या रक्तांत केव्हां तरवारी बुडवूं असें स्फुरण पावावे. या गनीमांनीं तुमचीं घरेंदारें जाळलीं, तुमच्या मशीदी व कबरस्थानें भ्रष्ट केलीं, तुमच्या आयाबहिणींची विटंबना केली, तुमच्या पोराबाळांची उपासमार करून त्यांना मारलें, याबद्दलचा सूड तुम्ही कधीं घेणार ? असा प्रश्न त्यानें वारंवार करावा व शिपायांना चिडवावें. *

इ. स. १७४८ च्या पावसाळ्यानंतर अलीवर्दीखानानें आपल्या फौजेस कूच करण्याचा हुकूम केला, आणि पाटण्याजवळ बांकीपुर येथें तळ दिला. तेथें त्याला कळलें कीं मराठे नुकतेच शोणनद उतरून पलीकडे गेले आहेत. त्यावरून तो मुहिलीपूर (मोहिब्र अलीपुर) येथें गेला. नबाबानें आपल्या बरोबर प्राणांपलीकडेही प्रिय असा आपला नातू सुराज-उद्दौला यास घेतलें होतें.

मुहिलीपुराहून मराठ्यांच्या छावणीचा गलबला ऐकूं आला. तेव्हां शत्रु जवळ आहे असें पाहून नबाबानें त्याच्यावर कशा रीतीनें चाल करावयाची, घोडेस्वारांनीं कोणत्या मार्गानें जावयाचें,

* एक मुसलमान इतिहासकार तर असें लिहितो कीं, आपल्या शिपायांचे अंगीं त्वेष चढावा ह्मणून नवाब त्यांना दारूही पाजीत असे.

तोफा कशा लावावयाच्या, वगैरे सगळ्या गोष्टी ठरवून ठेविल्या. सेनापतीचें काम मीरजाफर व समशेरखान या दोघा सरदारांत वांटून दिलें. आताउल्ला व सरदारखाँ यांच्याकडे सैन्याची उजवी बाजू व आजिमाबादचा सुभेदार जैनुद्दिन यांच्याकडे डावी बाजू रक्षण करण्याचें काम सोपविलें. नबाबाच्या डंकानिशाणावर मुख्य अधिकारी रहिमतखाँ यास नेमिलें. हा हत्तीवर बसून नबाबाचें निशाण फडकावीत सैन्याचे अग्रभागीं निघाला. स्वतः नबाब अलीवर्दीखान आपल्या नातवासह सैन्याच्या मध्यभागीं होता, व सैय्यद अहमदखा फौजेच्या पिछाडीस होता. इतर सरदारांनाही त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें कामें नेमून दिलीं होतीं, व त्याप्रमाणें ते सैन्याबरोबर चालले होते.

नबाबानें मुद्दाम अंधाऱ्या रात्रीं आपला तळ हालविला; पण सैन्याचें कूच इतकें मुकाट्यानें केलें कीं, मुसलमान इतके जवळ आले आहेत याची गंधवार्ताही मराठ्यांना लागूं दिली नाहीं. रघोजीला आपल्या शौर्याचा व निधड्या छातीचा मोठा गर्व होता. यामुळें शत्रु कोठें आहे, काय करीत आहे, वगैरे गोष्टींची चौकशी तो फारशी करीत नसे. शत्रु केव्हांही चालून आला, तरी आपण व आपले शिपाई त्याला पुरून उरूं अशा भलत्याच फाजील आत्म-प्रत्ययावर तो विश्वासून राहिला होता. त्याच्या स्वभावांत हा मोठा दोष होता असें स्पष्टपणें ह्मटलें पाहिजे. अलीकडच्या काळांतल्या लढाया म्हणजे कांहीं द्वंद्वयुद्धासारखीं शारीरिक शक्तीचीं युद्धें नव्हेत. अलीकडच्या

युद्धांत शारीरिक बळापेक्षां युक्तीचेंच बळ अधिक लागतें. पण रघोजीसारख्या अनेक लढाया मारलेल्या वीराच्या ध्यानांत ही गोष्ट येऊं नये व त्यानें शत्रूच्या हालचालीची कांहीं बातमी न ठेवतां आपल्याचं शक्तीच्या धुंदींत निमग्न राहावें हें आश्चर्य आहे. अथवा आश्चर्य कसलें ? 'विनाशकाले विपरीतबुद्धिः' हा नियम सार्वत्रिक दिसतो.

रघोजी स्वस्थ बसला होता, पण त्याचा विनाशकाळ स्वस्थ बसला नव्हता. तो आपला मार्ग हळू हळू आक्रमण करीतच होता. हां हां म्हणतां नबाबाच्या सैन्यानें मराठयांना गांठिलें. शत्रूचें सैन्य अकस्मात् येऊन ठेपलेलें पाहतांच रघोजी चकित झाला. पण तो विलक्षण धीराचा असल्यामुळें बिलकुल घाबरला नाहीं. त्याची हिंमत जबर होती. सैन्याची लढाईची कांहीं तयारी नव्हती; तरी शत्रूला पाठ दाखवावयाची नाहीं, मर्दासारखे दोन हात करून दाखवूं, असा त्याचा कृतसंकल्प होता. त्याप्रमाणें तो युद्धाला उभा राहिला. मराठ्यांची तयारी नव्हती तरी त्यांनीं लढण्याची शिकस्त केली. दोन्ही पक्षांची हानि फार मोठी झाली. या युद्धांत मराठ्यांनीं अपूर्व शौर्य आणि युद्धकौशल्य दाखविलें ही गोष्ट मुसलमान इतिहासकारांनीं ही कबूल केली आहे. परंतु नबाबाच्या सैन्याची तयारी जबर, तिच्या पुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून, मराठ्यांना हार खाऊन पळून जावें लागलें. पळून जाण्याच्या धांदलींत मुसलमानांपासून मिळविलेली सगळी लूट मराठयांनीं तशीची तशीच त्या मैदानांत टाकली होती.

मराठ्यांना अशा रीतीनें माघार घ्यावी लागली यामुळें रघोजीचें चित्त उदास होतें. पण मीरहबीब यानें युक्तीच्या चार गोष्टी सांगून ती उदासीनता दूर केली. त्यानें सल्ला दिली कीं 'पुन्हां सांवर धरून मकसुदाबादेवर जाऊन त्याजवर फौजेचा समेट करून दुसरे मार्गानें मकसुदाबादेस गेले. त्यांचे पिछावर अलीबर्दीखान मोहबतजंग याजकडून फौजा जाऊन लढाई झाली. इतक्यांत वर्तमान आलें कीं रघुनाथसिंग नामें दिवाण गोंड राजाकडील बदलून आहे व गोंडाचा उपद्रव देवगड प्रांतीं ज्यास्त झाला याजवरून माघारे आले.'[1] मुर्शिदाबादेवरील या स्वारीचें अधिक वर्णन मुसलमानांनीं लिहिलेल्या इतिहासांत आढळतें तें असें---

मराठ्यांचा पराभव झाला यामुळें नवाब शेफारून गेला होता, पण नबाबाची बायको फार हुशार व चतुर होती. रघोजीच्या अंगच्या गुणांची व स्वभावाची खरी परीक्षा तिला झालेली होती. रघोजी या प्रसंगाचें उट्टें काढल्याशिवाय राहणार नाहीं हें तिला पक्कें ठाऊक होतें. म्हणून तिनें मुजाफरअलीखान व फकी आलीखान या दोघां सरदारांना रघोजीकडेस पाठवून झाल्या गोष्टीबद्दल क्षमा मागतों, पण एकदांचा आमचा पिच्छा सोडा, अशा अर्थाचा निरोप पाठविला. रघोजीलाही वारंवार इतकें दूर येऊन लढाया करण्याचा कंटाळा आला होता. म्हणून कांहीं अटींवर तो या गोष्टीस कबूल होणार होता.

१ नागपूरकर भोसल्याची बखर पृ. ४४

पण मीरहबीब यानें तो विचार खोडून काढून मुर्शिदाबादेवर चालून जाण्याची त्याला मसलत दिली. त्या मसलतीप्रमाणें रघोजी मुर्शिदाबादेवर चालून गेला. नबाबाला ही बातमी लागतांच तोही त्वरेनें तिकडे गेला. परंतु मुसलमान सैन्याची रसद मराठ्यांनीं बंद करून टाकल्यामुळें त्यांना फार कष्ट सोसावे लागले. शोणनदीच्या कांठाकाठानें नबाब आपलें सैन्य नेऊं लागला. वाटेंत त्याला दोन मुसलमान सरदार भेटले. हे कांहीं कामासाठीं अजिमाबादेस जैनुद्दिन अहमद याजकडेस चालले होते. वाटेंत मराठ्यांनीं त्यांना लुटून बेदम मारलें, व एकाचें तर नाकही कापलें! त्यांची ती दुर्दशा पाहून नबाबाला अतिशय वाईट वाटलें. नबाबानें अजिमाबादे-कडे मोर्चा वळविला; पण मराठे त्या बाजूनें येत आहेत हें कळतांच त्यांना टाळण्यासाठीं तो चंपानगराला गेला, व आपल्या फौजेला विश्रांति देण्यासाठीं त्यानें तेथें तळ दिला. अलीवर्दीखानाच्या हालचालीची रघोजीनें बारीक बातमी ठेविली होती. नबाबाजवळ पुष्कळ फौज होती, तरी तिचें भय न बाळगतां तो जवळच तळ देऊन राहिला. जी पीडा टाळण्या-साठीं आपण इतक्या लांबच्या वळणानें आलों, ती दत्त म्हणून आपल्यापुढें उभीच आहे, असें पाहून नबाब चकित झाला. मराठ्यांशीं युद्ध करण्याचें सामर्थ्य त्याच्या स्वतःच्या अंगांत उरलें नव्हतें. तो आतां अगदीं थकून गेला होता. म्हणून तें काम त्यानें एका तरुण साहसी सरदाराकडे सोपविलें. त्यानें

युक्तीनें मराठ्यांच्या छावणीच्या मागें जाऊन मराठ्यांच्या सैन्याला वेढा घातला. परंतु रघोजीनें शत्रूची फळी फोडून तींतून निघून जाण्याचा जंगी धाडसाचा यत्न केला. जो समोर येईल तो तरवारीनें कापावयाचा, किंवा भाल्यानें जखमी करावयाचा, असें करीत करीत तो शत्रूची फळी फोडून पार निघून गेला; इतकेंच नाहीं, तर जातांना त्यानें मुसलमानांची लूटही केली; आणि मुर्शिदाबादेवर चालून जाण्याचा आपला बेत अर्धवट सोडला होता, तो यावेळीं तडीस नेऊन मुर्शिदाबादेपाशीं तळ दिला. त्याच्या मागोमाग अलिवर्दीखानही तेथें जाऊन पोंहोचला. नबाबाबरोबर पुष्कळ सैन्य असल्यामुळें रघोजीला मुर्शिदाबाद येथें लूटमार करतां आली नाहीं. तो नबाबाला हुलकावण्या देत त्या प्रांतांत फिरूं लागला. नबाब त्याच्या पाठोपाठ जात होता. होतां होतां शेवटीं कटवा येथें त्यांचें युद्ध जुंपलें. त्या युद्धांत विशेष कांहीं निष्पन्न झालें नाहीं. इतक्यांत वर सांगितल्याप्रमाणें गोंडवणांत बंडाळी उद्भवल्याची खबर आल्यामुळें रघोजीला तिकडे जावें लागलें.

प्रकरण अकरावें.

बंगालवर पांचवी स्वारी.

(इ० स० १७४८–१७५१)

रघोजीनें गोंडवणांत जाऊन गोंडांचें पारिपत्य केलें व मग तो साताऱ्यास शाहुमहाराजांचे दर्शनास गेला. बंगालच्या स्वाऱ्यांची हकीकत ऐकून महाराज खुष झाले. रघोजी आणखी कांहीं दिवस राहाणार होता; पण इतक्यांत चंद्रपुराकडे गडबड झाल्याचें वर्तमान आलें. म्हणून साताऱ्याहून परभारें चंद्रपुरांवर जाऊन रघोजीनें तेथील किल्ला घेतला व राजाला तेथून काढून बल्लाळपुरास पाठविलें; आणि चंद्रपुरच्या किल्ल्यावर कृष्णाजी नारायण सुभा याजला किल्लेदार नेमून व त्याच्याकडे किल्ल्याचा बंदोबस्त सोंपवून तो नागपुरास आला.

नागपुरास आल्यावर रघोजीनें जानोजी भोसले या समागमें तुळजाराम नांवाचा सरदार देऊन फौजेसह त्यांची रवानंगी बंगालकडे केली. याच सुमारास अलीवर्दीखानानें मिरजाफर यास कटक प्रांतीं असलेलीं मराठ्यांचीं ठाणीं घेऊन त्या प्रांतीं मुसलमानांचा अंमल पुनः बसविण्याचे कामगिरीवर पाठविलें

होतें. मिरजाफरानें येऊन कांहीं ठिकाणीं अंमल बसविलाही होता. इतक्यांत जानोजी भोसले मीरहबीब व ब्राम्हणसरदार यांसह फौज घेऊन येत आहे हें त्याला कळतांच तो भिऊन बर्द्वानकडे पळून गेला. जानोजीनें कटक प्रांतांतलीं आपलीं ठाणीं पुनः हस्तगत करून त्यांचा बंदोबस्त केला, आणि मग मुर्शिदाबादेकडे कूच केलें. त्या प्रांतांत मराठ्यांनीं पुष्कळ लूट मिळविली. लोकांना उपद्रवही पुष्कळ दिला. त्यामुळें प्रजा हैराण झाली. अर्थात् लोकांच्या तक्रारी नबाबाकडे फार गेल्या. मराठ्यांपासून वारंवार हा होणारा उपद्रव कसा बंद करावा हें नबाबास कळेना. शेवटीं अलीवर्दीखानानें रघोजीकडे नागपुरास वकील पाठविले.* त्यांनीं रघोजीपाशीं तहाचें बोलणें लाविलें. रघोजीनें त्यांच्या तोंडावर स्पष्ट सांगितलें कीं ‘ जेव्हां क्रोड रुपये खर्चास देऊन बहुत फौजा पाठविल्या, तेव्हां तुम्ही खंडणीचा ऐवज देणार, त्यांतही दगाबाजी करणार, तुमचा विश्वास काय ? भास्करपंताचा तुमचा मोबदला घेणें जरूर आहे.’ वकीलानें उत्तर केलें कीं ‘ झालें तें समर्थ. भास्करपंताचा निराळा मुलुख तोडून देतों. तेथें तुमचें स्वस्थान आहे. त्या मोबदला मुलखाशीं आमचाही मुलुख लागून आहे. अशी

---

* ‘ नागपूरकर भोसल्यांचे संबंधाचे कागदपत्र ’ या पुस्तकांत या वकिलांचीं नांवें शेर अंदाजखान व बुलंदखां अशीं दिलीं आहेत. व ते जानोजीला भेटले असें लिहिलें आहे (पृ. १२२.)

मातबर जागा पातशाही आहे. असें नानाप्रकारें समजावून कटक प्रांत वेढास देऊन तह ठरविला. शिवाय दोन वर्षांची खंडणी राहिली ती २५ लक्ष नगदी द्यावे. याप्रमाणें सिद्धांत झाला.'*

तहाच्या अटी ठरून त्याबद्दलचीं पत्रें मुर्शिदाबादेस नबाबाकडे रवाना झालीं. त्याचप्रमाणें जानोजी भोसले याजला ही पत्र पाठवून कळविण्यांत आलें कीं नबाब अलीवर्दीखान याजकडे तहाबद्दलचीं पत्रें गेलीं आहेत. त्याचा निकाल होईपर्यंत तुम्हीं स्वस्थ असावें, नबाबाच्या मुलुखांत गडबड करूं नये. बंदोबस्तानें असावें.

तहाच्या अटी नबाबाला मान्य झाल्या व त्यानें संमतिदर्शक उत्तरही पाठविलें. याप्रमाणें उभयतांच्या विचारानें तहाच्या अटी कायम झाल्या, त्या येणेप्रमाणें—

१ नबाबानें बंगाल, बहार व ओरिसा या तीन प्रांतांची चौथाई मराठ्यांस नेमानें देत जावी.

---

* नागपूरकर भोसल्यांची बखर पृ. ४५।४६

१ हा तह जानोजी भोसले यांनीं ठरविला असें 'नागपूरकर भोसल्यांच संबंधाचे कागदपत्र' या पुस्तकांत आहे. (पृ. १२२)

२ मीरहबीबअलीनें परत अलीवर्दीखानाकडे जावें, व नबाबानें त्याला ओरिसाचा सुभेदार नेमावें.

३ ओरिसा प्रांताचें उत्पन्न मीरहबीबनें मराठयांच्या सैन्याचे पगारासाठीं लावून द्यावें.

४ मराठ्यांनीं पुनः त्रास न देण्याचें कबूल करावें, व नबाबानें त्याबद्दल त्यांना दरसाल १२ लक्ष रुपये द्यावे.

५ बालेश्वर (बालासोर) जवळची सुवर्णरेखा नदी हीं बंगाल व मराठ्यांचें राज्य यांमधली सरहद् समजावी. मेंदिनीपूर बंगालमध्यें द्यावें. या नदीच्या पलीकडे किंवा तींत मराठ्यांनीं पाऊल ठेवूं नये.

याप्रमाणें पांचकलमी शर्तबंदी ठराव कायम होऊन उभय पक्षांमध्यें तह ठरला. तह ठरल्यावर रघोजीनें आपलें सैन्य मुकाट्यानें बंगालमधून काढून नेलें. त्यानंतर पुनः कधीं मराठ्यांनीं बंगालप्रांतांत पाऊल ठेविलें नाहीं. बंगालप्रांत मराठ्यांच्या त्रासांतून कायमचा मुक्त झाला. तथापि बंगाली लोकांवर मराठ्यांचा दरारा इतका बसला होता कीं, पुढें पांच पन्नास वर्षेपर्यंत ' मराठे आले रे आले ' अशी कोणी हूल उठविली तरी लोक अत्यंत भयभीत होऊन घरदार सोडून पळून जाण्याची तयारी करीत. एकदोनदां अशी हूल उठलीही होती. तथापि ती खोटी ठरल्यापासून लोकांचा जीव

स्वस्थ झाला. लोक शेती, व्यापार, व इतर उद्योगधंदे स्वस्थ मनानें करूं लागले. नबाबानें मराठ्यांशीं लढाई करण्याकरितां जें अधिक सैन्य ठेविलें होतें त्याला रजा दिली, व बंगाल्यांत पुनः शांतता प्रस्थापित झाली. मराठ्यांनीं तहाच्या अटी अक्षरशः पाळल्या. या गोष्टीबद्दल नबाबाला आश्चर्य व अभिमान हीं दोन्हीं वाटलीं. अलीवर्दीखानाच्या मागून बंगालच्या मसनदीवर आलेला नबाब सुराजउद्दौला यानें तर ईस्ट इंडिया कंपनीला लिहिलेल्या एका पत्रांत या गोष्टीचा उल्लेख मुद्दाम केला आहे.

बंगाल प्रांतांत स्वस्थता स्थापित करण्याचे हेतूनें तहाची वाटाघाट चालली होती. मराठ्यांच्या स्वाऱ्यांच्या एकंदर मुळाशीं आपणाशीं बेइमान झालेला मीरहबीब हा आहे हें नबाबाच्या मनांत डाचत होतें. त्याला ओरिसाप्रांताचा सुभेदार नेमण्याची तहाची एक शर्त होती. पण ती नेमणूक करण्याचे पूर्वीच कांहीं तरी युक्तीनें मराठ्यांकडूनच त्याचा घात करवावा असा विचार अलीवर्दीखानानें केला. नबाब अलीवर्दीखान कुटिल राजनीतींत अत्यंत निपुण होता. या बाबतींत साऱ्या हिंदुस्थानांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यानें आपल्या सुपीक मेंदूतून एक सोळा आणे युक्ति काढली ! मीरहबीब बाह्यतः जरी आपल्या पक्षाचा आहे, तरी आंतून तो नबाबाच्या पक्षाचा

आहे असें मराठे लोकांना भासविण्यासाठीं जणूं काय त्याचा व मुसलमानांचा गुप्त पत्रव्यवहार चालला आहे व मीरहबीबच्या एका गुप्तपत्राचें पुढील पत्र हें उत्तर आहे, असें दाखविण्याच्या हेतूनें नबाबानें एक खोटें पत्र तयार करविलें. त्यांत पुढील वाक्य होतें–' तुमचें पत्र पोंचलें. लुटारू मराठ्यांचा नाश कर-ण्याची तुमची योजना फार पसंत आहे. एका बाजूनें तुम्ही व दुसऱ्या बाजूनें आम्ही डोळ्यांत तेल घालून योग्य संधीची वाट पाहत राहूं. त्यांना इकडे येण्याविषयीं तुम्ही त्यांचें मन वळवावें. पुढचें आम्ही पाहून घेऊं. आपला बेत खात्रीनें सिद्धीला जाईल. ' हें पत्र मराठ्यांच्या हातांत पडेल अशा बेतानें एका दूताच्या हातीं त्यानें पाठविलें. युक्ति सफळ झाली. ठरल्याप्रमाणें तें जानोजीच्या हातांत पडलें. त्याबरोबर त्या उतावळ्या तरुणानें मीरहबीबाच्या द्रोहाविषयीं अधिक चौकशी न करतां त्याला पकडून मारून टाकिलें !

मराठ्यांच्या बंगालवरच्या स्वाऱ्यांचा वृत्तांत येथें समाप्त झाला. सुदैवानें मराठ्यांना बंगालवर पुनः स्वारी करण्याचें कारण पडलें नाहीं. तथापि या स्वाऱ्यांचे वेळीं मराठ्यांनीं बंगाली लोकांचे अंतःकरणांत जो दरारा उत्पन्न केला, त्याचें पुसट स्मरण अद्यापही गाण्यांच्या रूपानें बंगाली लोकांत राहि-लेलें आहे. ईश्वरकृपेनें आतां इंग्रजी अंमलाखालीं बंगाली व मराठे हे हातांत हात घालून व राष्ट्रहिताविषयींच्या जिव्हा-

ळ्यानें प्रेरित होऊन प्रेमानें एकमेकांना कुरवाळीत आहेत, बंगाल्यांत मी गेलों असतां तेथें बंगाली बंधूंनीं जें माझें स्वागत केलें, व साह्य दिलें तें मी कधीं विसरणार नाहीं. हा वृत्तांत लिहिण्याचे कामीं सुद्धां सर्वापेक्षां मला बंगाली ग्रंथांचेंच विशेष साह्य झालें हें मी आनंदानें व कृतज्ञ बुद्धीनें सांगतों. जे कट्टे शत्रु होते ते जिव्हाळ्याचे मित्र बनले आहेत! हा कालाचा प्रभाव किंवा ईश्वराची अगाधलीला म्हटली पाहिजे बंगाली लोक मराठ्यांना किती प्रेमानें वागवितात याचा मला स्वतःला चांगला अनुभव आहे.

समाप्त.

घरांतलीं कामें.

या पुस्तकासंबंधानें थोर लोक काय ह्मणतात तें पहा.

रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए.—' हा ग्रंथ मी समग्र वाचिला. यांत घर नीटनेटकें कसें ठेवावें, कोणतीं कामें केव्हां व कशीं करावीं, इ. गोष्टींबद्दल पुष्कळ उपयुक्त माहिती दिली आहे. शाळांत शिकणाऱ्या मुलींना पूर्वींसारखें गृहशिक्षण मिळत नाहीं, अशी कितीएकांची तक्रार आहे. ती या पुस्तकामुळें मिटेल इतकेंच नाहीं, तर सुधारलेल्या राष्ट्रांत बायकांवर गृहकृत्यांचा केवढा भार पडतो व तो त्या कशा रीतीनें सहन करतात याचा अदमास करतां येऊन गृह हें सुखाचें, शांतीचें व आरोग्याचें मंदिर करतां येईल अशी बुद्धि आपल्या लोकांस हें पुस्तक वाचून होईल.

रा. महाराष्ट्रभाषा चित्रमयूर कृष्णाजी नारायण आठल्ये संपादक ' केरळकोकिळ व नवें मन्वंतर '–' हें फार चांगलें पुस्तक आहे. सुशील सासूनें नवीन घरभरणी करून आलेल्या सुनेला शिकवावयाचें सारें काम व प्रेमळ आईनें प्रियकर मुलीला सासरीं पाठवितांना घरांतील कामकाजासंबंधानें उपदेश करण्याचें सारें काम या पुस्तकानें आयतें करून ठेविलें आहे. गृहिणीपदाला योग्य कसें व्हावें याची गुरुकिल्ली यांत दाखवून दिली आहे........प्रत्येक संसारी मनुष्यानें या पुस्तकाची प्रत संग्रहीं ठेवून आपल्या गृहिणीस मदत करावी.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सध्यांच्या मुलींच्या पुस्तकी शिक्षणाला गृहशिक्षणाची पुरवणी जोडणारें हें पुस्तक आहे. **किंमत बारा आणे**. ट. ह. व्ही. पी. २ आणे.

पत्ता—म्यानेजर आनंद, पुणें शहर.

मराठी-बंगाली शिक्षक.

अथवा

मराठीच्याद्वारें बंगाली भाषा शिकण्याचें साधन.

हें पुस्तक शेंकडों लोकांच्या आग्रहावरून त्या भाषेचा सतत वीस वर्षें व्यासंग केलेले लेखक रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए., संपादक 'आनंद', यांनीं लिहिलें आहे. हें एक पुस्तक जवळ असलें म्हणजे बंगाली व्याकरण, कोश वगैरे कशाचीहि गरज लागणार नाहीं. यांत व्याकरणाची माहिती, उत्कृष्ट लेखांचे उतारे, कोश सर्व कांहीं आहे. किंमत एक रुपया.

---

२ मराठी भाषेचे संप्रदाय आणि म्हणी.

या पुस्तकांत मराठी भाषेंतले दोन हजारांवर संप्रादाय (Idioms) व साडेतीनशें म्हणी यांचे स्पष्ट अर्थ, व्युत्पति व त्यांचा उपयोग कसा करावयाचा तें दाखविणारीं भरपूर अवतरणें दिलीं आहेत. हें पुस्तक ' आनंद ' संपादक रा. रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांनीं फार परिश्रमपूर्वक तयार केलें असून मराठी भाषेंत या तऱ्हेचें पुस्तक हेंच पहिलें आहे. यास डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसयटीकडून बक्षीस मिळालें आहे. किंमत १ रुपया.

---

३ संस्कृत—मराठी कोश.

यांत संस्कृत काव्यें, नाटकें. महाभारत, रामायण वगैरे वाङ्मयांत येणारे बहुतेक शब्द मराठी अर्थासुद्धां व पौराणिक स्त्रीपुरुषांचीं नांवे त्यांच्या माहितीसह दिलीं असून शिवाय सुमार ४०० संस्कृतसुभाषितेंही आहेत. किंमत कागदी बांधणी १२आणे. कापडी बांधणी १ रुपया.

आनंदाचे वर्गणीदारांस अनुक्रमें ८ आणे व १२ आणे.

पत्ता—व्यवस्थापक आनंद, शहर पुणें.

मुलांसाठीं सचित्र मासिक पुस्तक

आनंद.

वर्षारंभ आगष्ट किंवा जानेवारी. हें मासिक आज सतत दहा वर्षें हंसवीत, खेळवीत, गाणीं म्हणून दाखवीत व गमतीचीं चित्रें दाखवून करमणूक करीत मुलांना वाचनाची गोडी लावीत आलें आहे. अगदीं सोपी भाषा, सोपे विषय, सोपी विवेचनपद्धति, गमतीचीं व मुलांच्या कल्पनेला उत्तेजित करणारीं चित्रें, मुलांचे लेख व गमतीचीं कोडीं, या गोष्टी या मासिक पुस्तकांत विशेष आहेत. अंक दर महिन्याच्या १५ व्या तारखेला विनचूक निघतो. वर्गणी सालिना फक्त एक रुपया. लहान मुलांसाठीं इतकें चांगलें, मोहक व स्वस्त दुसरें मासिकच नाहीं. हें मासिक पुस्तक मध्यप्रांत व वऱ्हाड येथील मे. डायरेक्टरसाहेब, विद्याखातें, यांनीं शाळांसाठीं मंजूर केलें आहे.

वर्षाची वर्गणी ट. ह. सह १ रुपया.

पत्ता-व्यवस्थापक 'आनंद,' पुणें शहर.